23-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

MSS/ 10:00

23-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

MSS/ KTG/ KGS/ 10:00

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी./मु.शी.: सन 2009-10च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उपसभापती : पूरक मागण्यावरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यावरील चर्चा आज मंगळवार दिनांक 23 मार्च 2010 रोजी घेण्यात येत आहेत. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांना कृपया लक्षात घ्यावे.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.:-

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-1, ए-2,ए-3, ए-4, ए-5, ए-6, एफ-2, एफ-3, एफ-6ए, क्यू-2, क्यू-5, झेड डी-1, झेडी-2

(2) जलसंपदा (कृझा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), ऊर्जा मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3, आय-4, आय-5, के-6

(3) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभगाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3, एम-4

(4) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्यापूरक मागण्या क्रमांक जी-1, जी-5, जी-6, ओ-7, ओ-9, ओ-10, ओ-16, ओ-28, ओ-33, ओ-45

(5) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागणी क्रमांक टी-1, टी-2, टी-3, टी-4, टी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

(6) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डब्ल्यू-2, डब्ल्यू-3,डब्ल्यू-4,डब्ल्यू-6

(7) उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-7, के-8

(8) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास, औकाफ व माजी सैनिकांचे कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक झेड-ए-2, झेड-ई-1,झेड-ई-2

(9) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-4, डी-6

(10) महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एक्स-1,एक्स-2

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता आपण पूरक मागण्यावरील चर्चेच्या संदर्भातील नियमामध्ये असलेली तरतूद वाचून दाखविली. 4 हजार 800 कोटी रुपयाच्या पूरक मागण्या आहेत. मूळ बजेटमध्ये 20 हजार कोटीच्या ठोस मागण्या दाखविलेल्या आहेत. मग बाकीचे पैसे कुठे गेले ? या बाकीच्या रकमेबाबत खुलासा झाला असता तर बरे झाले असते. सभागृहाच्या मंजुरी शिवाय शासनाला एक नया पैसाही खर्च करता येत नाही. म्हणून मूळ बजेटमध्ये 20 हजार कोटीच्या ठोस मागण्या दाखविलेल्या असताना आता केवळ 4 हजार 800 कोटी रुपयाच्या पूरक मागण्या दाखविलेल्या आहे. उर्वरित पैसे कुठे गेले, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उपसभापती : माननीय मंत्री महोदय उत्तराच्या भाषणामध्ये आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेतील.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे चर्चेला सुरुवात करतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील बाब क्रमांक 4मध्ये दिवंगत वि.स.पागे, सी.डी.देशमुख, रणजित देसाई, बाळासाहेब सावंत, वि.स.खांडेकर, भाई सावंत इत्यादींचे स्मारक उभे करण्याकरिता आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. साने गुरुजींचे स्मारक उभारण्याकरिता बाब क्रमांक 5 मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मला एका गोष्टीचे स्मरण करुन द्यावेसे वाटते की, श्री. ना.स.फरांदे हे या सभागृहाचे सभापती असताना त्यांनी नेवासे येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे स्मारक उभे करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितलेले होते. त्यानंतर सभापती स्थानावरुन निवृत्त झाल्यानंतर ते नेवासे येथे ज्ञानेश्वरांचे स्मारक व्हावे यासाठी वारक-याच्या वेशामध्ये विधान भवनामध्ये येत होते. ज्ञानेश्वरांच्या स्मारकासाठी तरतूद करण्यात आली परंतु ती पुरेशी नव्हती. जेव्हा सभापती, उपसभापती किंवा तालिका सभापती सभागृहाच्या सर्वोच्च स्थानावरुन शासनाला निदेश देतात किंवा सूचना करतात त्यावेळी त्या निदेशांचे, सूचनांचे शासन पालन करते. असे असताना जेव्हा सभापती स्थानावरुन निवृत्त झालेली मान्यवर व्यक्ती ज्ञानेश्वरांच्या स्मारकासाठी सातत्याने पाठपुरावा करते त्यावेळी त्याची दखल घेऊन नेवासे येथील ज्ञानेश्वरांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी शासनाने बजेटमध्ये तरतूद करावयास पाहिजे होती, ती तरतूद केलेली नाही याकडे मी शासनाचे लक्ष वेधते.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.नीलम गोऱ्हे.....

तसेच संयुक्त महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हुतात्मा स्मारक हे मुंबईमधील महत्वाचे स्थान असून अतिशय पावित्र्य या पध्दतीने या स्थानाकडे पहात असलो तरी देखील संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाची नव्याने मुंबईत येणाऱ्या लोकांना पुरेशी माहिती नसते. त्याकडे मात्र शिवसेनेने लक्ष दिले आहे. शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही हे काम सुरु केले हे मी मुद्दाम नमूद करु इच्छिते.

सभापती महोदय, वेगवेगळ्या महनीय व्यक्तींचे पुतळे उभारले जातात त्यासाठी तरतूद केली जाते. परंतु बहुतेक नगरपालिकांची परिस्थिती पाहिली तर या पुतळ्यांची अवस्था उरलेले 364 दिवस अतिशय वाईट असते. महत्वाच्या सणाच्या दिवशी काही ठराविक महापालिका सोडल्या तर बहुतके नगरपालिकांमध्ये त्या पुतळयांची स्वच्छता सुध्दा ठेवलेली नसते. या संदर्भात सगळ्या नगरपालिकांकडून त्यांनी त्यांच्या अखत्यारितील पुतळ्यांची स्वच्छता कधी केली याचा आढावा मागविला तर फार वाईट परिस्थिती समोर येऊ शकते. म्हणून या थोर व्यक्तींच्या पुतळ्यांची डागडुजी करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी स्वत: सरकारने लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या संदर्भात एक महत्वाची बाब मी सभागृहासमोर मांडू इच्छिते. वेगवेगळया महानगरपालिका स्वत:चे बजेट जाहीर करतात. महानगरपालिकांच्या कारभारामध्ये शासनाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही हे जरी खरे असले तरी राज्य शासनाने 2003 पासून सगळ्या महानगरपालिकांना कळविले आहे की, महिला व बालविकास यासाठी बजेटच्या 5 टक्के रक्कम खर्च केली पाहिजे. पुणे महानगरपालिकेने सुध्दा यावर्षी जेंडर बजेट जाहीर केले. त्यासाठी 50 लाख रुपयांची तरतूद त्यांनी जाहीर केली. परंतु गेल्या वर्षीचा आढावा घेतला तेव्हा असे निदर्शनास आले की, तरतूद केलेल्या रक्कमेपैकी एक रुपयादेखील खर्च केलेला नाही. महानगरपालिकेने स्पष्ट सांगितले की, आम्ही जेंडर बजेट करणार होतो, परंतु जो निधी मिळणार होता तो निधी मिळाला नाही म्हणून महिला विषयक सर्व योजनांमध्ये कपात केली असे उत्तर दिल्यामुळे सभागृहात नगरसेवकांमध्ये बरीच धुमश्चक्री झाली आणि महापौरांना पलायन करावे लागले असे आम्ही वृत्तपत्रातून वाचले. म्हणून जेंडर बजेट आणि महिला व बालकांच्या कल्याणासाठी असलेल्या महानगरपालिकांमधील तरतुदीकडे मी लक्ष वेधू इच्छिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, कामगार आणि उद्योग या विभागासंबंधी बोलत असताना अपेक्षित होते की, घरेलू कामगारांच्या प्रश्नासंबंधी शासन तरतूद करेल. डिसेंबर, 2008 च्या अधिवेशनामध्ये या घरेलू कामगारांसाठी एक महामंडळ शासन निर्माण करेल, त्यांच्यासाठी निवृत्तीवेतन त्याचबरोबर आजारपण याची जबाबदारी वैयक्तिक मालकांवर न टाकता सरकार त्यासाठी एखादा फंड उभारेल अशा पध्दतीची घोषणा सरकारने केली. विधेयक रात्री 11.45 वाजता मंजूर झाले होते. हजारो घरेलू कामगारांनी कोल्हापूर, पुणे, मुंबई येथे मोर्चे काढले. स्वत: माननीय कामगारमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी आश्वासन दिले होते की, निश्चितपणे या अधिवेशनामध्ये घरेलू कामगारांसाठी फंडाची व्यवस्था करु, त्यासाठी नियमावली करु आणि घरेलू कामगार संघटनांमध्ये काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्या, सर्व पक्षीय आणि स्वतंत्र काम करणाऱ्या संघटनांना सामावून घेऊ. परंतु कामगार विभागाने या संदर्भात काहीही तरतूद केलेली नाही याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाकडे वळत असताना भिक्षेगृहांसाठी अधिक अनुदानाची व्यवस्था केलेली आहे. परंतु सातत्याने महिला व बालविकासाच्या बजेटकडे पाहिले तर बहुतके बालगृहांमध्ये अतिशय वाईट अवस्था आहे. स्वत: महिला व बालविकास मंत्री यांनी अशा काही गृहांना भेटी दिल्या. त्यांच्या दोन-तीन गोष्टी निदर्शनास आल्या. त्यामध्ये राज्य महिला आयोगाचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. विधीमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीने महिला व बालविकास विभागाचे सचिव व राज्य महिला आयोगाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली असता असे निदर्शनास आले की, सरकारने कौटुंबिक संरक्षण अधिकारी नेमण्यासाठी तरतूद करावयास पाहिजे, ती तरतूद केली नाही. त्याचा परिणाम असा झाला की, कायद्याची अंमलबजावणी होत नाही. कायदे बदलाचा विषय आहे. तो विषय राज्य महिला आयोग बघते. राज्य महिला आयोगामध्ये निम्म्यापेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. गेल्या पाच वर्षात जे सहा सदस्य सरकारकडून नेमावयाचे असतात त्यातील तीनच सदस्य नेमले गेले. शेवटपर्यंत पाच वर्षाच्या काळात तीन सदस्यांची नियुक्तीच झाली नाही. त्यामध्ये पक्षीय राजकारण आहे असे म्हणावयाचे नाही. परंतु खेदाने नमूद करावेसे वाटते की, माझ्या माहितीप्रमाणे काँग्रेस पक्षाकडून तीन नावे दिली गेली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडील तीन जागा पाच वर्षे रिक्त होत्या. इतर महामंडळाप्रमाणे सदस्यांच्या नियुक्त्या न रखडता ताबडतोब सदस्यांच्या नियुक्त्या करणे गरजेचे आहे. राज्य महिला आयोगासाठी 2 कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद करणे गरजेचे होते.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आणि दरवेळी बजेटमध्ये सुध्दा यावर चर्चा होते परंतु महिला व बालकल्याण विभाग म्हटला की बहुतेक लोक हसतात. कारण या विभागाचे स्थान, ज्याप्रमाणे समाजात स्त्रियांचे दुय्यम स्थान आहे तसेच दुय्यम स्थान मानले जाते. काही लोक एखाद्या मंत्र्याला थट्टा करताना म्हणतात की, यांना महिला व बालकल्याण विभाग देऊन टाका. मला सांगावयाचे आहे की, आज राष्ट्राध्यक्ष व लोकसभेचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदांवर सुध्दा महिलाच आहेत. अशा वेळेस महिला व बालकल्याण विभाग सक्षम करणे व त्या विभागाला अधिकचा निधी दिला तर त्या विभागाला चांगल्या प्रकारचे अधिकारी मिळतील. मग त्यातून भीक्षागृह, बालगृह तसेच महिला गृहे असतील त्यांचे व्यवस्थापन चांगले होण्याच्या दृष्टीने अधिकारी सक्षमपणे काम करतील व त्यासाठी चांगले अधिकारी नेमता येतील याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्र. 121, पृ.क्र. 117 ग्रंथालयांच्या संदर्भात तरतूद केली आहे. या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. गंगाधर पटने हे नेहमीच ग्रंथालयांचा विषय मांडत होते. या ग्रंथालयातील सेवकांचा दर्जा सुधारणे, पुस्तके उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत शासनाने पावले उचलणे याकडे ते शासनाचे लक्ष वेधत असत. आज राज्यातील ग्रंथालये नेहमीच दुर्लक्षित व उपेक्षित आहेत. माझी अशी मागणी आहे की, ग्रंथालय समितीला जास्त प्रमाणात अधिकार देऊन ती सक्षम करणे, खास करुन सर्व ग्रंथालये इंटरनेटने जोडणे यासाठी शासनाने प्रयत्न करावा. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई हे प्रबोधन संस्थेच्या माध्यमातून गोरेगाव येथे वाचनालय चालवितात. त्या वाचनालयाला मी सुध्दा भेट दिली आहे. तेव्हा त्यांच्याकडे जी पुस्तके उपलब्ध आहेत त्यांच्या संदर्भात खास प्रोग्रॅमिंग केले आणि त्याला प्रबोधन पॅकेज म्हटले आहे. अशा प्रकारच्या गोष्टींचा उपयोग करुन राज्यातील ग्रंथालयांचे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिकीकरण करण्यासाठी आपल्याला उपयोग करता येईल यासाठी शासनाने अनुदान देणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, बाब क्र. 2, पृ.क्र.4, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात मी बोलणार आहे.

सभागृहात सामान्य प्रशासन विभागाचा कार्यभार सांभाळणारे माननीय मुख्यमंत्री सुध्दा हजर आहेत. दरवेळेस मी कर्मचाऱ्यांचा पॅटर्न बदलण्याच्या संदर्भात गेल्या दहा वर्षांपासून मागणी करीत आलो आहे. परंतु त्यासंदर्भात अजून कुठेही व कधीही चर्चा चालू नाही. आपण आधुनिकीकरण आणि संगणकीकरण करण्याचा विचार करीत आहोत पण पॅटर्न मात्र तसाच आहे. असा पॅटर्न न बदलल्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी झालेलीच नाही. या अनुषंगाने कुठेतरी धोरणात्मक निर्णय घेऊन यासाठी एक समिती नेमण्यात यावी आणि या पॅटर्नची पुनर्बांधणी करावी अशी मी मागणी करीत आहे. माझा अनुभव मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, माझ्या रायगड जिल्हा बँकेमध्ये 1200 कर्मचारी होते आणि आजच्या परिस्थितीत फक्त 200 कर्मचाऱ्यांवरच बँक चालवित आहे. कालच नाबार्डने मला आयएसओ हा पुरस्कार दिला आणि प्रत्यक्षात रायगडचा पॅटर्न नाबार्डने स्वीकारला. नाबार्डने ठरवून दिलेला 500 कर्मचाऱ्यांचा पॅटर्न आहे परंतु आमच्या बँकेत त्यापेक्षाही कमी कर्मचारी आहेत. आज मंत्रालयात पाहिले तर अधिक प्रमाणात कर्मचारी आहेत. शासनाने आधुनिकीकरण केले तरीही त्यात बदल होत नाही. म्हणून माझी अपेक्षा आहे की, पुढील अधिवेशनात आपण ज्यावेळेस अशा पुरवणी मागण्यांवर चर्चा करु त्यावेळपर्यंत यासंबंधी गांभीर्याने विचार करुन यामध्ये बदल घडवून आणल्याचे उत्तर आम्हाला द्यावे व राज्यातील सर्वसामान्य जनतेला न्याय द्यावा.

महोदय, बाब क्र.2, पृ.क्र.4, सामान्य प्रशासन विभागामार्फत ज्या मतदार याद्या बनविल्या जातात त्या अद्यापही अद्ययावत झालेल्या नाहीत. कारण शहराच्या बाजूच्या ग्रामपंचायतींमध्ये मतदारांची जी नावे आहेत तीच नावे नगरपालिकेच्या यादीमध्ये सुध्दा आहेत. अनेक वेळा ही डबल नावे असल्याचे आढळून आले आहे. त्यात एखाद्याकडे रेशन कार्ड नाही तरी सुध्दा मतदार यादीत नाव असल्याचे आढळून येते यासंदर्भात खरे तर आधुनिकीकरणाची गरज आहे, त्याचा शासनाने विचार करावा.

....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

यानंतर बाब क्र.4, पृ.क्र. 5-सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे स्व. नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारक होण्याची मागणी अनेक वेळा केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा त्यावेळेस सांगितले होते की, ज्या पध्दतीचे प्रबोधन नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजामध्ये केले, व्यसनमुक्तीचे काम देखील त्यांनी त्यांच्या आयुष्यात केले .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

सभापती महोदय, रेवदंडा शहरात महाराष्ट्रातूनच नव्हेतर संपूर्ण देशातून लाखो भाविक या ठिकाणी येत असतात त्यामुळे रेवदंडा येथे पर्यटनस्थळ निर्माण करण्यात यावे तसेच नाना साहेबांच्या दृष्टिकोनातून हे ठिकाण धार्मिक क्षेत्र म्हणून शासनाने घोषित करावे अशी मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 5 च्या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. आंग्रे यांची जी समाधी आहे त्या ठिकाणी लाईट आणि साऊंडची व्यवस्था करण्याची नितांत आवश्यकता आहे. जसे अंदमान आणि लाल किल्ल्यावर लाईट आणि साऊंडची व्यवस्था केलेली आहे तशी व्यवस्था आंग्रे यांच्या समाधी स्थळी करण्यात यावी अशी मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 29 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. रायगड जिल्हयातील अलिबाग हे जिल्हयाच्या मुख्यालयाचे ठिकाण आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याची नितांत आवश्यकता आहे त्यामुळे अलिबाग येथे शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारावे अशी माझी कळकळीची विनंती आहे. या ठिकाणी आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सन्माननीय सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील बाब क्रमांक 100, बाब क्रमांक 107 वर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी आदिवासी विभागाच्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी 61.62 कोटीं रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जी वसतिगृहे आहेत त्या ठिकाणी राहणा-या विद्यार्थ्यांना केवळ वसतिगृहे देऊन चालणार नाही तर त्या वसतिगृहात आवश्यक असणा-या सुविधा त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना मिळतात की, नाही यासंदर्भात देखल घेण्याची आवश्यकता आहे. या विद्यार्थ्यांच्या निवासाची उत्तम व्यवस्था होणे, विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे भोजन मिळणे तसेच त्या ठिकाणी जी काही ग्रंथालये सुरु केलेली आहेत त्या ग्रंथालयातील पुस्तके या विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजेत. या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना या ग्रंथालयातून पुस्तके उपलब्ध करुन दिली जात नाही त्यामुळे या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके उपलब्ध करुन दिली जावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 106, पृष्ठ क्रमांक 100 वर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. भविष्य निर्वाह निधीचे व्याज देण्यासाठी 92.94 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या कर्मचा-यांना संगणकाचे ज्ञान व्हावे, कर्मचारी संगणक साक्षर व्हावे यासाठी भविष्य निर्वाह निधीतून 50 हजार रुपये उपलब्ध करुन दिले जातात तशाच प्रकारे शिक्षक, आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना देखील राज्य शासनाच्या कर्मचा-यांना ज्या प्रमाणे संगणकासाठी भविष्य निवार्ह निधीतून पैसे उपलब्ध करुन दिले जातात तशाच प्रकारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना संगणक साक्षर होण्यासाठी, संगणक घेण्यासाठी 50 हजार रुपये उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय, यानंतर मला उच्च व तंत्र शिक्षण विभागाची बाब क्रमाक 119 पान नंबर 116 संबंधी बोलावयाचे आहे. 2009-2010 यावर्षाकरिता विद्यापीठाच्या अनुदानाकरिता ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.सभापती महोदय, राज्य शासनाचे असे धोरण आहे की, प्रत्येक तालुकयात एक तरी अनुदानित महाविद्यालय असले पाहिजे. हा विषय अनेक माध्यमातून आम्ही सातत्याने सभागृहात मांडत आलेलो आहोत. या पूर्वी शहरी भागात महाविद्यालये सुरु करण्यात आलेली असून ती अनुदान तत्वावर सुरु करण्यात आलेली आहेत परंतु ग्रामीण भागात आता आवश्यकता निर्माण झाल्यामुळे आणि . ग्रामीण भागातील गोर गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून ग्रामीण भागात काही महाविद्यलये सुरु करण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे नव्याने म्हणजो गेल्या सात आठ वर्षापासून जी महाविद्यालये सुरु करण्यात आलेली आहेत ती कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सभापती महोदय, शासनाचे असे धोरण आहे की, एका तालुक्यात एक तरी महाविद्यालय हे अनुदानित असले पाहिजे. तेथील प्रत्येक शाखा अनुदानित स्वरुपाची असली पाहिजे. त्या धोरणाप्रमाणे ग्रामीण भागात एका तालुक्यात एक तरी अनुदानित महाविद्यालय आहे काय आणि एक तरी अनुदानित शाखा सुरु करण्यात आले नसेल तर ते महाविद्यालय सुरु करण्याच्या बाबतीत शासनाने विचार केला पाहिजे. तसा विचार शासनाने केला तर ग्रामीण भागातील कष्टकरी, गोर गरीब आणि शेतक-यांच्या मुलांसाठी जी महाविद्यालये सुरु करण्यात आलेली आहेत त्यांना अनुदान मिळण्यामध्ये निश्चितपणे मदत होऊ शकेल. सभापती महोदय, आपण् त्या आसनावर बसलेला असतांना टिटवाळया जवळील गोविले येथे जे महाविद्यालय सुरु करण्यात आलेले आह त्या महाविद्यालयामध्ये 100 रुपये भरुन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो आणि त्या भागातील ` 2 हजार विद्यार्थ्यांनी या माहविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील हे एकमेव महाविद्यालय असून त्या महाविद्यालयास अनुदान दिले जात नाही त्यामुळे या महाविद्यालयात शिक्षण घेंणा-या विद्यार्थ्यांना ज्या सुविधा मिळावयास पाहिजे होत्या त्या सुविधा मिळत नाहीत. गोविले येथील महाविद्यालयाला अनुदान देण्यासंबंधी मी अनेकदा सभागृहात उल्लेख केला होता. तेव्हा या महाविद्यालयास तसेच आदिवासी भागातील वाडा तालुक्यातील एका तरी ग्रामीण भागातीलील महाविद्यालयास अनुदान दिले गेले पाहिजे. अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 120 पान नंबर 116 सबंधी मला बोलावयाचे आहे. तंत्र माध्यमिक शाळांसाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. मागच्या अधिवेशनात या शाळात काम करणा-या शिक्षकेतर कर्मचा-यांना कालबध्द पदान्नती देण्यासबंधी मी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की या मध्ये खरोखर अनॉमली निर्माण झालेली आहे, भेदभाव निर्माण झालेला आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन ही अनॉमली दूर करण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार करण्यात येईल. परंतु अजूनही शासनाने याबाबतीत विचार केलेला नाही. तेव्हा यासंबंधी विचार करण्यात यावा अशी मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, या नंतर मला अल्पसंख्याक विभागाची बाब क्रमांक 142 ते 145 पान नंबर 145 संबंधी बोलावयाचे आहे. या राज्यातील भाषिक अल्पसंख्याक वा धार्मिक अल्पसंख्याक असलेल्या संस्थांना घटनेनुसार कोणत्याही प्रकारे आरक्षणाची टक्केवारी लागू नाही परंतु शासकीय अधिका-यांकडून शालेय अनुदान देत असतांना आरक्षणाची टक्केवारी पूर्ण केली नाही म्हणून अनेक अल्पसंख्याक शाळांना अनुदानापासून वंचित ठेवलेले गेले आहेत. याबाबतीत अल्पसंख्याक विभागाच्या माननीय मंत्र्यांना मी अशी विनंती करतो की, शालेय शिक्षण विभागाला असे निर्देश देण्यात यावे की, अल्पसंख्यांक शाळांसाठी तसेच संस्थांसाठी आरक्षणाची टक्केवारी लागू नाही तरी देखील या कारणास्तव या शळांना अनुदान नाकारले जात असेल तर ते बरोबर नाही. अशा प्रकारे या शाळाना अनुदान मिळवून देण्याच्या बाबतीत अल्पसंख्याक विभागाने पुढाकार घ्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. .

--

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पर्यटन विभागाचा उल्लेख कालच्या कामकाजपत्रिकेत करण्यात आला नव्हता तसेच आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये देखील करण्यात आलेला नाही. तेव्हा या विभागाच्या पूरक मागण्यांवर केव्हा चर्चा होणार आहे?

श्रीमंती मंदा म्हात्रे : कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये त्या विभागाचा उल्लेख होता..

उपसभापती : वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन आणि पर्यटन मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्यांचा उल्लेख कालच्या कामकाजपत्रिकेत करण्यात आला होता.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमत मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या) सभापती महोदय, 2009-2010 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे सर्व प्रथम मला नगरविकास विभागाची .बाब क्रमांक 33 पान नंबर 29 संबधी बोलावयाचे आहे. मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. मुंबई शहरामध्ये चांगल्या प्रकारचा मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नवी मुबई ही मुंबईची जुळी बहीण असल्यामुळे मुंबईचा मेट्रो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईमध्ये देखील मेट्रोचा प्रकल्प राबवावा अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय,यानंतर मला अन्न व नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 76 पान नबर 68 संबंधी बोलावयाचे आहे . डोंगरी येथे शिधावाटप कार्यालयासाठी जमीन खरेदी करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की नवी मुंबईमध्ये एकच शिधावाटप कार्यालय आहे. त्या ठिकाणी दुसरे कार्यालय सुरु करण्यात यावे यासाठी आम्ही वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. त्यामुळे सिडको आता दोन ठिकाणी कार्यालये उपलब्ध करुन देणार आहे.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

एक ऐरोली आणि दुसरे सीबीडी आहे. परंतु त्याबाबत डिपार्टमेंटकडून अजून कोणत्याही प्रकारची हालचाल होत नाही. म्हणून आज दोन जागा मिळणार आहेत त्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत असे मला सुचवावयाचे आहे.

त्याचप्रमाणे बाब क्रमांक 86 व पृष्ठ क्रमांक 75 मध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासाठी तरतूद केली आहे. आज पुण्याप्रमाणे नवी मुंबईसुध्दा विद्येचे माहेरघर म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे त्याठिकाणी मुलींसाठी वसतिगृह बांधण्याची आवश्यकता आहे. याबाबत मी वेळोवेळी सभागृहामध्ये मागणी केली आहे. तेव्हा अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींसाठी वसतिगृह बांधण्यात यावे अशी माझी मागणी आहे. मध्यंतरी सिडकोने वसतिगृहाच्या बांधकामासाठी एका भूखंडाची निविदा काढली. ती निविदा काढल्यानंतर कोटयावधी रुपयांना त्या भूखंडाची विक्री झाली. त्या वसतिगृहाच्या ठिकाणी आज खरोखरच मुलींचे वसतिगृह होणार आहे की, अन्य काही बांधकाम होणार आहे? वसतिगृहाच्या इमारतीमध्ये अन्य प्रकारचे उद्योगधंदे होणार आहेत काय? गेल्या तीन-चार वर्षापासून सातत्याने सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी मी हा विषय उपस्थित केला आहे. नवी मुंबई हे शिक्षणाचे माहेरघर झाल्यानंतर मोठया प्रमाणात कॉलेज व शाळा निर्माण झाल्यानंतर शासनाने स्वत: लक्ष घालून नवी मुंबईमध्ये मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 94 पृष्ठ क्रमांक 83 मध्ये बंदरे व दीपगृहे या शीर्षकाखाली " रायगड जिल्हयासाठी प्रवासी सुविधा व इतर स्थापत्य अभियांत्रिकी विषयक कामांसाठी 3 कोटी 75 लक्ष रुपयांची तरतूद केली आहे." त्याचप्रमाणे ठाणे व नवी मुंबईहून प्रवासी जल वहातूक होत असते. त्या ठिकाणी खाडीमध्ये मोठ मोठे खडक असल्यामुळे मच्छिमारांच्या बोटींमधून जाळी टाकल्यानंतर ती खडकामध्ये अडकून फाटतात. त्यामध्ये मच्छिमारांचे फार मोठे नुकसान होते. तेव्हा नवी मुंबई व ठाणे येथील खाडीमध्ये मोठ मोठे खडक आहेत ते काढून टाकण्यासाठी शासनाने मदत केली पाहिजे. याबाबत मी पत्तन विभागाच्या अभियंत्यांना दिनांक 14.1.2010 रोजी पत्र लिहिले आहे. आपण मला याठिकाणी माझे विचार व्यक्त करण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 2 पृष्ठ क्र. 4 बाबत मी शासनाला विनंती करणार आहे की, दिनांक 26 मार्च रोजी रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्थेची निवडणूक होणार आहे. आतापर्यंत विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी कधीही आचारसंहिता लावली जात नव्हती. यावेळी पहिल्यांदाच ही आचारसंहिता लावण्यात आली आहे. आचारसंहिता लावल्यामुळे मार्च अखेरीपर्यंत चार जिल्हयांसाठी पैसे कसे खर्च करावयाचा हा प्रश्न आहे? म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, तेथील स्थानिक प्राधिकारी संस्थेचे 580 सभासद आहेत. त्यांचा स्थानिक नागरिकांशी फारसा संबंध येत नाही. म्हणून त्याठिकाणी आचारसंहिता न लावण्याबाबत शासनाने निवडणूक आयोगाला कळवावे अशी माझी मागणी आहे. मार्च अखेरपर्यंत हे पैसे खर्च होणार नसल्यामुळे या चार जिल्हयांसाठी मुदत वाढवून मिळावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभागाच्या बाब क्र. 27 व पृष्ठ क्र. 22 च्या अनुषंगाने मच्छिमारांसाठी अपघाती गट विमा योजना सुरु केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. माझी शासनाला विनंती आहे की, 5 वर्षापासून एनसीपीसी चे प्रस्ताव प्रलंबित आहेत. प्रत्येक जिल्हयामधून मॅचिंग ग्रँट दिली जाते. यापूर्वी आयुक्तांच्या पातळीवर एनसीपीसीचे प्रस्ताव मंजूर होत होते, आता आयुक्त कार्यालयाकडून गेल्यानंतर ते प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागामध्ये फिरत रहातात. त्यामुळे गेल्या 5 वर्षापासून अशाप्रकारचे प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे मच्छिमारांमध्ये फार मोठया प्रमाणात नाराजी निर्माण झाली आहे. आज जवळ जवळ 150 प्रकल्प प्रलंबित आहेत. तेव्हा हे प्रकल्प लवकरात लवकर मंजूर व्हावेत अशी माझी आपणास विनंती आहे. याबाबत पूर्वी जसे आयुक्तांना अधिकार देण्यात आले होते तसेच अधिकार फिशरीज विभागाच्या आयुक्तांना देण्यात यावेत अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्र. 28 व पृष्ठ क्र. 22 मध्ये राज्यस्तरीय छोटे पाटबंधारे यांच्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मी माझ्या कणकवली तालुक्यातील जानवली प्रकल्पाचे उदाहरण देतो. या प्रकल्पाला 7 ऑगस्ट 1989 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली, आणि तांत्रिक मंजूरी 13.9.1996 ला मिळाली. तो प्रकल्प पूर्ण होऊन 10 वर्षे झालीतरी त्या प्रकल्पामध्ये पाणी साठत नाही. या प्रकल्पाकरिता ज्या शेतकऱ्यांकडून जमिनी संपादित करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांचे पैसे अजूनपर्यंत मिळाले नाहीत. अशाप्रकारची अनेक उदाहरणे माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

जिल्हयामध्ये देता येतील. म्हणून त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनींचे पैसे मिळाले पाहिजेत अशी माझी विनंती आहे. तसेच अशाप्रकारे प्रलंबित असलेले प्रकल्प लवकर पूर्ण होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

त्यानंतर वित्त विभागाच्या बाब क्र. 36, पृष्ठ क्र. 33 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आमच्याकडे कोकण पॅकेजची बैठक झाली त्यामध्ये 5232 कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. माननीय वित्त राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आमच्याकडे आतापर्यंत साकवासाठी 11.30 कोटी आणि धूप प्रतिबंधक बंधारे यासाठी 3.37 कोटी इतका निधी आला. हे पैसे फक्त माझ्या जिल्हयापुरते आले आहेत. आणि म्हणून यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी जास्तीत जास्त निधी कसा देता येईल यासाठी आपण प्रयत्न करावेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली . . . .

सभापती महोदय, पान क्र.50 आणि बाब क्र.55,56 ही जलसंपदा विभागाच्या संदर्भातील आहे. माझी एक विनंती आहे की. गेल्या दहा वर्षामध्ये कोकणातील 90 प्रकल्प असे होते की, ज्याची किंमत **7** हजाराच्या जवळपास होती. पण आता ती 10 हजाराच्या जवळपास जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदरहू प्रकल्प कधी पूर्ण होणार आहेत की नाही ? आपण या प्रकल्पांसाठी निधी देणार आहात की नाही ? असा माझा शासनाला प्रश्न आहे. तसेच जे प्रकल्पग्रस्त आहेत, उदाहरण द्यावयाचे तर 1982 मध्ये तिल्लारीचा प्रकल्प सुरु झाला. तेथील जे प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांना अजूनपर्यंत नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. म्हणून माझी अशी सूचना आहे की, राज्यामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी नवीन धोरण अवलंबिण्यात यावे आणि सध्या आपण त्यांना 5 टक्के नोकरीमध्ये रिझर्वेशन देतो, ते 25 ते 30 टक्क्यापर्यंत करावयास पाहिजे. पण आज अशी स्थिती आहे की, प्रकल्पग्रस्तांच्या दोन पिढ्या निघून गेल्यातरी त्यांना नोकरी उपलब्ध होत नाही. म्हणून त्यांच्यासाठी नोकरीमध्ये 5 टक्क्याऐवजी 25 ते 30 टक्क्यापर्यंत रिझर्वेशन करण्यात यावे.

सभापती महोदय, मला शेवटची एक मागणी करावयाची आहे. बाब क्र.33, पान क्र.29 बाबत सांगावयाचे असून, मी काल देखील हा विषय मांडलेला आहे. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासनाने कोकण रेल्वेसाठी सुध्दा प्रयत्न करावेत अशी मी विनंती करतो आणि याठिकाणी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद देतो.

. . . .जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्र.5, पान क्र.6 यामध्ये साने गुरुजी यांचे स्मारक उभारण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. मला याबाबतीत सांगावयाचे आहे आणि मघाशीच सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत सांगितले.पण मी त्यापुढे जाऊन सांगू इच्छितो की, जर आपल्याला संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत जीवंत ठेवावयाचा असेल, कारण आमच्या पिढीपर्यंत सर्वांना याविषयी माहिती आहे परंतु पुढच्या पिढीला ही चळवळ काय होती हे कळणार नाही, त्याचा इतिहास कळणार नाही. यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा जो इतिहास आहे, त्याच्या संबंधातील काही पाने इतिहासाच्या पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्र.101, बाब क्र.106 यामध्ये आदिवासी विकास विभागासाठी काही मागणी करण्यात आली आहे. आदिवासी विभागाशी संबंधित अनेक प्रकल्प असे आहेत की, जे आपल्याला केवळ पुस्तकामध्ये सापडतात. पण प्रत्यक्षात या प्रकल्पांच्या कामासाठी करोडो रुपये उपलब्ध होतात. पण त्याचे पुढे काय होते हे समजत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आदिवासी विभागातर्फे जामखेड प्रोजेक्ट 12 तालुके आणि 60 जिल्ह्यामध्ये राबविण्यात येतो. त्यासाठी 2009-2010 मध्ये काही करोडो रुपयांची तरतूद केलेली आहे आणि ही तरतूद माता आणि बाल मृत्यू रोखण्यासाठी, याबाबतीत संबंधितांना शिक्षण देण्यासाठी, व्होकेशनल ट्रेनिंग देण्यासाठी करण्यात आली आहे. पण याचे नेमके काय झाले ? हे कळले नाही. तसेच बी.पी.एल.खालील आदिवासी कुटुंबांसाठी घरगुती गॅस वाटपाची योजना राबविण्यात येते. यासाठी 2 हजार लाख रुपये यासाठी प्राप्त झालेले आहेत. पण सदरहू रक्कम 2009-2010 मध्ये खर्च झालेली आहे काय ? या योजनेचा लाभ किती लोकांना झाला याची देखील सदनाला माहिती मिळाली पाहिजे. तसेच शासनातर्फे कन्यादान योजना राबविली जाते. यासाठी देखील एक हजार लाख रुपये आलेले आहेत. आतापर्यंत एकंदर किती विवाह झाले आहेत ? आपण आतापर्यंत किती जोडप्यांना या योजनेचा फायदा दिलेला आहे ? तसेच आदिवासी शेतकऱ्यां पी.व्ही.सी.पाईप दिला जातो. यासाठी देखील 1936.25 लाख रुपये आलेले आहेत. मी याठिकाणी सर्व आकडेवारीच देत आहे. तसेच ठक्करबाप्पा योजनेच्या अंतर्गत घरकुल बांधावयाची आहेत आणि 2009 मध्ये 15,122.65 लाख रुपये प्राप्त झालेले आहेत. हा निधी ठक्करबाप्पा योजनेच्या अंतर्गत घरकुल बांधावयासाठी वापरण्यात आलेला आहे काय ? की ते पैसे असेच गेले किंवा दुसरीकडे वळवले ...

. . . .जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेले आहेत काय ? याची माहिती सदनामध्ये मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, आश्रमशाळांसाठी सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे. पण आज आपल्या अनेक आश्रमशाळा भाड्याच्या जागेमध्ये आहेत. मला तर असे वाटते की, निम्म्याहून अधिक आश्रमशाळा भाड्याच्या जागेमध्ये आहेत. या आश्रमशाळा राज्य शासनाच्या स्वत:च्या जागेमध्ये कधीपासून सुर करणार आहात ? कारण सध्या आपण या आश्रमशाळांसाठी भाडे देत आहोत. पण आज काही आश्रमशाळांची परिस्थिती एवढी वाईट आहे की, त्यांच्या भिंती कुडाच्या आहेत आणि माननीय मंत्री महोदयांना कदाचित याबाबत माहिती असेल. पण यामध्ये अजूनही सुधारणा होत नाही, ती कधी करण्यात येणार आहे? तसेच याबाबत शासन काय करणार आहे असा प्रश्न आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, बाब क्रमांक 126, पान क्रमांक 121. महिला व पुरुष यांच्या शासकीय भिक्षेकरी गृहासाठी, ही बाब जरी महिला व बाल विकास विभागाची असली तरी देखील आदिवासी विकास विभागाकडून यासाठी पैसे येतात. महिला व बाल विकास विभाग ते पैसे खर्च करते. आदिवासी विकास विभागाकडून औषधासाठी पैसे येतात. विद्यार्थीनींच्या सायकलीसाठी पैसे येतात. माननीय मंत्रिमहोदयानी याठिकाणी इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावीच्या किती विद्यार्थीनींना महिला व बाल विकास विभागामार्फत सायकली दिल्या यासंबंधी माहिती द्यावी अशा प्रकारची मी याठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, नवीन अंगणवाडया तयार करण्याची घोषणा माननीय झनक साहेबांनी केली होती. या अंगणवाडयांसाठी केंद्र सरकारकडून अनुदान आलेले असेल किंवा येणार असेल. जुन्या अंगणवाडयांची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या देखील अतिशय वाईट परिस्थितीमध्ये आहेत. जुन्या अंगणवाडया दुरुस्त करण्यात येणार आहेत की, नवीन अंगणवाडया बांधण्यात येणार आहेत? नवीन अंगणवाडया बांधावयाच्या असतील तर पुन्हा जागेचा प्रश्न आपल्यासमोर आहे. राज्य शासनाच्या जागेवर किती अंगणवाडया आहेत आणि खासगी जागेवर किती अंगणवाडया आहेत याची देखील माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती घ्यावी. यासंबंधीची माहिती माझ्याकडे आहे. शाळांमध्ये किती अंगणवाडया चालविल्या जातात याची देखील माहिती घेण्यात यावी. सभापती महोदय, याबाबतीत शासनाने याच वर्षी घोषणा केलेली असल्यामुळे ती कार्यरुपात येण्यासाठी पुढचे वर्ष आहे. 2011 पर्यंत किती अंगणवाडया बांधण्यात येतील याची आम्ही वाट बघू परंतु त्या कशा बांधण्यात येणार आहेत यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची योजना आहे ती कधीच पूर्ण केली जात नाही. आदिवासी स्त्रियांना साडया पुरवणे यासाठी देखील काही लाख रुपये वर्ग करण्यात येतात पण साडया खरोखर दिल्या जातात काय? या सगळया योजना कागदावर रहातात. म्हणून यासंबंधीची माहिती घेऊन सभागृहाला सांगण्यात यावे की, खरोखर साडया दिल्या गेल्या काय? एवढेच बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्याच्या चर्चेत भाग घेत असताना पान क्रमांक 21, बाब क्रमांक 22. पशु संवर्धन या विषयावर मी बोलू इच्छितो. मागच्या वेळी देखील या प्रश्नावर चर्चा झाली होती. श्री. नितीन राऊत यांच्याकडे हे खाते नवीन होते. श्री. राणे साहेब मध्ये पडले आणि तो प्रश्न संपवला पण पुन्हा आरेच्या दुधाचा प्रश्न तसाच आहे. मागच्या वेळी या विषयाच्या संदर्भात मी अतिशय स्पष्टपणे संगितले होते की, एकेकाळी अडीच लाख लिटर आरे दुधाची दर दिवसाला विक्री होत असे. त्यानंतर ती 97 हजार पर्यंत खाली आली. माननीय सभापती महोदय, याबाबतचे जे प्रमुख कारण होते त्याबाबतीत शासनाने कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. खासगी दुधाचे प्रती लिटरचे भाव 16 ते 14 रुपये आहेत. आपण साडेबारा रुपये प्रती लिटर याप्रमाणे दूध विकत घेतले तर आपल्याकडे कोण दूध टाकतील. म्हणून आमचे अतिशय स्पष्ट मत आहे की, 80 टक्के कर्मचारी पुढच्या आठ वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत. आरे कॉलनीच्या जागेवर मग ती वरळीतील जागा असो की, गोरेगाव येथील जागा असो त्यावर सगळया तथाकथित राजकीय नेत्यांचा डोळा आहे. म्हणजे दोन्ही बाजुंनी मलिदा खाण्याचा विचार राज्यकर्त्यांचा आहे असे मला स्पष्ट म्हणावयाचे आहे. काल माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळसाहेबांनी इतर राज्यातील साखरेचे, दुधाचे व पाण्याचे भाव सांगितले. त्यांना बहुतेक दिल्लीत जायची घाई झालेली दिसते. त्यामुळे राज्यात काय चालले आहे यापेक्षा बाहेरच्या राज्यात काय चालले आहे याबद्दलच त्यांनी जास्त सांगितले आहे. मध्यप्रदेशमध्ये 16 रुपयाने, आंध्रप्रदेशमध्ये 14 रुपयाने, तामिळनाडूत 15 रुपयाने, गुजरातमध्ये 14 रुपयाने, कर्नाटकात 13 रुपयाने आणि महाराष्ट्रात साडेबारा रुपयाने दुधाची खरेदी केली जाते. बाहेरच्या राज्यतील दर जास्त आहेत त्यामुळे आरेचे दूध वाचवावयाचे असेल तर आरेचे दर वाढविण्याची आवश्यकता होती. यासंदर्भात कॅबिनेटमध्ये ठाम निर्णय घेण्याची आवश्यकता होती. आरे वाचवावयाचे आहे अशी शासनाची प्रामाणिक इच्छा असती तर तशा प्रकारचा निर्णय घेतला असता पण दुर्दैवाने त्याबाबतचा निर्णय घेतलेला नाही त्यामुळे आरेच्या दूधाची विक्री 70 हजार पर्यंत खाली आलेली आहे. गोरेगाव येथे आरेची 25 एकर जमीन आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी गॉगल घातला असला तरी लोकांचा डोळा त्यावर आहे, याकडे आपण लक्ष ठेवावे एवढेच मला माननीय मंत्रिमहोदयांना या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, यानंतर मला नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 35 बाबत बोलावयाचे आहे. एमएमआरडीएच्या संदर्भात ही बाब आहे. परवा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सुध्दा उल्लेख झाला की, आम्ही भाड्याची घरे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन देणार आहोत. भाड्याची घरे उपलब्ध करुन द्यावयाची यासाठी 26 नोव्हेंबर, 2008 ला एमएमआरडीएने निर्णय घेतला. यू-1 आणि यू-2 झोनमध्ये 150 ते 175 चौ. फुटाची घरे बांधून देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 17-18 बिल्डर किंवा विकासकांनी अर्ज केले. त्यासाठी त्यांनी तयारी दर्शविली. ती तयारी दर्शविल्यानंतर एमएमआरडीएने भाड्याच्या घराचा विषय अतिशय तत्परतेने घेतला. त्यावेळी त्याचे आम्ही कौतुक सुध्दा केले होते. एमएमआरडीएची स्थापना ही लंडनच्या धर्तीवर झाली. लंडन शहरावरील बोजा कमी करावयाचा असेल तर लंडनच्या आसपासची उपनगरे डेव्हलप करावयाचे असे ठरले आणि मग त्या ठिकाणी लंडन फर्स्टचे काम चालू झाले. त्या धर्तीवरच ही ॲथॉरिटी आपण देशातील चार मेट्रोसिटीमध्ये चालू केली त्यातील एक ॲथॉरिटी एमएमआरडीए आहे. मुंबईच्या उपनगर एरियामध्ये आपण जर भाड्याची घरे उपलब्ध केली आणि ट्रान्सपोर्टचा चांगला इन्फ्रॉस्ट्रचर दिला तर अतिशय चांगल्या पध्दतीने मुंबईवरचा लोकांचा बोजा कमी होईल आणि नोकरीव्यवसायाला लोक या ठिकाणी येतील. या पध्दतीच्या कल्पनेतून एमएमआरडीएने 2008 साली योजना घोषित केली, चालू केली. एमएमआरडीएने या परिपत्रकामध्ये म्हटल्याप्रमाणे तो एफएसआय मिळवावयाचा असेल तर त्या ठिकाणच्या नगरपालिकांकडे, महानगरपालिकांकडे अर्ज केल्यानंतर तेथील नियमानुसार एफएसआय मिळातो. कोणी पनवेलमध्ये करतो, कोणी बदलापूरला करतो, कोणी विरारला करतो, त्यामुळे तेथील नगरपालिकांकडे, महानगरपालिकांकडे अर्ज केल्यानंतर तेथील जे नियम आहेत त्या नियमानुसार त्यांना एफएसआय मिळतो. मग ही योजना व्हायेबल होत नाही. परवा माननीय राज्यपालांच्या भाषणात आलेली जी योजना आहे ती व्हायेबल करावयाची असेल आणि लवकर अंमलबजावणी करावयाची असेल, केव्हा तरी योजनेची घोषणा केली, टाळ्या मिळवल्या, वर्तमानपत्रामध्ये रकानेच्या रकाने भरुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आणले त्या योजनेची जर पुढे अंमलबजावणी करावयाची असेल तर, या योजनेला मग अलिबागचे जिल्हाधिकारी असतील किंवा बाकीची ठिकाणे असतील, त्या त्या भागातील एफएसआयप्रमाणे काम केले तर ते फॅक्चुअर होऊ शकत नाही हे यातील दुर्दैव आहे. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, यानंतर मला नगरविकास खात्याच्या पृष्ठ क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 32 बाबत बोलावयाचे आहे. केंद्रीय विद्यालयांचा एक विषय आहे. केंद्रीय विद्यालयांची 7 कोटी 34 लाख 31 हजार रुपयांची धुळ्यासाठी असलेली ग्रँट महाराष्ट्रातील संबंधित अधिकाऱ्याकडे येऊन गेली पाच वर्षे पडून आहे. कारण धुळ्यात जी जागा दिली आहे ती नॉन डेव्हलपमेंट झोनमधील आहे. ती जागा नगरविकास खात्याने नॉन डेव्हलपमेंट झोनमधून आरक्षण बदलून शिक्षणासाठी दिली तर केंद्रीय विद्यालय होऊ शकते. बाकी जिल्ह्यात केंद्रीय विद्यालये आहेत. या ठिकाणी केंद्राकडून पैसे येऊन पडले आहेत. पण धुळे जिल्ह्यामध्ये हे केंद्रीय विद्यालय चालू होऊ शकत नाही कारण जी जमीन सरकारने दिली त्या ठिकाणी शिक्षणाच्या संदर्भात जे आरक्षण बदलून पाहिजे ते आपण करीत नाही. पैसे पडून आहेत आणि जागा सुध्दा दिलेली आहे पण त्या जागेचे आरक्षण बदललेले नाही. बाकीची आरक्षणे दे दणादण बदलणे चालू आहे. संभाजीनगरमध्ये वक्फ बोर्डचे म्हणा किंवा इतर बाबतीत सुध्दा दे दणादण चालू आहे. परंतु या शिक्षणाच्या पवित्र कामासाठी पैसे पडून आहेत, जागा आहे, केवळ आरक्षण बदललेले नाही. आरक्षण बदलले तर त्या ठिकाणी आपण केंद्रीय विद्यालय चालू करु शकू. ही यातील वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 116 वरील बाब क्रमांक 119 बाबत मला बोलावयाचे आहे. आपण प्रत्येक तालुक्याला एक अनुदानित महाविद्यालय देण्याचा निर्णय घेतला. आमच्या कोकणातील लोकांनी अर्ज केले. आमची अडचण अशी आहे की, आमचा वैभववाडी तालुका आपल्या बृहत आराखड्यामध्येच नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

वैभववाडी तालुका श्री.विनय कोरे यांच्या मतदार संघाला जोडला होता. घाटावरील लोकांना कोकणाच्या बाबतीत सोयरसूतक नाही. या आराखडयात बाकीचे तालुके आले, पण कोकणातील वैभववाडी तालुका आला नाही. त्यामुळे त्याठिकाणच्या तालुक्याला एक अनुदानित महाविद्यालय मिळाले पाहिजे होते ते दिले जात नाही. शासनाला प्रदूषण करणारे प्रकल्प सुरु करावयाचे असतील तर कोकणाची निवड केली जाते, विजेचा प्रकल्प कोकणात सुरु केला जातो. मायनिंग पाहिजे असेल तर कोकणची निवड केली जाते. म्हणजे पैसा कमवायचा असेल तर कोकण दिसतो. मायनिंगच्या कंपन्या घाटावरील लोकांच्या आहेत. मग आम्हाला असे म्हटले जाते की, घाट आणि कोकण असा तुम्ही भेदभाव करता.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी एकसंध महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक वाद आणू नये.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रादेशिक वाद कोण आणतो ? बृहत आराखडयामध्ये कोकणातील तालुके येत नाहीत आणि त्याबाबत कोणी बोलत नाहीत हे दुर्दैव आहे. हा त्याच्यातील मुद्दा आहे.

सभापती महोदय, याच बाबीच्या अंतर्गत मी अन्य एक विषय मांडतो. व्हीजेटीआयचे प्रकरण अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. या महाविद्यालयात खूप घोटाळे सुरु आहेत. त्यामुळे सत्यशोधन समितीची नेमणूक करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या विधी आयोगाने त्यासंदर्भात शासनाला शिफारशी केल्या आहेत, त्या शिफारशींचे पालन होत नाही. त्याठिकाणी विद्यार्थी आंदोलन करीत आहेत, प्राध्यापक आंदोलने करीत आहेत, कर्मचारी आंदोलने करीत आहेत. त्या महाविद्यालयाच्या संचालकांविरुध्द तक्रारी आलेल्या आहेत. व्हीजेटीआय हे मान्यवर महाविद्यालय आहे. सन्माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंतराव पाटील हे त्या महाविद्यालयात शिकलेले आहेत. आम्ही इंजिनिअरिंगला असताना हे महाविद्यालय नंबर 1 वर होते. आता त्याचा क्रमांक 14-15 वर घसरला आहे. या महाविद्यालयाला स्वायत्ता मिळाल्यानंतर त्याचा दर्जा वाढावयास पाहिजे होता, परंतु त्यात वाढ झालेली नाही. एका प्राईम लोकेशनवर हे महाविद्यालय आहे, परंतु श्री.नसली वाडिया यांनी ते घेतले. त्यांच्या बाकीच्या साम्राज्यामुळे त्यांना या महाविद्यालयाकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे आम्ही मंत्रिमहोदयांकडे तक्रार केलेली आहे. त्यावर शासनाने प्रकाश टाकावा, तर काही तरी उपयोग होईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, यानंतर मी गृहनिर्माण विभागाच्या पान क्रमांक 87 वरील बाब क्रमांक 98 वर बोलू इच्छितो. मी मुंबईतील असल्यामुळे मला गृहनिर्माण या विषयावर बोलावे लागते. गृहनिर्माण म्हटले की, एसआरएवर बोलावे लागते. एसआरए योजनेखाली म्हटले तर गरिबांना घर मिळते, म्हटले तर ही योजना अधिका-यांचे गल्ले भरते. एसआरए मध्ये सीईओ आहेत. या पदावर आयएएस अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली नाही. ते प्रमोटी आहेत. काल वाहतूक या विषयावर बोलताना परिवहन आयुक्तांसंबंधी मी बोललो होतो. हे अधिकारी त्या पदावर कसे येतात, कोणामुळे येतात याची चर्चा सगळीकडे सुरु आहे. राज्याचे परिवहन आयुक्त किंवा एसआरएचे सीईओ ही पदे आयएएस अधिका-यांमधून भरली पाहिजेत. आयएएस अधिका-यांची कमी आहे हे मी समजू शकतो. मुंबई शहरामध्ये ज्या लहान लहान झोपडया आहेत त्यांचे श्री.चंद्रशेखर प्रभू, श्री.रिबेरो यांच्यासारखे विकासक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले होते. या मान्यवरांनी लोकांनी स्वत: विकासक व्हावे असे आवाहन केले होते. त्यामुळे लोकांनी त्यांच्या स्वत:चे प्रकल्प एसआरएकडे मंजुरीसाठी पाठविले होते. सभापती महोदय, शहरातील प्रकल्प असेल तर 300 रुपये चौ.फू आणि उपनगरातील असेल तर 100 चौ.फूट असा एसआरए योजनेचा दर ठरलेला आहे. मोठे विकासक या अधिका-यांना हा पैसा देतील. पण यामुळे जे लोक स्वत:च जागा विकसित करीत आहेत त्यांचे प्रकल्प मागे पडले आहेत. या लोकांच्या योजनांपेक्षा जे मोठे विकासक आहेत त्यांच्या एसआरएच्या योजना तातडीने मंजूर होत आहेत. या योजना मंजूर करण्याचा सीईओच्या कामाचा उरक प्रचंड आहे. पार्ल्याचे श्री.किशोरभाई यांना लक्ष्मीदर्शन झाले की एसआरए प्रकल्प क्लीअर होतो. जे लोक पैसा कमवितात त्यांच्याकडून पैसा घ्यावा, त्याबाबत तक्रार नाही. परंतु श्री.चंद्रशेखर प्रभू, श्री.जे.एफ.रिबेरो यांच्या आवाहनाला, नवाकाळचे श्री.खाडिलकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन ज्यांनी एसआरएच्या योजना आणल्या त्यांचे प्रकल्प का अडविता ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. विनोद तावडे..

या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी कुठे तरी विचार करावा एवढेच मला आग्रहाने सांगावयाचे आहे. आम्ही माननीय मंत्री महोदयांकडे अनेक तक्रारी दिल्या. शहा हौसिंग को-ऑप.सोसायटी नावाची एक सोसायटी आहे. तेथील संबंधित विकासकाच्या बाबतीत मी स्वत: मंत्र्यांना पत्रे दिलेली आहेत. त्या विकासकाने स्वत:च्या 52 कर्मचा-यांना खोटी कागदपत्रे करुन घरे दिली. परंतु जे मूळ 40 रहिवाशी आहेत, ज्यांच्याकडे मूळ कागदपत्रे आहेत, त्यांना घरे दिलेली नाहीत. परंतु अन्य लोकांना बोगस कागदपत्रे करुन घरे दिलेली आहेत. त्याठिकाणी डी.सी.पी. देखील राहातात. 100 लोकांना शपथपत्राच्या आधारे पात्र करण्यात आले, 58 कर्मचा-यांना खोट्या सह्यांच्या आधारे खोटी कागदपत्रे तयार करुन घरे दिली. ज्या लोकांनी याबाबत तक्रारी केल्या त्यांना धमकावण्यात येत आहे. दिंडोशी पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी 20 पेक्षा अधिक तक्रारी नोंदविलेल्या आहेत. माझी या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रकरणी स्टे देऊन चौकशी करुन प्रामाणिक लोकांना घरे द्यावीत.

महिला व बालकल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 126 आणि 127 मध्ये 47.46 लाखाची आणि 1.81 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. निवडणुकीच्या काळात ज्या गोष्टी घाईघाईने झालेल्या असतात त्यासंबंधीचे मुद्दे मी मांडले. 2008-2009मध्ये 549 संस्थांना साध्या चिठ्ठीवर अनाथालय दिली. त्यानंतर विधानसभा विसर्जित झाली. नव्याने निवडणुका झाल्या. मी दिलेला प्रश्न स्वीकृत झाला की अस्वीकृत झाला हे मला समजलेले नाही म्हणून पुरवणी मागण्याच्या वेळी हा मुद्दा उपस्थित करण्याची संधी मी घेत आहे. जुन्या संस्थांना आपण अनाथालय देत नाही. परंतु ज्या खोटयानाटया संस्था आहेत त्यांना मात्र साध्या चिटो-यावर ही अनाथालये मंजूर केली जातात. 2008-2009मधील 549 संस्था आहेत. त्यासंबंधीची माहिती सभागृहाला द्यावी. आपणाला जर त्याबाबतची माहिती द्यावयाची नसेल तसे नाही म्हणून सांगावे, ती माहिती आम्ही देतो.

सभापती महोदय, मला एकच सांगावयाचे आहे की, या ठिकाणी काही खात्याचे मंत्री हजर नाहीत. परंतु आम्ही जे जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्याचे उत्तर येणे अपेक्षित आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पूरक मागण्यांमध्ये डोकावून पहात होतो. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी दुधाचा विषय मांडला त्यावेळी त्यासंबंधीची मागणी मला दिसून आली नाही.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ते म्हणाले की, महानंद डेअरी आणि आरे दुग्धशाळा गुंडाळण्याचे षडयंत्र सुरु आहे. पुरवणी मागण्यांमध्ये त्यांची मागणी का आली नाही याची मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. ही अत्यंत गंभीर बाब आहे. अर्थ विभागाकडून जाणीवपूर्वक या मागण्या डावलल्या जातात हा माझा आरोप आहे. माननीय दुग्धविकास मंत्री हे जर प्रामाणिक असतील तर अर्थ विभागाकडून झालेल्या या अन्यायाबद्दल बंड करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. बंड करण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये आहे, पक्षाच्या पलिकडे जाऊन समाजासाठी आपण बंड करता हे आम्ही अनुभवले आहे. दलित समाजाच्या व्यक्तीला क्वचित कधीतरी मंत्रीपद मिळते. म्हणून त्यांची कोंडी केली जाते. सन्माननीय श्री.रामदास आठवले यांच्या पक्षाचे एक प्रतिनिधी या राज्याच्या मंत्रीमंडळात असायचे. आता आठवलेंच्या हाती धुपाटणे आले आहे. पूर्वी त्यांच्या पक्षाचे कोणीतरी एक मंत्री असायचे. आता दलित समाजापैकी श्री.रमेश बागवे आणि तुम्ही मंत्रीपदी आहात. दुग्ध व्यवसाय विकासासाठी निधी मिळत नाही. निधी का मिळत नाही हे सांगा. मी पुरवणी मागण्यांची छाननी करीत होतो. व्हाईट बुकामध्ये पैसे दिले गेले होते. त्यामध्ये नियोजन विभागाने कपात केली. नियोजन मंत्र्यांकडून हे समजले पाहिजे. मुंबईमध्ये दुधाची परिस्थिती फार गंभीर आहे. गोरगरीब माणसांना दूध पुरविण्याचे काम आरे डेअरीकडून होत होते. होल आणि टोण्ड दूध स्वस्त दरात गरीब माणसांना मिळत होते. या मुंबईमध्ये 92 ते 93 लाख लीटर दुधाचा प्रतिदिन खप असताना आरे डेअरीकडून केवळ 1.25 लाख लीटर दूध पुरविले जात आहे. ही गंभीर परिस्थिती कोणी निर्माण केली आहे? या मागचे षडयंत्र बाहेर आले पाहिजे. तुम्ही बिनधास्तपणे बोलावे अशी अपेक्षा आहे. तत्कालीन दुग्धविकास मंत्री श्री.अनिस अहमद यांनी सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांना आव्हान देण्याचे धाडस दाखविले होते. मराठवाड्याच्या संदर्भात मराठवाडा विकास पॅकेज दिले गेले. त्या पॅकेजमधील 2 कोटी रुपये नियोजन विभागाने कमी का केले हे आपण उत्तराच्या भाषणात सांगितले पाहिजे अन्यथा नियोजन मंत्र्यांनी सांगितले पाहिजे. मराठवाड्याचे 2 कोटी रुपये का कमी केले? त्याचप्रमाणे ट्रेनिंगसाठी सरकारने पैसे दिले होते ते सुध्दा तुमच्या विभागाचे पैसे कमी करण्यात आले. त्या संदर्भात सुध्दा खुलासा झाला पाहिजे. पुरवणी मागण्यांमध्ये तुमच्या विभागाच्या मागण्या कशा येणार? विभागाला पैसे दिले जात नाही म्हणून पुरवणी मागणी सुध्दा येत नाही. त्यामुळे शासन दुधाचा व्यवसाय बंद करणार का याचे उत्तर दिले पाहिजे. दुग्ध

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

व्यवसाय विकास विभागाची जी मशिनरी आहे, जी यंत्रसामुग्री आहे ती नवीन आणणार आहोत अशा प्रकारचे वक्तव्य आपण गेल्या अधिवेशनात केले होते. गेल्या अधिवेशनात भाषण करताना आपण जे सांगितले ते ऐकून आम्हाला वाटले होते की, दुग्ध व्यवसाय विकास विभाग जोमाने पुढे वाटचाल करणार आहे. मी अधिवेशन काळात या विभागातील भ्रष्टाचार सभागृहामध्ये उघड करणार आहे. या सदनामध्ये परभणी जिल्हयातील दुग्ध व्यवसाय विभागाचा भ्रष्टाचाराचा प्रश्न मी मांडला होता. त्या भ्रष्टाचारामध्ये शासकीय दुग्ध शाळेचे व्यवस्थापक श्री.मोरे यांना व चार अधिकाऱ्यांना सदनामध्ये निलंबित केल्याचे जाहीर केले होते. त्यांचा भ्रष्टाचार उघड झाला होता हे सभागृहाला माहिती आहे. भ्रष्टाचार केला. दुधामध्ये भेसळ करुन भ्रष्टाचार केला त्या अधिकाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल व्हावयास पाहिजे होता, तो गुन्हा दाखल केला नाही. फार मोठा निधी वसूल केला गेला. आडे नावाच्या अधिकाऱ्यांबरोबर रहाल तर मंत्रीपद गमावून बसाल अशी परिस्थिती आहे. या मोरे नावाच्या अधिकाऱ्याला आडे यांनी निलंबनाच्या कालावधीत पुन्हा कामावर घेतले. इतकेच नव्हे तर त्यांना पदोन्नती दिली. सहाय्यक प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी म्हणून पदोन्नती दिली. बेकायदेशीररित्या नोकरभरती केली. गोरगरीब जनतेला जमिनी विकावयास लावून नोकरी लावण्याच्या आमिषाने पैसे वसूल केले. या मोरे नावाच्या अधिकाऱ्याबाबत निर्णय दिला पाहिजे. कायद्यांतर्गत गुन्हा न नोंदविता पदोन्नती कशी दिली? या सदनाचे पावित्र्य आहे की नाही? या सदनाला प्रतिष्ठा आहे की नाही? सरकारने या सदनामध्ये जो निर्णय जाहीर केला त्या निर्णयाला आडे नावाचा अधिकारी मुरड घालतो. हा आडे नावाचा अधिकारी कोण आहे? हा विषय मुद्दाम तुमच्यापुढे मांडला आहे. दुग्ध व्यवसाय विकास विभागाची मागणी पुरवणी मागण्यांमध्ये का आली नाही? मराठवाड्याचे 2 कोटी रुपये का कमी करण्याचे आले या संदर्भात खुलासा झाला पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, बाब क्र.1, पान क्र. 4, सामान्य प्रशासन विभागाच्या अनुषंगाने मी प्रामुख्याने बोलणार आहे.

महोदय, हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत. त्या निमित्ताने मंत्रालयाच्या रचनेत बदल व्हावा. सचिव, मंत्री, राज्यमंत्री, उप सचिव वगैरे कुठे बसतात याचा कुणालाच पत्ता लागत नाही. कारण एकाच विभागात जाण्यासाठी कधी पोटमाळा, कधी सातवा मजला तर कधी विस्तारित इमारत तर कधी समोरील 14 व्या माळयावर सुध्दा जावे लागते. अशा प्रकमारे वेगवेगळ्या मार्गाने जाण्यासाठी भुयारी मार्ग असावेत. संपूर्ण मंत्रालयाची रचना करावी, नवीन इमारतीची उभारणी करावी. सामान्य माणसाला दोन-दोन, पाच-पाच वेळा आवश्यक त्या कार्यासनाकडे अथवा टेबलकडे जावे लागते. म्हणून एकाच महल्यावर संपूर्ण विभागाचे कार्यालय असावे. त्यात सर्व सेक्शन्स, सर्व अधिकारी, राज्यमंत्री व मंत्री यांची कार्यालये सुध्दा असावीत अशी रचना करावी ही मी मागणी करतो. त्याचबरोबर मंत्रालयात प्रवेश करताना सर्वसामान्य व गोरगरीबांना बराच वेळ ताटकळत उभे रहावे लागते, म्हणून या प्रवेश प्रक्रियेत बदल करावा, ही प्रवेश प्रक्रिया हस्तांतरित होऊ शकते म्हणून प्रशासनाची संपूर्णपणे पुनर्रचना करावी व त्या ठिकाणी लखीना पॅटर्नच्या धर्तीवर ही रचना असावी अशी मी विनंती करतो.

यानंतर बाब क्र. 4, पान क्र. 5-सामान्य प्रशासन विभाग, राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे उभाररणे यासंबंधीची मागणी आली आहे. निवडणुकीपूर्वी लोकशाही आघाडीच्या जाहिरनाम्यात आश्वासित केल्याप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दादर चैत्यभूमी येथे आंतरराष्ट्रीय स्मारक भारत सरकारची इंदुमिलची जमीन त्वरित ताब्यात घेऊन उभारावे अशी माझी विनंती आहे.

त्याचबरोबर डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांची जन्मशताब्दी सुरु झालेली आहे. चीनमधील युध्दग्रस्त रुग्णांना वैद्यकीय मदत देण्याचे त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. चीन देशात त्यांची प्रतिमा मानव वेशातील देवता अशी आहे. ते मूळचे सोलापूरचे होते. माननीय सुशीलकुमार शिंदे या राज्याचे मुख्यमंत्री असताना स्मारकासाठी त्यांनी काही निधी मंजूर केला होता. तरुण पिढीला या महान व्यक्तिच्या मानवतावादी कार्याची माहिती व्हावी यासाठी त्यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी विनंती आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

यानंतर बाब क्र.5, पान क्र. 6, सामान्य प्रशासन विभाग - महान राष्ट्र पुरुषांची स्मारके व पुतळे बांधणे यासाठी ही मागणी आलेली आहे. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी या नात्याने वेळोवेळी राज्यातील जनतेच्या कामाच्या अनुषंगाने नरिमन पॉईंट भागातील मंत्रालय व विधानभवन या भागात जात असतो. या दोन्ही इमारतींच्या कार्यालयातून संपूर्ण राज्याचा कारभार चालू आहे. "हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा" त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा (घोड्यावर बसलेला) कुठेच नजरेस येत नाही. महामहीम राष्ट्रपती यांच्या हस्ते गेल्याच वर्षी सिंहासनाधिष्ठीत पुतळा विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर बसविलेला आहे. परंतु त्यावर मेघडंबरी नाही, पुतळा उन्हात आहे. म्हणून पुतळयावर मेघडंबरी बसवावी. त्याचबरोबर मंत्रालयाच्या प्रांगणात प्रवेशद्वारावर अश्वारुढ पुतळा उभा करावा, अशी विनंती आपल्यामार्फत मी शासनाला करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा पुतळा बसविल्यानंतर त्याला पुष्पहार अर्पण करण्याची परवानगी आम्हाला दिली जाईल की नाही याचीही मागणी सन्माननीय सदस्यांनी करावी. कारण नुकतेच लोकसभेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला हार अर्पण करु दिला नाही. त्याबद्दल त्यांचे कौतूक सुध्दा झाले. म्हणून मंत्रालयाच्या प्रांगणात असा पुतळा उभारल्यानंतर त्याला हार घालण्याची परवानगी आम्हाला दिली जाईल की नाही याचाही उल्लेख होणे आवश्यक आहे.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, बाब क्र. 53, पान क्र. 49-पाटबंधारे विभागाची जी मागणी आली आहे त्या अनुषंगाने मध्यम व मोठे पाटबंधारे अंतर्गत कालव्याचा विस्तार यासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे. मौजे धामापूर (ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग) हे शिवकालीन तलाव असून शासनाने सन 1975 मध्ये आदेश काढून ते ठिकाणी अधिसूचित केले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

या ठिकाणचा सांडवा जांभा नाव्याच्या दगडाचा असून तो 400 वर्षापूर्वीचा दगडात बांधलेला आहे. या बंधा-याला जीर्ण अवस्था प्राप्त झालेली आहे. जलसंपदा विभागाच्या मंत्र्यांबरोबर माझ्या ब-याच बैठका झालेल्या आहेत. त्यादृष्टीकोनातून शासन निर्णय सुध्दा निघालेले आहेत. काल्याचे बांधकाम व दुरुस्ती यासाठी 239.38 लक्ष रुपयांची शासन मान्यता जलसंपदा विभागाकडून निघालेली आहे.

सभापती महोदय, कोकणात दरवर्षी मोठया प्रमाणात पाऊस पडतो परंतु या ठिकाणी पाणी साठवण्याचे नियोजन व उपाययोजना नसल्यामुळे या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. पिके सुकून जात आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दाहोदिशा वणवण फिरावे लागत आहे.

हा तलाव व सांडवा जांभा दगडांनी बांधलेला असून मोठया प्रमाणात या ठिकाणावरुन पाण्याची गळती सुरु आहे. या तलावात भरपूर पाणी साठा आहे. या योजनेमुळे संपूर्ण मालवण शहर व आजुबाजूची सर्व खेडी पाण्याखाली येणार आहेत. त्यामुळे विशेष बाब म्हणून किमान 1 ते 10 लक्ष रुपये तरी निधी उपलब्ध करुन द्यावा व विशेष वर्क ऑर्डर काढावी. यावर्षी काम सुरु होईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे हे काम सुरु होण्यासाठी विशेष बाब म्हणून या कामास मंजुरी द्यावी. नियोजन विभागाकडून ब-याच अडचणी येत असतात परंतु या कामात तसे होऊ नये म्हणून विशेष बाब म्हणून हे काम त्वरित सुरु करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 91, पृष्ठ क्रमांक 82, नियोजन विभागाच्या वैधानिक विकास महामंडळावर माझे विचार मी आता व्यक्त करणार आहे. या महामंडळाच्या बाबतीत अति महत्वाचे गेल्या 10 वर्षात वैधानिक विकास महामंडळाचा उपयोग कोकण सोडून उर्वरित महाराष्ट्रात झालेला आहे. ज्या विभागाचा नेता प्रभावी त्या ठिकाणी निधी जास्त असे समीकरण आता तयार झालेले आहे.

विदर्भ, मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र या भागांना रेटा लावून निधी वर्ग करुन, विकासाची कामे झालेली आहेत. कोकण हा देखील महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे. परंतु कोकणासाठी कोणत्याही भरीव तरतुदी दिलेल्या नाहीत. या सार्वभौम सभागृहाने तीन वेळा चर्चा केली, एक वेळा ठराव केला, आश्वासनांची खैरात केली पण शेवटी कोकण वासियांची निराशा केलेली आहे. कोकण, विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र यांची मुदत 30 एप्रिल रोजी संपत आहे. जरुर त्याची मुदत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

वाढवा परंतु या राज्यातील कोकण व खानदेश या दोन भागांचा अनुशेष भरुन काढावा. कोकण वैधानिक विकास महामंडळ, खानदेश वैधानिक विकास महामंडळ स्थापन करावे अशी आग्रहाची मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 92, पृष्ठ क्रमांक 82, नियोजन विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम. आमदरांचा स्थानिक विकास हा बेरर् चेक असतो. हा बेरर् चेक लोकप्रतिनिधींना मिळालेला हक्काचा निधी आहे. त्यांनी सुचवलेली कामे अनेकवेळा मंजुरी, आराखडे, अंदाजपत्रके व प्रशासकीय दिरंगाई अशा अनेक कारणामुळे दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण न झाल्याने अनेक वेळा निधी लॅपस् होतो. या आमच्या हक्काच्या निधीवर गदा येऊ नये एवढीच माझी या निमित्ताने कळकळीची मागणी आहे.

प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम नसल्यामुळे दिलेली कामे लाल फितीत अडकल्यामुळे प्रशासकीय अडथळे दूर करुन कामे पूर्ण होण्यासाठी संबंधित निधी कॅरी फॉरवर्ड झाला पाहिजे. लोकप्रतिनिधींच्या निधीवर गदा आणू नये, हा निधी सुरक्षित रहावा म्हणून शासनाने संरक्षण देण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 122, पृष्ठ क्रमांक 117 उच्च व तंत्र शिक्षण विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. थोर राष्ट्रपुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज महाराष्ट्रातील या थोर पुरुषांचे अप्रकाशित साहित्य त्वरीत प्रकाशित करण्यात यावे. यासाठी पुरेसा निधी उपलबध करुन देण्यात यावा. याबाबत दुर्लक्ष केल्यास मागासवर्गीयांमध्ये तीव्र असंतोष होण्याची शक्यता आहे. त्यावर एक स्वतंत्र आयएएस दर्जाचा सचिव नेमून ही ग्रंथसंपदा जगभरात न्यावे अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) :सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 5 पान क्रमांक 6 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे.खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे अशा प्रकारचा संदेश साने गुरुजी यांनी आपल्या गीतातून दिला आहे.त्याचे स्मारक व्हावे यासाठी शासनाने ही पूरक मागणी केली आहे त्याबद्दल मी प्रथम शासनाचे अभिनंदन करतो. साने गुरुजींचे स्मारक बांधण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे . त्यांचे स्मारक लवकरात लवकर होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून या स्मारकाचे बांधकाम लवकर पूर्ण करावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंपदा विभागाची बाब क्रमांक 53 पान नंबर 49 सबंधी बोलावयाचे आहे. कालव्याच्या बांधकामासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.मराठवाडयाच्या विकासाच्या दृष्टीने कृष्णा खो-यातून 21 टीएमसी मराठवाडयाच्या वाटयाचे पाणी मराठवाडयाला मिळावे याकरिता अनेक आंदोलने करण्यात आली होती.महाराष्ट्र शासनाने तो प्रकल्प मंजूर केला असून काही टप्यांच्या कामाला सुरुवात झालेली आहे परंतु हे काम मोठे असल्यामुळे आणि आर्थिक तरतूद जास्त लागणार आहे. म्हणून या कामासाठी जेवढी तरतूद आवश्यक आहे तेवढी तरतूद लवकरात लवकर उपलब्ध करुन दिली पाहिज मराठवाडयातील शेतक-याच्या हिताचा हा प्रकल्प असल्यामुळे 21 टीएमसी पाण्यासंबधीचा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर अन्न व नागरी विभागाची बाब क्रमांक 77 पान नबंर 68 सबंधी मला बोलावयाचे . अन्न व नागरी पुरवठा विभागाने जाहिरात व प्रसिध्दी करिता पूरक मागणी केलेली आहे.गोर गरीब जनतेला स्वस्त दराने अन्नधान्य मिळाले पाहिजे तसेच स्वस्त दरात रॉकेल मिळाले पाहिजे यासाठी गावातील विविध स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून रॉकेल आणि धान्याचे वाटप गरीब माणसांना रास्त दरात केले जाते. ज्या दराने शासनाने हे धान्य पाठविलेले आहे त्या दराने तेथील लोकाना हे धान्य मिळत नाही. अशा प्रकारे अनेक भागातून तक्रारी करण्यात येतात. ज्या दराने रॉकेल देण्याचे शासनाने ठरविलेले आहे त्या दराने त्या गावातील लोकांना रॉकेल मिळत नाही.स्वस्त धान्य दुकानदार रास्त दरात धान्य आणि रॉकेल तेथील जनतेला न देता चढया भावाने विकत असतात काही वेळा या धान्याचा काळाबाजारसुध्दा केला जातो यासंबंधीच्या बातम्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ...

सातत्याने वर्तमानपत्रांतून प्रसिध्द होत असतात या पूरक मागण्या वरील चर्चेच्या निमित्ताने मला अशी मागणी करावयाची आहे की, शासनाने बीपीएल व्यक्तिसाठी वा सर्वसामान्य व्यक्तिसाठी जो दर निश्चित केलेला असेल त्याचा दरफलक दुकानाच्या समोर ठळक अक्षरात लावला पाहिजे. त्याचबरोबर पुरवठा अधिका-यांनी स्कॉड पाठवून स्वस्त धान्य दुकानदारांची महिन्यातून दोन वेळा तपासणी करावयास पाहिजे आणि जनतेशी विचारविनीमय केला पाहिजे . शासनाने ज्या दराने लोकांना धान्य वा रॉकेल त्या ठिकाणी पाठविलेले आहे त्याच दराने त्यांना मिळत आहे किंवा नाही याची खांतरजमा करुन घेतली पाहिजे जर एखादा दुकानदार काळाबाजार करीत असेल तर त्याचा परवाना रद्द केला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय,बाब क्रमांक 91 पान नंबर 82 संबंधी मला बोलावयाचे आहे वैधानिक विकास मंडळाच्या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग देण्यासबंधी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो . वैधानिक विकास मंडळाना मुदतवाढ देण्यात यावी अशा प्रकारची मागणी जनतेतून करण्यात येत आहे.मराठवाडा विकास परिषदेने काही दिवसापूर्वी औरंगाबाद, नांदेड लातूर इत्यादी ठिकाणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ मिळावी म्हणून आंदोलन केले होते. मराठवाडा विकासाला चालना देणारे हे वैधानिक विकास मंडळ असल्यामुळे शासनाने त्याला मुदत वाढ दिली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. महाराष्ट्र शासनाने कर्मचा-यांसाठी सहावा वेतन आयोग देण्याची बाब स्वीकारली असून सर्व कर्मचा-यांना असे वाटले की, सहावा वेतन आयोग सर्वच कर्मचा-यांना लागू होणार आहे परंतु आज असे दिसून येत आहे की, अजूनही काही विभागातील कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही. कृषी विद्यापीठातील शिक्षक, अनुसूचित जाती च्या आश्रमशाळेतील शिक्षक, इंजिनिअरींग पॉलिटेकनिक मधील शिक्षक आणि समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षक यांना अजूनही सहावा वेतन आयोग मिळालेला नाही. यासबंधीचा प्रस्ताव अजूनही मंजूर झालेला नसल्यामुळे व जी आर निघालेला नसल्यामुळे त्यांना सहावा वेतन आयोग अजून मिळालेला नाही सहावा वेतन आयोग राज्य सरकारी कर्मचा-याना लागू करण्यासबंधीचा निर्णय कॅबिनेटने घेतल्यानंतर तो सर्व कर्मचा-याना लागू झाला पाहिजे आज विविध विभागात जरी कर्मचारी काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ...

करीत असले तरी एकच जी.आर .काढून सर्व विभागातील सर्व कर्मचा-यांसाठी सहावा वेतन लागू व्हावयास पाहिजे. सातव्या वेतन आयोगाच्या बाबतीत तसे होईल. परंतु आता कृषी विद्यापीठातील शिक्षक, अनुसूचित जाती आश्रमशाळेतील शिक्षक,इंजिनिअरी पॉलिटेकनिक महाविद्यालयातील शिक्षक आणि समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षकांना या अधिवेशनापूर्वी सहावा वेतन आयोग लागू करण्यासबंधीचा जीआर शासनाने काढावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाची बाब क्रमांक 92 पान नंबर 82 संबंधी मला बोलावयाचे आहे. आमदार निधीच्या बाबतीत ही पूरक मागणी करण्यात आली आहे प्रत्येक आमदारांना एक कोटी रुपयांचा आमदार निधी देण्यात येत आहे ही चांगली बाब आहे परंतु हा निधी वाढविण्याची गरज आहे सभापती महोदय, आपण देखील विधान परिषदेचे सदस्य आहात आणि आपल्याला संपूर्ण राज्यासाठी निधी द्यावा लागतो.एखाद्या तालुक्याच्या आमदाराला जेवढा निधी मिळतो तेवढाच निधी विधान परिषदेच्या सदस्यालासुध्दा मिळतो. मी संपूर्ण मराठवाडयाचे प्रतिनिधित्व करतो माझ्या मतदारसंघात आठ जिल्हे आणि 78 तालुके आहेत.

नंतर श्री.सरफरे S

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

माझ्या मतदारसंघामध्ये 8 जिल्हे आहेत व 78 तालुके आहेत, 48 आमदार आणि 8 खासदारांचा मिळून मतदारसंघ आहे. एका तालुक्याच्या आमदारांना जेवढा निधी मिळतो तेवढा मला मिळतो.परंतु संपूर्ण मराठवाडयामध्ये निधी खर्च करीत असतांना आम्हाला तारेवरची कसरत करावी लागते. आम्हाला जनतेने निवडून दिले असल्यामुळे आम्हाला हा निधी वाढवून मिळाला पाहिजे अशी यानिमित्ताने मी मागणी करतो.

सभापती महोदय, आतापर्यंत एक म्हण रुढ होती की, "ज्याला लिहिता वाचता येते त्याला साक्षर म्हटले जायचे" परंतु आजच्या विज्ञान युगामध्ये ज्याला संगणक येते त्याला खऱ्या अर्थाने साक्षर म्हटले जाते. आणि म्हणून संगणक हाताळणे सर्वांना आले पाहिजे. मी माझ्या आमदार निधीमधून रस्ते घेत नाही, कोणतेही सिव्हिल वर्क करीत नाही. परंतु प्रत्येक शाळेसाठी आमदार निधीमधून संगणक घेण्याचे काम करतो. याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. ही समिती ठरविल त्या कंपनीला संगणक पुरविण्याचे आदेश दिले जायचे. आमचा आमदार निधी असल्यामुळे आम्ही ज्यांना सांगू त्या कंपनीला संगणक पुरविण्याचे आदेश दिले पाहिजेत. डीएसआरमध्ये जेवढया कंपन्या आहेत त्यामधील कंपनी निवडण्याचा आम्हाला अधिकार असला पाहिजे. चांगली कंपनी आम्हाला निवडण्याचा पर्याय आमच्याकडे असला पाहिजे. दर करार मोडून संगणक खरेदी करावे असे आम्ही म्हणणार नाही.परंतु आम्ही सुचविलेल्या कंपनीलाच संगणक पुरविण्याचे आदेश दिले पाहिजेत तसा पर्याय आपण ठेवला पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापत महोदय, दुसरी महत्वाची बाब अशी की, आमदार निधीमधून अनुदानित शाळांना साहित्य पुरविण्यात येते. आमदार निधीमधून पिण्याच्या पाण्याकरिता बोअर खोदता येते. परंतु विना अनुदानित शाळेकरिता आमदार निधी देता येत नाही. खऱ्या अर्थाने त्यांनाच आमदार निधीची जास्त गरज आहे. ज्या शाळांना अनुदान मिळत नाही त्या शाळांना आमदार निधी दिला पाहिजे. म्हणून आपण त्यासंबंधीच्या नियमामध्ये बदल केला पाहिजे व विना अनुदानित शाळांना आमदार निधी दिला पाहिजे अशी मी मागणी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

सभापती महोदय, बाब क्र. 121 व पृष्ठ क्र. 117 मध्ये ग्रंथालयांना अनुदान देण्यात आले आहे, याबद्दल मी शासनाचे हार्दिक अभिनंदन करतो. याठिकाणी आपण ग्रंथालयांना मान्यता देतांना लोकसंख्येची घातलेली अट काढून टाकली पाहिजे. "वाचाल तर वाचाल" असे म्हटले जाते. प्रत्येक माणसाने पुस्तक वाचल्यावर त्या माणसाचे मस्तक संपन्न होते. ते झाल्यानंतर तो कोठेही नतमस्तक होत नाही. म्हणून प्रत्येक माणसाने पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. याकरिता ग्रंथालयांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. याकरिता घालण्यात आलेली लोकसंख्येची अट काढून टाकली पाहिजे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र. 122 व पृष्ठ क्र. 117 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, अण्णा भाऊ साठे यांचे अप्रकाशित साहित्य प्रसिध्द करण्यासाठी 5 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. उशिरा कां होईन दै. लोकमतमध्ये छापून आलेल्या बातमीची दखल घेऊन ही मागणी करण्यात आली आहे त्याबद्दल मी अभिनंदन करतो. सभापती महोदय, बाब क्र. 124 व पृष्ठ क्र. 118 मध्ये तंत्र व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांच्या विविध प्रशासकीय खर्चाची प्रलंबित देयके चुकती करण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. मला याठिक्राणी आनंद वाटतो की, स्वत: प्राध्यापक असलेल्या मंत्रिमहोदयांकडे हे चांगले खाते दिले आहे. यानिमित्ताने माझी मागणी आहे की, आय.टी.आय. निदेशकांच्या बदल्या केल्या जातात त्यांची दोन-दोन वर्षांची देयके प्रलंबित आहेत. जर तुमच्याकडे त्यांना देण्यासाठी पैसे नसतील तर त्यांच्या बदल्या कशासाठी करता? यामध्ये शिक्षकांना व इतर समाजाला दुखावण्याचा प्रश्न कुठे येतो? म्हणून मला आपणास विचारावयाचे आहे की, आय.टी.आय. निदेशकांच्या बदल्या आपण दरवर्षी करीत असतो त्या करु नयेत. आणि शासनाचा पैसा यामध्ये वाया घालवू नये. जर एखाद्या कर्मचाऱ्याची तक्रार असेल तर जरुर त्याची आपण बदली करा. आय.टी.आय. चा निदेशक हा शेवटी शिक्षक आहे. तो दुसरा कर्मचारी नसून तो केवळ मुलांना शिकविण्याचे काम करतो. विद्यार्थी आणि शिक्षण एवढयापुरता त्यांचा मर्यादीत संबंध असतो. आणि म्हणून आय.टी.आय, पॉलिटेक्निक किंवा इंजिनिअरींगमधील शिक्षकांच्या बदल्या आपण करु नयेत. जर कुणाची तक्रार असेल तर आपण जरुर त्याची बदली करावी. बदल्या केल्यानंतर त्यांना लाखो रुपयांची प्रवास देयके आपल्याला द्यावी लागतात त्यांची बचत सुध्दा होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

सभापती महोदय, आज एम.सी.व्ही.सी. कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळत नाही. आम्ही दोन वर्षापासून यासाठी मागणी करीत आहोत. तेव्हा या कनिष्ठ महाविद्यालयांना आपण अनुदान दिले पाहिजे. आय.टी.आय., पॉलिटेक्निक, इंजिनिअरींग कॉलेजमध्ये कंत्राटी पध्दतीने निदेशक आणि अधिव्याख्याते नेमण्यात आले आहेत. सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्राध्यापिका म्हणून काम केले आहे. केवळ आठ-आठ हजार रुपये पगारावर आज ते काम करीत आहेत. जेव्हा या कॉलेजमध्ये कर्मचारी, शिक्षक नव्हते त्यावेळी या बहाद्दर लोकांनी काम केले आहे. गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचे काम पॉलिटेक्निक आणि आय.टी.आय. कॉलेजमधून या शिक्षकांनी केले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे या राज्यामध्ये जे कंत्राटी निदेशक आणि अधिव्याख्याता असतील त्यांना नियमित करण्यात यावे अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्र.142, पान क्र.145 यामध्ये अल्पसंख्यांक बहुबल क्षेत्रांसाठी बहुक्षेत्रीय विकास योजनेसाठी निधी ठेवण्यात आला आहे. मी यानिमित्ताने शासनाला विनंती करतो की, अल्पसंख्यांकांच्या बाबतीत सच्चर समितीने अहवाल दिलेला आहे. खऱ्या अर्थाने या समाजाला पुढे आणावयाचे असेल तर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणले पाहिजे. अनेक दिवसापासून लोक मागण्या करत आहेत, पण अजून शासनाने याबाबतीत निर्णय घेतलेला नाही. परंतु ज्याप्रमाणे मराठी भाषेमध्ये बालवाड्या आहेत, तशा प्रकारे उर्दू भाषेतील बालवाड्या प्रत्येक गावामध्ये जेथे मुस्लिम समाज आहे, तेथे उर्दू भाषेमध्ये सुध्दा बालवाड्या निर्माण केल्या पाहिजेत. तसेच जी शिष्यवृत्ती देण्यात येते, ती आता 10 वी इयत्तेपर्यंत देण्यात येणार आहे. माननीय मंत्री महोदय, आपण काही दिवसापूर्वी जी.आर.काढला की, ही शिष्यवृत्ती आता विद्यार्थ्यांना पदवीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी सुध्दा देण्यात आलेली आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण यामध्ये संख्या सिमित केलेली आहेत. फक्त यामध्ये दहा हजाराची संख्या ठेवलेली आहे.पण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठया संख्येने मुस्लिम समाज आहे किंवा अल्पसंख्यांक समाज आहे. त्यामुळे जेवढे विद्यार्थी शिक्षण घेतील, त्या सर्वांना ही शिष्यवृत्ती दिली पाहिजे. यामध्ये संख्येची अट असता कामा नये अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मी शेवटचा एकच मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. बाब क्र.24, पान क्र.21 यामध्ये वैरण विकास योजनेकरता निधी ठेवण्यात आलेला आहे. हे खरे आहे की, शेतकऱ्यांच्या बाबतीत मोठया प्रमाणात चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून वैरण विकासासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे आणि याचा जास्तीतजास्त शेतकऱ्यांना लाभ झाला पाहिजे अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला भाषण करण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल मी आभारी आहे. धन्यवाद.

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, खर्चाचे पूरक विवरणपत्र 2009-2010 मधील उद्योग, कामगार बाब क्र.65, पान क्र.58 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अगदी सुरुवातीला ज्यावेळी माननीय सभापतींनी नियम वाचून दाखविला, तेव्हाच मी उठून उभा राहिलो होतो. जेव्हा सदनाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे असे आपण म्हणतो, तेव्हा शासनाने देखील नियमाप्रमाणे कामकाज केले पाहिजे असे मी म्हटले तर ते चुकीचे आहे असे मला वाटत नाही. म्हणून हे शासन कामगार विभागामध्ये कशा पध्दतीने नियमबाह्य काम करीत आहे याचा मी एक नमुना आपल्यासमोर ठेवत आहे. दुर्दैवाने माननीय मंत्री महोदयांना देखील येथे बसण्यासाठी सुध्दा वेळ नाही. माननीय मुख्यमंत्री यांना देखील बसण्यासाठी वेळ नाही, माननीय उपमुख्यमंत्र्यांना देखील वेळ नाही. कामगार विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना आणि माननीय राज्यमंत्र्यांना देखील बसण्यासाठी वेळ नाही. सभापती महोदय, आम्हीच बिनकामाचे आहोत.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला नोंद घेण्याबाबत सांगितलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आणखी कुठे नावे घेतली आहेत. एकेका खात्याला कॅबिनेट मंत्री आहेत, राज्यमंत्री आहेत. त्यांचे आता काय काम चालू आहे ? ज्यावेळेला तुम्ही लाल दिव्याच्या गाड्या घेता, तेव्हा तुम्ही त्या गाड्या जनतेच्या घामाच्या पैशातून उडवता आणि याचे माननीय मंत्री महोदयांना भान असणे आवश्यक आहे. ज्यावेळी सदनामध्ये पूरक मागण्यांवर चर्चा सुरु आहे, तेव्हा येथे माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित असणे आवश्यक असते. त्यांना सदनामध्ये आले पाहिजे. मला जाणीव आहे की, सामुहिक जबाबदारी म्हणून इतर माननीय मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्यांची नोंद घेऊ शकतात, मी येथे नवीन नाही. पण शेवटी मंत्री म्हणून त्यांची काय जबाबदारी आहे ? त्यांचे काम काय आहे ? याठिकाणी नियमबाह्य काम होत आहे . . .

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, याठिकाणी चुकीची माहिती देण्यात येत आहे. विधानसभेमध्ये नगरविकास विभागाच्या संबंधात चर्चा सुरु असल्याने, तेथे वसई-विरार महानगरपालिकेच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदय तेथे उपस्थित आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल बोललो नाही. आपण कृपा करुन समजून घ्यावे. मी ज्या विभागाच्या बाबीच्या संदर्भात बोलत आहे, त्या विभागाचे दोन्ही मंत्री महोदय येथे नाहीत. माननीय कामगार मंत्री देखील उपस्थित नाहीत आणि माननीय राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत.महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ बोर्डाची मुदत दि.6 ऑगस्ट 2006 रोजी संपली. माझ्याकडे माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे आदेश आहेत की, शासनाने दोन महिन्याच्या आत नवीन बोर्डाची स्थापना केली पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

सभापती महोदय, हे शासन न्यायालयाला पण धाब्यावर बसवते. आपण सांगता की, नियमाने कामकाज झाले पाहिजे मग शासन नियमाने कामकाज का करीत नाही? हा माझा पहिला प्रश्न आहे. नागपूर खंडपीठाने आदेश दिल्यानंतर दोन महिन्यामध्ये या बोर्डाची स्थापना शासनाने कां केली नाही? याचे उत्तर सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरात मिळणे अत्यंत गरजेचे आहे. सभापती महोदय, "द बॉंबे लेबर वेल्फेअर फंड ॲक्ट 1953" माझ्या हातामध्ये आहे. यामध्ये मुद्दा क्रमांक 13 मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, हे बोर्ड 26 लोकांचे असणे अत्यंत आवश्यक आहे. असे या ॲक्टमध्ये म्हटले आहे, मी म्हणत नाही. सभापती महोदय, "The Board shall consist of following members, not exceeding twenty-six in number". या कायद्यामध्ये मुद्दा क्रमांक 4 मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, गणपूर्ती 7 सदस्यांची असली पाहिजे. सभापती महोदय, न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही शासनाने दोन महिन्यात बोर्डाची नेमणूक केली नाही त्यामुळे कोर्टाचा अवमान, कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट कसे केले आहे हे मी याठिकाणी सांगतो. दिनांक 5 ऑगस्ट, 2003 ला 26 सदस्यांचे हे बोर्ड नेमले गेले. त्यानंतर त्या बोर्डाची मुदत संपल्या नंतर पुन्हा दिनाक 6-07-2009 ला फक्त एका सदस्याचे बोर्ड नेमले गेले. श्री. बाबा सिध्दीकी तत्कालीन राज्य मंत्री, कामगार यांची नियुक्ती नियमबाहय करण्यात आली. नियमाप्रमाणे एका सदस्याचे बोर्ड होऊ शकत नाही. नियमाप्रमाणे सात सदस्यांची गणपूर्ती असल्याशिवाय बोर्डाचे कामकाज होऊच शकत नाही. मग ही एका सदस्याची नियुक्ती कशी झाली? ती कोणी केली? याला जबाबदार कोण? सभापती महोदय, मला आश्चर्य वाटते, यासंदर्भात माननीय राज्यपालांच्या नावाने राजपत्र काढण्यात आलेले आहे. माझ्याकडे त्या राजपत्राची प्रत आहे. माननीय राज्यपालांना अंधारात ठेवून राजपत्र काढण्यात येते. न्यायालयाचा अवमान माननीय राज्यपालांच्या साक्षीने करण्यात येतो हे शासनाचे काम आहे काय? हे नियमाने काम चालले आहे काय? सभापती महोदय, दि. 3.2.2010 रोजी तत्कालीन राज्यमंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली. ते कोणत्या नियमात बसते. नियमाप्रमाणे 26 सदस्य नाहीत. नियमाप्रमाणे 7 जणांची गणपूर्ती नासेल तर ते बोर्ड कसे होऊ शकते? न्यायालयाने आदेश दिल्यानंतर हे सगळे चालले आहे. दोन महिन्याच्या आतमध्ये तात्काळ या बोर्डाची स्थापना झाली पाहिजे अशा प्रकारचा माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ही अवस्था आहे. सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आता पुन्हा श्री. वळवी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

साहेबांची या बोर्डावर नियुक्ती केलेली आहे. याठिकाणी मुख्यमंत्री उपस्थित असते तर बरे झाले असते. ते यासंबंधीचे उत्तर देतील पण माझी मागणी अशी आहे की, या अनधिकृत बोर्डाच्या माध्यमातून जे जे निर्णय झालेले आहेत ते सगळेच्या सगळे निर्णय अनधिकृत आहेत. नियमबाह्य आहेत. 26 सदस्यांचे ज्यावेळी बोर्ड होते त्यावेळी ते अधिकृत होते. गणपूर्तीसाठी आवश्यक असलेले 7 सदस्य असताना जे कामकाज झाले ते अधिकृत कामकाज आहे. शासनाच्या सचिव श्रीमती कविता गुप्ता यांनी एका सदस्याची, तीन सदस्याची नेमणूक केलेली आहे. हे काय चालले आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

या तीन बोर्डाचे 2006 नंतर जेवढे कामकाज झालेले आहे ते सगळे नियमबाह्य आहे. माझ्याकडे न्यायालयाची कालची ऑर्डर आहे. मी श्रीमती कविता गुप्ता यांना नोटीस दिली आहे. हे शासन कसे चालले आहे, कसे कामकाज चालले आहे ? कालच्या बजेटमध्ये 20 हजार कोटीची ठोस तरतूद केली होती आणि आज 4800 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आपण पाहिल्या तर बाकीचे 15 हजार कोटी रुपये कोठे गेले ? नियमाप्रमाणे शासनाला सभागृहाची मंजुरी घेतल्याशिवाय एक पैसाही खर्च करता येत नाही. कोठे नियमाने काम चालू आहे ? "जिसके हाथ में लाठी उसकी भैस" किंवा "ज्याच्या हातात ससा तो पारधी"अशी परिस्थिती आहे. फावडे माती आपल्याकडे कसे ओढते याचे हे उदाहरण आहे. सभापती महोदय, नियमबाह्यपणे या बोर्डाची स्थापना केली, कोर्टाचा अवमान केला याबाबतीत मला माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर पाहिजे. सभापती महोदय, मी आपल्याकडे कोर्टाची ऑर्डर पाठवतो. नागपूर खंडपीठाने जी ऑर्डर दिलेली आहे ती मी आपल्याकडे पाठवतो. सभापती महोदय, या बोर्डाने घेतलेले सगळे निर्णय, सन्माननीय राज्यमंत्री श्री. वळवी यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेले निर्णय तसेच हे बोर्ड तात्काळ बरखास्त झाले पाहिजे. मघाशी सांगितल्याप्रमाणे "The Board shall consist of following members, not exceeding twenty-six in number" याप्रमाणे तसेच "The Bombay Labour Welfare Fund Act, 1953" याप्रमाणे या बोर्डाची स्थापना तात्काळ झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कामगार मंडळाचे काम कसे चालले आहे ? फावडे माती आपल्याकडे कशी ओढते हे मी मघाशी सांगितले. महाराष्ट्र कामगार मंडळामध्ये झालेला भ्रष्टाचार, त्या ठिकाणी झालेली 19 बांधकामे, महाराष्ट्र कामगार मंडळामध्ये झालेली नोकरभरती यासंदर्भात ज्यावेळी न्यायालयामध्ये याचिका दाखल झाली त्यावेळी शासनाने याची सगळी चौकशी करण्यासाठी श्री. मुखोपाध्याय समिती नेमली. त्या समितीचा अहवाल माझ्याकडे आहे. या समितीने सहा महिन्यामध्ये अहवाल सादर करावा अशे शासनाने निदेश दिले होते. 2007 मध्ये मुखोपाध्याय समितीने आपला अहवाल सादर केला. आज 2010 साल चालू आहे. तीन वर्षे शासन झोपले होते काय ? शासनाने या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

काळात काय केले ? या समितीने शासनावर ठपका ठेवलेला आहे. मी मुद्दाम हा पूर्ण अहवाल वाचून काढला. सभापती महोदय, मी आपल्याकडे हा अहवाल पाठवतो. आता न्यायालयाने विचारले की, बोर्डाने काय निर्णय घेतले आणि त्याची काय अंमलबजावणी केली ? त्या बोर्डाच्या आयुक्तांना सचिवांनी बडतर्फ केले. खरे तर सचिवालाच बडतर्फ करावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

ते झाले नाही. म्हणजे उलटया बोंबा. माननीय न्यायालयाने दिनांक 17 मार्च, 2010 रोजीच्या आदेशात असे म्हटले आहे की, या मंडळामध्ये जी नोकर भरती झाली आहे त्यात प्रामुख्याने मंडळातील लोकांच्या नातेवाईकांची झाली, पेपर तपासण्याचे काम सुध्दा त्यांच्या नातेवाईकांनीच केले आहे. माझ्याकडे न्यायालयाचे आदेश आहेत. मग कसले हे शासन, या शासनाचे काय काम चालले आहे ? कसले बोर्ड, या बोर्डाचे कोणासाठी काम चालू आहे ? एवढे सगळे होत असताना त्यांना सभागृहात बसण्यासाठी वेळ मिळत नाही. या मंडळामध्ये नातेवाईकांची भरती होते, त्यांच्याकडे पेपर तपासण्याचे काम दिले जाते, पण सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यासाठी मंत्र्यांकडे वेळ नाही. या मंडळाची 19 बांधकामे झाली आहेत. मुखोपाध्याय समितीने म्हटले आहे की, शासनाने स्थगिती दिल्यानंतर मंत्र्यांनी जाऊन उद्घाटने, भुमिपूजने केली आहेत. याबाबत कोर्टाने जाब विचारल्यानंतर आयुक्तांना तोंडघशी पाडता, त्यांचा बळी घेता ? माझ्याकडे याबाबतची सर्व कागदपत्रे आहेत. 2003 च्या बांधकामांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करीत असताना सचिवांनी आताच्या डीएसआरप्रमाणे पैसा वाढवून दिला. त्यावेळी रेट वाढवून दिला म्हणून त्याची चौकशी सुरु होती. परंतु आता सचिवांनी रेट वाढवून दिल्यावर त्याची चौकशी कोण करणार आहे, सचिवांची चौकशी कोण करणार आहे ? अंधर नगरी...पुढे मी बोलणार नाही. या सगळया बांधकामांची, सचिवांची चौकशी करण्यात यावी. मुखोपाध्याय समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी का झाली नाही ? त्या समितीने म्हटले होते की, सार्वजनिक बांधकाम खात्याकडून याची चौकशी करावी, परंतु चौकशी झाली नाही. सभापती महोदय, 2009 मध्ये मंडळाने बांधकाम हातामध्ये घेतले आहे. त्या कामाची 9 दिवसामध्ये टेंडर प्रक्रिया पूर्ण केली गेली. त्याबाबतची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. म्हणून या मंडळाचे कोण अध्यक्ष असतील, कोण सचिव असतील या सगळयांची चौकशी होणार आहे किंवा नाही ? याचे उत्तर मिळणे अत्यंत गरजेचे आहे. सन 2008-09 च्या डीएसआरप्रमाणे बिले दिली गेली आहेत. दिनांक 17 मार्च, 2010 रोजी न्यायमूर्ती श्री.जे.एस.भाटिया आणि न्यायमूर्ती श्री.रिबेलो यांनी दिलेल्या आदेशात असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र कामगार मंडळामध्ये झालेल्या नोकर भरतीबाबत दाखल केलेली याचिका दिनांक

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.रामदास कदम....

15.11.2006 रोजी निकालात काढली होती. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने असे आश्वासन दिले होते की, महाराष्ट्र कामगार मंडळामध्ये झालेल्या नोकर भरतीबाबत झालेल्या घोटाळयाबाबतची चौकशी करण्यासाठी संयुक्त समिती नेमली जाईल व त्याचा अहवाल सादर केला जाईल. आता न्यायालयासमोर आलेल्या बाबी धक्कादायक आहेत. न्यायालयासमोर महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन असे दिसून आले की, नोकर भरतीमध्ये निवड झालेले उमेदवार हे कामगार मंडळाच्या सदस्यांचे नातेवाईक असून नोकरी भरतीच्या वेळी उत्तर तपासणारेही सदस्यांच्या जवळचे नातेवाईक आहेत. आजपासून 15 दिवसाच्या आत राज्य शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी करुन अहवाल सादर करावा. सभापती महोदय, हे शासन....

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहाचे पहिले सत्र सकाळी 11.45 वाजता संपणार आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण बोलत असाल तर मी येथेच थांबतो. मला काही अडचण नाही. परंतु मला एक गोष्ट कळली पाहिजे. माझ्या ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून मी विचारतो. या सभागृहाचे कामकाज दिनांक 23 एप्रिल पर्यंत चालणार आहे. म्हणजे आणखी एक महिना आहे. दुपारच्या सत्रामध्ये मंत्री महोदयांची उत्तरे होणार आहेत हे मला माहीत आहे.

तालिका सभापती : सकाळच्या सत्रामध्ये सन्माननीय सदस्यांची भाषणे होणार आहेत.

श्री.रामदास कदम : दुपारच्या सत्रात पुन्हा चर्चा होणार असून त्यानंतर उत्तरे होणार आहेत. मला जाणून घ्यावयाचे आहे की, दि. 23 एप्रिलपर्यंत आपण कोणते कामकाज करणार आहोत ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

हे अधिवेशन आणखी एक महिना चालणार आहे. पुरवणी मागण्यावरील चर्चा संपेल. त्यानंतर 25 मार्चला अर्थसंकल्प सादर होईल. त्यावरील चर्चा संपली की पुढे एक महिना आपण काय करणार आहात हे मला समजले पाहिजे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेवर आमची तोंडे बंद करणे योग्य नाही. एकाच दिवशी 8-10 विभागाच्या मागण्या चर्चेला घेतल्या जातात आणि कमी वेळात बोलण्यास सांगितले जाते. पुढचा एक महिना आपण कोणते कामकाज करणार आहात ? मग कामकाज नाही असे सांगून अधिवेशन लवकर संपविले जाईल. सभापती महोदय, मला अनेक विषयावर बोलायचे असून या सरकारचा पर्दाफाश करावयाचा आहे. सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. तेव्हा आपण सांगत असाल तर माझी बसण्याची तयारी आहे.

श्री एस.क्यू. जमा : सभापती महोदय, सम्माननीय सदस्य श्री रामदास कदम श्रम विभाग के बारे में जो कह रहे हैं, मैं उस संबंध में अपनी सहमति व्यक्त करता हूं. मेरा औचित्य का मुद्दा यह है कि, जब भी इस सदन के सम्माननीय सदस्यों को किसी विषय पर बोलने के लिए समय देने की बात होती है तो सभापति महोदय गाईडलाईन देते है कि प्रत्येक सदस्य को बोलने के लिए इतने मिनट दिए जाएंगे. लेकिन हम देखते हैं कि कुछ सदस्य जब बोलने के लिए खड़े होते हैं तो जितना समय चाहते हैं उतने समय तक वे बोलते हैं. लेकिन हम जब बोलने के लिए खड़े होते हैं तो समय सीमा आ जाती है. घंटी बजायी जाती है. क्योंकि हम अग्रेसिव्ह नहीं होते हैं, चिल्लाते नहीं है, आंग पर नहीं आते हैं, इसलिए हमारे लिए समय सीमा होती है. जैसा कि अभी सम्माननीय सदस्य श्री रामदास कदम ने बताया कि यह अधिवेशन और चार सप्ताह चलने वाला है. आज अभी पूरक मांगों पर चर्चा हो रही है. हमारी तरफ के सदस्य जब बोलने के लिए खड़े होते हैं तो 2-3 मिनट होते ही भाषण समाप्त करने का संकेत देने के लिए घंटी बजायी जाती है. माननीय सभापति और माननीय उप सभापति भी यही करते हैं. इसलिए मेरा अनुरोध है कि बी.ए.सी. में इस विषय पर चर्चा करके भाषण करने के लिए समय सीमा तय की जाए. सभी सदस्यों को बोलने के लिए समान समय मिलना चाहिए. विरोधी पक्ष के नेता, गट नेता के लिए भी समय सीमा तय की जाए. लोकसभा एवम् राज्य सभा में ऐसी पध्दति है कि वहां जो समय तय किया जाता है, वह समय समाप्त होने के बाद सभापति महोदय भाषण कर्ता का माईक बंद कर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.क्यू. जमा....

देते हैं. हम नियम मानते हैं. इसलिए समय सीमा के संबंध में निर्णय होना चाहिए. पहले इस संबंध में निर्णय दें, फिर आगे का काम होना चाहिए. हमें भी भाषण करने के लिए पूरा समय मिलना चाहिए, नहीं तो हम भी अग्रेसिव्ह कदम उठाएंगे, धरने पर बैठेंगे.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. जमा यांनी मांडलेले मुद्दे चुकीचे नाहीत. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. आणखी एक महिना अधिवेशन चालणार असल्यामुळे पुरवणी मागण्यावरील चर्चेसाठी आणखी एक दिवस वाढविण्यास काही प्रत्यवाय नाही. सर्व सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी द्यावी.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चा ही संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असते. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांना सविस्तर चर्चा करता येईल. पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी संबंधित बाबीवरच बोलण्याचा प्रघात आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांनी काही चांगल्या गोष्टी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. अर्थसंकल्पावरील चर्चा 7 दिवस होऊ शकते. परंतु सन्माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री ती चर्चा एक-दोन दिवसात संपवितात. तेव्हा आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे की, पुरवणी मागणवरील चर्चेसाठी केवळ दोन दिवस देऊन रात्री 10-10 वाजेपर्यन्त बसून घाईघाईने कामकाज उरकून घेतले जाते. तेव्हा नियमामध्ये ज्या तरतूद आहेत त्याप्रमाणे कामकाज व्हावे. सन्माननीय मंत्री महोदयांनी तसे सरकारला सांगावे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : कामकाज सल्लागार समितीमध्ये या संदर्भात चर्चा करु.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज नियमाने चार तास चालले पाहिजे. आम्ही कामकाजाच्या निमित्ताने दहा-दहा तास सभागृहामध्ये बसतो. जर नियमावर बोट ठेवले जात असेल तर आम्हाला वेगळ्या पध्दतीने बोलावे लागेल.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.45 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. आज विदर्भातील संपूर्ण तालुक्याच्या ठिकाणी वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी जेल-भरो आंदोलन सुरु झालेले आहे.....

सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांना अद्याप मी परवानगी दिलेली नाही. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आज माझ्याकडे नियम 289 अन्वये एकूण 2 प्रस्ताव आलेले आहेत. त्यापैकी पहिला प्रस्ताव सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी सकाळी 8.55 वाजता दिलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की, "विदर्भ महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर विदर्भाच्या विकासाकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांच्या सतत वाढत असलेल्या आत्महत्त्या, कर्जमाफीचा फायदा शेतकऱ्यांना न होता धनिकांना अधिक होणे, वेगळ्या विदर्भाच्या दीर्घकाळ मागणीकडे झालेले दुर्लक्ष" असा आहे.

याच पध्दतीचा एक प्रस्ताव 23 डिसेंबर रोजी नागपूर अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी मांडला होता. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे त्याबाबतीतील भाषण झालेले आहे, परंतु तो प्रस्ताव आपण त्या ठिकाणी थांबविला होता. त्यानुसार आपण दोन मिनिटे यासंदर्भात आपले विचार मांडावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज संपूर्ण विदर्भभर जेल भरो आंदोलन वेगळ्या विदर्भासाठी सुरु आहे. या आंदोलनात सर्वपक्षीय लोक सामील झालेले आहेत. त्यात प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्ष तसेच भारतीय जनता पक्ष आणि आरपीआय असे सर्व पक्षाचे लोक सामील झालेले आहेत. आतापर्यंत लाखो लोकांना अटकही झालेली आहे. या ठिकाणी सुध्दा जवळपास 19 आमदारांनी विधानभवनासमोर सत्याग्रह केला होता व त्यांनाही अटक करण्यात आली आहे. विदर्भाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. गेली 50 वर्षे या विदर्भातील जनतेवर अन्याय व अत्याचार होत आहे. नागपूर कराराचे पालन झाले नाही त्यामुळे हजारो कोटीचा बॅकलॉग निर्माण झाला त्यामुळे विदर्भ मागासलेलाच राहिला. विदर्भात रस्ते, आरोग्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सोई व उद्योग सुध्दा आले नाहीत. शाळांची कोणतीही व्यवस्था नाही अशा परिस्थितीत वेगळ्या विदर्भाची मागणी जनतेमध्ये निर्माण झाली. नागपूर कराराप्रमाणे राज्यकर्त्यांनी दिलेल्या सुचनांचे पालन केले नाही त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप झाले नाही म्हणून आज हा प्रश्न ऐरणीवर आला असून त्यातूनच वेगळया राज्याची मागणी होत आहे. या आंदोलनात हजारो लोक जेलमध्ये गेली म्हणून सभागृहासमोर असलेले कामकाज बाजूला सारुन या विषयासंबंधी चर्चा घडवून आणावी. तसेच वेगळ्या विदर्भासंबंधीची जनतेची मागणी शासनासमोर यावी म्हणून शासनातील कार्यकर्ते सुध्दा यात सामील झाले आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा व्हावी अशी मी मागणी करतो.

सभापती : दुसरा प्रस्ताव सर्वश्री दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, ॲड. अनिल परब, श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "राज्यशासनाच्या कारभारात मराठीचा वापर करावा असे आदेश शासनाने काढले असूनही मराठी शाळांना परवानगी दिली जात नाही. मराठी शाळांच्या प्रस्तावांना मान्यता दिली जात नसल्याने राज्यातील मराठी मुलांवर होत असलेला अन्याय याबाबतीत फेरविचार करुन तातडीने शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता" असा प्रस्ताव दिलेला आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा मराठी आहे असे नाही तर या महाराष्ट्रामध्ये अस्सल मराठी रक्ताची, मराठी नात्याची, मराठी कुळाची, मराठी कुळ सांगणारी माणसे राहतात. या राज्यात त्यांच्या येणा-या पिढीला मराठी भाषेतून शिक्षण घेण्याचा जन्मसिध्द अधिकार आहे व राज्यातील जनतेला मराठी भाषेतून शिक्षण उपलब्ध करुन देण्याचे उत्तरदायित्व या शासनावर आहे. असे असतांनाही माननीय शिक्षणमंत्र्यांनी धुळे येथे जाहीर केले की, नवीन 8000 मराठी शाळांना मान्यता आम्ही कोणत्याही परिस्थितीत देणार नाही. 8000 मराठी शाळांना मान्यता दिली तर आम्हाला अनुदान द्यावे लागेल त्यामुळे आम्ही या राज्यात मराठी शाळांना मान्यता देणार नाही. या महाराष्ट्र शासनाची तिजोरी मराठी शाळांकरिता रिकामी होण्यासाठी जर अशा प्रकारे प्रतिबंध होणार असेल तर ती निषेधार्ह बाब आहे. या राज्यातील मराठी शाळा चालल्या पाहिजेत, मराठी भाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे अशी घटनात्मक तरतूद आहे. या शासनाने या राज्यातील 8000 मराठी शाळांना मान्यता न देण्याची संकल्पना जाहीर केलेली आहे व हीच बाब निषेधार्ह आहे. त्यामुळे सर्व कामकाज थांबवून या बाबीवर तातडीने चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मराठी शाळेच्या बाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे याबाबत शासनाने धोरण जाहीर करण्याची आवश्यकता आहे. भविष्यात शासन इंग्रजी शाळांनाच मान्यता देणार आहे काय? याबाबत शासनाने आपले धोरण जाहीर करण्याची आवश्यकता आहे. हा विषय महाराष्ट्राच्या अस्मितेचा असल्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन तातडीने या विषयावर चर्चा करावी अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. धन्यवाद.

सभापती : याबाबतीत पहिला जो प्रस्ताव आहे त्याबाबत मी मघाशी बोलतांना असे सांगितले आहे की, 23 डिसेंबर, 2009 रोजी माननीय माणिकराव ठाकरे यांनी प्रस्ताव दिला होता तो याच पध्दतीचा होता. आजचा तुमचा जो प्रस्ताव आहे तो थोडा वेगळा आहे. माननीय माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव दिलेला होता. त्यामध्ये प्रा. बी.टी. देशमुख आणि अन्य सदस्यांची नावे आहेत. या अपूर्ण राहिलेल्या प्रस्तावाबाबत 26 तारखेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करु व तो प्रस्ताव 29, 30 तारखेला घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय माणिकराव ठाकरे यांचा प्रस्ताव वैधानिक विकास मंडळासंबंधीचा आहे. वैधानिक विकास मंडळाची मुदत 30 एप्रिल, 2010 रोजी संपत आहे म्हणून वैधानिक विकास मंडळाला पुन्हा मुदतवाढ मिळावी यासंबंधिचा तो प्रस्ताव आहे आणि आज वेगळया विदर्भासंबंधी आंदोलन होत आहे. विदर्भातील जनतेच्या भावना तीव्र आहेत. विदर्भात इरिगेशनचा हजारो कोटीचा बॅकलॉग अजून सुध्दा आहे. आज विदर्भातील शेतीला पाणी मिळत नाही. या ठिक्राणच्या जनतेला आज पिण्यासाठी सुध्दा पाणी मिळत नाही. विदर्भात वीज तयार होते परंतु आज सुध्दा विदर्भात 18-18 तासाचे लोडशेडींग सुरु आहे. म्हणून वेगळया विदर्भाच्या मागणीच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली पाहिजे अशा प्रकारची आमची मागणी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय माणिकराव ठाकरे यांचा प्रस्ताव वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भातील आहे असा आमचा समज आहे. त्यांनी जर वेगळया विदर्भाचा प्रस्ताव मांडला असेल तर त्याची माहिती आम्हाला मिळण्याची आवश्यकता आहे. माननीय माणिकराव ठाकरे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. माझ्या माहिती प्रमाणे आम्ही सर्व पक्षीय वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव आपल्याच विनंतीने सादर केला होता. यासंदर्भात आपण स्वत: यामध्ये पुढाकार घेतला असल्यामुळे मी आपले त्यावेळी आभार मानले होते. अखंड महाराष्ट्रात तीनही वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ मिळाली पाहिजे असा माननीय माणिकराव ठाकरे साहेबांचा प्रस्ताव असावा. जर माननीय माणिकराव ठाकरे यांनी अखंड महाराष्ट्राच्या 3 वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव मांडला असेल आणि माणिकराव ठाकरे हे विदर्भाचे असतांना तसेच ते काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असतांना वेगळया विदर्भाचा प्रस्ताव त्यांचा असेल तर तो काँग्रेस करिता प्रश्न तर आहेच आणि तसा नसेल तर त्यांच्या बाबतीत एक वेगळा संदेश बाहेर जाईल. त्यामुळे या सदनाचे सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या बद्दलचा अपप्रचार आणि गैरसमज बाहेर निर्माण व्हावयास नको. त्यामुळे यासंदर्भात आपल्याकडूनच खुलासा व्हावा अशी आमची अपेक्षा आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मला आनंद आहे की, सन्माननीय दिवाकर रावते हे काँग्रेसची आणि माननीय माणिकराव ठाकरे यांची काळजी घेत आहेत त्यामुळे मी सभागृहात त्यांचे आभार मानतो. मला माहिती आहे की, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटी विदर्भाच्या विकासासंबंधीची चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी जो मुद्दा काढलेला आहे त्यासंदर्भात सर्व सदनाचे एकमत आहे असे नाही तर वेगवेगळे विचार यासंदर्भात असू शकतात. माननीय माणिकराव ठाकरे यांनी जी चर्चा सुरु केली होती ती विदर्भाच्या विकासात्मक चर्चेच्या अनुषंगाने शासनाची काय भूमिका असावी याबाबतीतील चर्चा आहे. जी काही चर्चा झालेली आहे ती रेकॉर्डवर आहेच त्यामुळे वेगळे सांगण्याचे काही कारण नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण...

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली होती आणि ती चर्चा महत्वाची आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये त्या बाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव मांडला होता तो अत्यत सीमित आहे. वैधानिक विकास मंडळाची मुदत 30 एप्रिल 2010 रोजी संपत आहे. त्यामुळे या वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ देण्यासांबंधीचा तो प्रस्ताव अत्यंत सीमित आहे. वेगळया विदर्भाच्या संदर्भात किवा बॅकलॉगच्या संदर्भात त्यात चर्चा होऊ शकते. परतु विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ ,कोकण व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ इत्यादीची मुदत संपत आलेली असल्यामुळे त्याना केन्द्र सरकारने मुदतवाढ द्यावी म्हणून केन्द्र सरकारला शिफारस करण्यासंबंधी तो प्रस्ताव आहे. वेगळया विदर्भाच्या संदर्भात तो प्रस्ताव नाही. परंतु आज वेगळया विदर्भाच्या संदर्भात आम्ही प्रस्ताव दिलेला आहे. वेगळया विदर्भासाठी विदर्भामध्ये आंदोलन सुरु आहे. विदर्भातील प्रत्येक तालुक्यच्या स्तरावर हे आंदोलन सुरु आह. कॉग्रेस राष्ट्रवादी कॉग्रेस त्यामध्ये सामील झालेले आहेत अशा प्रकारे सर्व पक्षीय आंदोलन सुरु आहे त्यामुळे यावर चर्चा व्हावयास पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री जे म्हणाले त्याचे मी स्वागत करतो. मी कॉग्रेस पक्षाची भलामण करतो म्हणून तुम्हाला आंनद झाला, वा गुदगुल्या झाल्या आहेत.त्याबद्दल मला बरे वाटले. अखंड महाराष्ट्राकरिता शिवसनेच्या आंदोलनामध्ये कॉग्रेससहित जे जे पक्ष सामील होतील त्याचे आम्ही स्वागतच करु किंबहुना अखंड महाराष्ट्राकरिता सर्व पक्षानी एकत्र होऊन अखंड महाराष्ट्र टीकवू या अशीच आमची भूमिका राहणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वेगळया विदर्भासाठी आमचा विरोध आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी 106 जणांनी हौतात्म्य पत्करलेw आहे.त्यामुळे वेगळया विदर्भाच्या विषयावर आम्ही चर्चा होऊ देणार नाही.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय ..

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

(घोषणा)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव या सभागृहात दिला होतो तो प्रस्ताव विधानमंडळाच्या कार्यालयात आहे. त्या प्रस्तावावर चर्चा सुरु असून सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे ऑन लेग आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविलेले कामकाज अत्यंत महत्वाचे आहे. सभापती महोदय, या बाबतीत आपण निर्णय द्यावा आणि पुढील कामकाज घेण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव दिला होता तो रेकॉर्डवर आहे. त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनीसुध्दा आता हेच सांगितलेले आहे तेव्हा पुढचे कामकाज सुरु करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

(विरोधी पक्षाच्या काही सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात)

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांचे वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.अशा प्रकारचे अनेक प्रश्न देशात निर्माण झालेले आहेत व त्या संबंधी केन्द्र सरकारने एक समिती नियुक्त केलेली आहे त्या समितीच्या माध्यमातून या विविध मागण्यांचा साकल्याने विचार होणार आहे. ही बाब त्या समितीच्या विचाराधीन असतांना या ठिकाणी अशा प्रकारचा प्रस्ताव करणे अयोग्य होईल. म्हणून हरकतीच्या मुद्याव्दारे माझी आपल्याला अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार मांडू देऊ नयेत. माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर ते ऑन लेग आहेत असे माननीय मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण यांनी सागितलेले आहे त्यामुळे त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विकासाच्या मुद्यावर आपण चर्चा करु शकतो परंतु वेगळया विदर्भाच्या विषंयावर सन्माननीय सदस्यांना बोलू देता कामा नये.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

(गोंधळ)

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी, माननीय सदस्य श्री. सय्यद जमा आपण कृपया खाली बसावे...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, या सभागृहामध्ये 105 हुतात्म्यांचा उल्लेख ज्या पध्दतीने झाला ते योग्य नाही. ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान संयुक्त महाराष्ट्रासाठी दिले आहे, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा योग्य तो सन्मान राखला गेला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. त्या काळात कै. रामभाऊ म्हाळगी, एस.एम. जोशी यांच्यासारखे नेतेमंडळी संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने पुढे आले होते. त्याचप्रमाणे नागपूरहून कॉ. अे.बी. वर्धन हे देखील संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने पुढे आले होते. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते याबाबतीत जी दुटप्पी भूमिका घेत आहेत हे बरोबर नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी सांगितल्याप्रमाणे आपण या विषयावर चर्चा करु शकतो.

(गोंधळ)

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. आपके माध्यम से सभागृह के सभी माननीय सदस्यों और माननीय मुख्यमंत्री से मेरी गुजारिश है कि संयुक्त महाराष्ट्र के बारे महाराष्ट्र के लोगों की जो भावना है, पश्चिम महाराष्ट्र के लोगों की जो भावना है, वही भावना विदर्भ के लोगों की है. संयुक्त महाराष्ट्र की लड़ाई में जो लोग हुतात्मा हुए हैं, उनके प्रति विदर्भ के लोगों में सम्मान है. अलग विदर्भ के बारे में राजनैतिक पार्टियों के विचार अलग अलग है और अलग विदर्भ के बारे में विदर्भ की जनता की भावना जायज है या नहीं, इस पर चर्चा हो सकती है.

श्री. दिवाकर रावते : माननीय सदस्यांनी त्यांचा हरकतीचा मुद्दा काय आहे ते सांगावे?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा सुरु केली आहे काय?

(गोंधळ)

. . . Z 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. मैं यह कह रहा था कि संयुक्त महाराष्ट्र के आंदोलन में जो लोग हुतात्मा हुए हैं, उनके प्रति विदर्भ की जनता के मन में सम्मान की भावना है. भारतीय जनता पार्टी की राष्ट्रीय स्तर की समिति ने अलग विदर्भ के बारे में निर्णय लिया है, उनको इस बारे में चर्चा करने का अधिकार है. लेकिन कांग्रेस पार्टी के हमारे नेताओं, हमारी पार्टी की राष्ट्रीय स्तर की समिति, हमारे माननीय मुख्यमंत्री और हमारे प्रदेश अध्यक्ष ने इस बारे में नेगेटिव व्यू नहीं लिया है. विरोधी पक्ष की राष्ट्रीय स्तर की समिति ने अलग विदर्भ को मान्यता देने के बारे में निर्णय लिया है, उन्हें सभागृह में अपनी बात रखने का अधिकार है. हम सम्पूर्ण महाराष्ट्र के प्रति सम्मान रखते हैं, लेकिन विदर्भ की जनता की मांग सिंचन, विकास और बॅकलॉग दूर करने के बारे में है और उनकी मांग पूरी होनी चाहिए. हम सभी माननीय सदस्य एक दूसरे का सम्मान करें, ऐसा मेरा आपसे अनुरोध है.

सभापती : ठीक आहे. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी कोणतीही चर्चा करु इच्छित नाही. माझी आपणास अशी विनंती आहे की, या विषयासंबंधी या सभागृहामध्ये प्रत्येकाची भूमिका आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी त्यांची भूमिका मांडावी. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या सभागृहामध्ये प्रत्येकाला आपली भूमिका मांडता आली पाहिजे. सभागृहाच्या पटलावर प्रत्येकाची भूमिका येईल. याठिकाणी 105 हुतात्म्यांविषयी आमच्या मनामध्ये सन्मान आहे. हुतात्म्यांविषयी आम्ही अवमान करणार नाही. आपण याठिकाणी चर्चा कशासाठी थांबविली आहे? लहान राज्यांना आमची मान्यता आहे, छोटे राज्य असले की विकास होतो. त्याबद्दल आम्ही आमची भूमिका मांडू इच्छितो. हे वरिष्ठांचे सभागृह असल्यामुळे या सभागृहाला जे मान्य असेल त्यासंबंधी हे सभागृह निर्णय घेईल. त्यामुळे या विषयावर चर्चा करावयाची नाही हे बरोबर नाही.

श्री. उल्हास पवार : आमचा चर्चेला विरोध नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुद्दा मांडला की, माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे विदर्भाच्या विकासाच्या प्रस्तावावर ऑन लेग आहेत. त्या विषयावर आपण चर्चा करु शकतो. त्यामधून जनतेमध्ये वेगळा मेसेज गेला पाहिजे. परंतु तसे न होता याठिकाणी जे झाले ते माझ्या मनाला खेद देणारे होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी एक मिनिटामध्ये बोलावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आमच्या बोलण्यासाठी सुध्दा मीटर लागावे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे.

सभापती : तसे नाही. ज्यावेळेला असा विषय येईल तेव्हा तुम्ही . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण ऐकून घ्यावे. आम्हाला एखाद्या वेळेस तरी म्हणणे मांडू द्यावे.

सभापती : आपण कायमच म्हणणे मांडत असता. उलट हा प्रिसायडींग ऑफीसरवर अन्याय होईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण कायम येथे जे विषय मांडत असतो, त्यापेक्षा हा वेगळा विषय आहे आणि आपण मला परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सुरुवातीला आपण आमचे विचार दोन मिनिटांमध्ये ऐकून घेतले तर मी आपला अत्यंत आभारी होईन.

सभापती महोदय, त्यादिवशी अर्थसंकल्पावर भाषण करीत असताना माननीय अर्थमंत्र्यांनी असे सांगितले की, आर्थिक अनुशेष संपलेला आहे, त्या दिवशी ही विघटनाची प्रक्रिया मोठया प्रमाणात सुरु झालेली आहे हे आपण लक्षात घ्यावे, ते योग्य नाही, ती ॲरेस्ट केली पाहिजे. विरोधी पक्षनेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याबाबत सांगावयाचे तर विदर्भाच्या संपूर्ण भागामध्ये जो महाराष्ट्रातील एक फार मोठा भाग आहे तेथे एक ज्वलंत भावना निर्माण झालेली आहे. त्या बाबतचे विचार हे ज्यावेळेला ठराव चर्चेसाठी येईल तेव्हा आम्ही निश्चितपणे मांडू. पण ही चर्चा होऊच देणार नाही असे म्हणणे हे अत्यंत योग्य नाही असे मला वाटते. मी माझे मत मांडण्यासाठी प्राण देईन पण इतरांना सुध्दा त्यांची मते मांडता आली पाहिजेत यासाठी सुध्दा मी तेवढाच आग्रही असावयास पाहिजे. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आम्ही त्यादिवशी अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये आमचे विचार मांडलेले आहेत. मी माझे म्हणणे मांडले, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी त्यांचे म्हणणे मांडले. सन्माननीय श्री.अजितदादा पवार आणि त्यावेळचे माननीय अर्थमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे दोघेही उत्तर देण्यास तयार होते. पण तेव्हा चर्चाच झाली नाही. ही निवडणुकीच्या अगोदरची गोष्ट आहे. त्यादिवशी अधिवेशन संपले. मग हा विषय अनिर्णित राहिला

. . . .2ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि मग त्यावर कोणीही काही बोलले नाही. आमचे म्हणणे असे आहे की, तुम्ही रुपयामध्ये जी किंमत काढत आहात, तितके 1994 सालातील रुपये खर्च केले म्हणजे मग अनुशेष दूर झाला असे म्हणत आहात याचे विदर्भातील सर्व लोकांना अतिशय आश्चर्य वाटत आहे. आपल्याला आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये ज्यातऱ्हेने राज्य चालू आहे, कोळशावर आधारित 47 वीज निर्मिती प्रकल्प ओरबाडण्याचे काम सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये सांगितले होते की, तीन रद्द केले, एका बाबत पुनर्विचार करु. पण काहीही पुनर्विचार झालेला नाही. रद्द केलेला एक प्रकल्प जिवंत झाला आणि लोकांच्या मनामध्ये आज अत्यंत तीव्र अशी भावना आहे. याला ॲरेस्ट करा. माझे असे म्हणणे आहे की, आज संपूर्ण विदर्भातील लोक रस्त्यावर उतरलेले असतना त्याची चर्चा सुध्दा करावयाची नाही हे बरोबर नाही. याबाबतीत चर्चा करावी. मग आम्ही आमचे विचार मांडू, आपण सर्वांचे ऐकून घ्यावे. यामध्ये सर्व पक्षाचे लोक आहेत. ज्याप्रमाणे तुम्ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये लोक ओरपून घेतले, तसे आपण तेथेही ओरपून घेऊ. पण हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग नाही. चर्चा करणे हाच प्रश्न सोडविण्याचा मार्ग आहे. त्यामुळे आपण चर्चेसाठी नाही म्हणून नये एवढीच माझी विनंती आहे. यावर जेव्हा चर्चा होईल तेव्हा आम्ही आमची मते मांडू. विदर्भाच्या ज्वलंत प्रश्नाच्या बाबतीतील चर्चा टाळली जात आहे याबाबत मी दोन उदाहरणे सांगतो. जुनी विधानसभा संपली, तेव्हा विधान परिषदेमध्ये हा प्रश्न अनिर्णित राहिला. फिजीकल बॅकलॉग काढला पाहिजे आणि दरवर्षी तो अप टू डेट झाला पाहिजे असे विदर्भातील सर्व लोकांचे म्हणणे आहे. मंत्रीमंडळातील सात सन्माननीय सदस्यांनी लेखी स्वरुपात सहीनिशी माननीय मुख्यमंत्र्यांना लिहून दिलेले आहे. पण त्याची घोषणा झाली नाही आणि चर्चा मध्येच थांबविण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे प्रांतिकचे अध्यक्ष आहेत. त्यांनी मागील अधिवेशनामध्ये ठराव मांडला,पण त्यावर चर्चा झाली नाही. आज अधिवेशन सुरु आहे आणि परिस्थिती बदलत आहे. रोज जे ओरबाडणे सुरु आहे त्यामुळे विदर्भामध्ये अत्यंत तीव्र अशा प्रकारचा असंतोष आहे आणि त्यामुळे आपण चर्चेसाठी नाही म्हणू नये एवढीच माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, आज येथे वेगळ्या विदर्भाच्या बाबतीत थोडा गोंधळ सुरु आहे. अशा वेळी आपण आमच्याही भावना समजून घेतल्या पाहिजेत.छत्रपती ....

. . . .2 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिवाजी महाराजांचा हा अखंड महाराष्ट्र आहे आणि मघाशी 105 हुतात्म्यांच्या बलिदानाबाबतही उल्लेख झालेला आहे. मी एक गोष्ट येथे सांगेन की, या महाराष्ट्राचे तुकडे पाडण्यासाठी जर कोणी पुढे येत असेल तर 106 वा हुतात्मा रामदास कदम व्हावयास तयार आहे अशी या महाराष्ट्रामध्ये अनेकांची भावना आज देखील आहे. म्हणून आपण दोन्ही बाजू समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. हा काही आखाडा नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

अनेक प्रश्न आम्ही आज देखील दिलेले आहेत. कंत्राटी शिक्षक उपोषणाला बसलेले आहेत. अनेक समस्या अहेत अनेक विषय आम्ही दिलेले आहेत त्यांच्या बाबतीत याठिकाणी चर्चा झाली पाहिजे. म्हणून कुणीही यायचे, गोंधळ घालायचा आणि आताच्या आता बोला अशा पध्दतीने या सदनात कामकाज होऊ शकणार नाही. सभापती महोदय, या सदनामध्ये नियमाने काम झाले पाहिजे. मराठी शिक्षकांच्या बाबतीत तसेच शिक्षण सेवकांचा जो प्रश्न आहे त्याबाबतीत याठिकाणी चर्चा झाली पाहिजे. शिक्षण सेवक तीन हजार रुपयात काम करीत आहेत. एवढया पगारावर ते काय शिकवणार आहेत? शैक्षणिक विकास, सर्वांगिण विकास असे आमही ज्यावेळी म्हणतो त्यावेळी हा विषय प्रॉयॉरिटीने चर्चेला घेतला पाहिजे. मराठी शिक्षकांचा, कंत्राटी शिक्षकांचा विषय याठिकाणी तातडीने चर्चेला घेणे आवश्यक आहे. सभापती महोदय, त्यासंबंधीचा विषय मी दिलेला आहे. सभापती महोदय, या महाराष्ट्राला तोडण्याचे पाप कोण करणार असेल तर महाराष्ट्रातील मराठी जनता ते कदापि खपवून घेणार नाही एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. या सदनामध्ये राजकीय परिस्थिती जाणून घेण्याचा सगळया सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. वेगळया विदर्भाच्या प्रश्नावर भारतीय जनता पाटी आणि शिवसेना ही दोन टोक दिसत आहेत. जर तुमची दोन टोके असतील तर तुमची युती आहे काय? हे मला जाणून घ्यावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : कॅबिनेट मिटिंगमध्ये राष्ट्रवादी कॉन्ग्रेस आणि काँग्रेसमध्ये तू-तू, मी-मी होते .....

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : तुमची पैशावरुन भांडण होतात आमची वैचारिक भांडणे आहेत. त्यामुळे यात फरक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, आर.आर.पाटील, आपण जी अपेक्षा व्यक्त केली ती कधीच पूर्ण होणार नाही. हा विषय चेष्टेचा नाही. एखाद्या विषयावर शिवसेनेचे वेगळे मत असू शकते, भारतीय जनता पार्टीचे वेगळे मत असू शकते. त्यामुळे युतीत कुठलीही दरार येणार नाही. पण आपले जे आपापसात चालले आहे ते आपण जरा सांभाळा. सभापती महोदय, माझा पॉईंन्ट ऑफ ऑर्डर असा आहे की, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

श्री. रामदास कदम हे भावनाप्रधान झाले. खरे म्हणजे त्यांनी या सभागृहात जो विषय मांडला तोही महत्वाचा आहे. या सभागृहात जे, जे विषय येतात ते सर्व विषय महत्वाचे असतात. शिक्षकांचा प्रश्नही महत्वाचा आहे. त्या विषयाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली पाहिजे, याबद्दल आमचे दुमत नाही. त्याला आम्हाला विरोधही करायचा नाही तर समर्थनच करावयाचे आहे. पण याठिकाणी श्री. रामदास कदम यांनी याठिकाणी वाक्य उच्चारले की, "कोणीही यावे आणि सभागृहात गोंधळ घालावा." आम्ही कोणीही नाही. एका जबाबदार राजकीय पक्षाचे आम्ही विधानपरिषद सदस्य म्हणून याठिकाणी बसतो. आम्ही गोंधळ घातला नाही तर आमचे म्हणणे आम्ही आग्रहीपणाने याठिकाणी मांडीत होतो. म्हणून "कुणीही यावे आणि गोंधळ घालावा" हे वाक्य कामकाजातून काढले पाहिजे.

सभापती : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला वाटले श्री. आर.आर.पाटील या राज्याचे जबाबदार गृहमंत्री आहेत. (अडथळा) जेव्हा मला माझी धुता येते तेव्हा दुसऱ्यालाही बरोबर रखडवता येते हे लक्षात ठेवा. सभापती महोदय, शिवसेना, भाजपाची युती झाली त्या युतीच्या वेळी देखील विदर्भवादी होते आणि अखंड महाराष्ट्रवादीही होते. आमची हिंदुत्वाच्या एका मुद्यावर युती आहे ती त्या एका मुद्यावर कायम युती असणार आहे हे लक्षात ठेवा. त्यामुळे असे हिणवण्यापेक्षा (अडथळा) आम्ही तर विरोधी पक्षातील आहोत. कपडे फाडण्याकरिता लोकांनी आम्हाला येथे पाठविले आहे आणि तुम्हाला कपडे चढवण्याकरिता पाठविले आहे. पण तुम्ही रोज वर्तमानपत्रातून तुमची लक्तरे टांगता. सभापती महोदय, दु:ख याच गोष्टीचे होते की, हे महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ या महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी बसलेले असताना, गुप्तता असताना सुध्दा शब्दश: ज्यावेळी बाहेर येते. आमचे एक राज्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांच्या केबिनमध्ये जाऊन त्यांना दमबाजी करतात, दमदाटी करतात.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

श्री. दिवाकर रावते : आपण आमचे काढले, आता आम्हाला थांबवू नका. सभापती महोदय, मंत्र्यांना बोलण्याची परवानगी आहे काय ? हा राज्याचा विषय आहे. मंत्रिमंडळामध्ये होणाऱ्या निर्णयांचा परिणाम या पूर्ण विधिमंडळावर होत असतो. माननीय जलसंधारण मंत्री माननीय मुख्यमंत्र्यांना कसे बोलले हे वर्तमानपत्रांमध्ये छापून येते. ही कसली अब्रू आहे ? काही मंत्री दमबाजी करतात ते छापून येते. आपल्यामध्ये जे वितुष्ट आहे ते थांबवा. ज्यावेळी आमची युती इ ाली त्यावेळी आम्ही याच मताचे होतो. आपण युतीची चिंता करु नका. आपण महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची चिंता करावी.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझ्या एका वाक्यावरुन सभागृहाचा वेळ वाया जावयास नको म्हणून युतीच्या संदर्भात मी जो मुद्दा उपस्थित केला होता तो मी मागे घेतो. त्यांची युती मला पूर्णपणे समजलेली आहे. त्यामुळे मी माझा मुद्दा मागे घेतो.

सभापती : दोन्ही बाजूकडून या ठिकाणी ज्या पध्दतीची चर्चा झाली त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी डिसेंबर महिन्यामध्ये नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला होता त्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, अरुण गुजराथी, नितीन गडकरी, गुरुनाथ कुलकर्णी, उल्हास पवार, जयप्रकाश छाजेड, अरविंद सावंत, सय्यद जमा, जैनुद्दीन जव्हेरी, वसंतराव खोटरे, विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री विलासराव शिंदे, रमेश शेंडगे आणि जयंत प्र. पाटील यांच्या सह्या होत्या. अकारण माझ्या एका वाक्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता होती म्हणून मी तो प्रस्ताव वाचून दाठवितो. त्या प्रस्तावामध्ये असे म्हटले होते की, "विदर्भ, मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये विकास होण्याकरिता धोरणात्मक निर्णय दरवर्षी अद्ययावत सरासरीवर करुन सर्वच क्षेत्रातील विकास कामांना आवश्यक तो निधी मिळण्याकरिता जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी आर्थिक अनुशेष भरुन काढण्याची पध्दत सक्षम न ठरल्याने त्याज्य ठरविण्याची आवश्यकता, जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी आर्थिक अनुशेष दूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

करण्याचे धोरण स्वीकारण्याची गरज, वर्षभरात जिल्हानिहाय साध्य झालेली भौतिक सिंचन क्षमता व वाढलेली राज्य सरासरी लक्षात घेऊन भौतिक अनुशेष दरवर्षीच्या राज्य सरासरीवर अद्ययावत करण्याचे धोरण स्वीकारण्याची गरज, जलसिंचन या क्षेत्राबरोबर इतरही विकास क्षेत्राचा अनुशेष भरुन न निघाल्याने विद्यमान भौतिक स्थितीवर आधारित अनुशेष निर्मुलनाची कालबध्द विशेष योजना हाती घेऊन सर्वांगीण विकासासाठी करावयाची उपाययोजना तसेच महाराष्ट्र राज्य विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी आदेश 1994" ची मुदत दिनांक 30 एप्रिल, 2010 रोजी संपुष्टात येत असल्याने ती मुदत आणखी पाच वर्षासाठी राज्य शासनाने वाढविण्याची केंद्र शासनाला विनंती करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी." अशा पध्दतीचा हा प्रस्ताव होता. यामध्ये विदर्भाचा अनुशेष किंवा अन्य संपूर्ण भाग आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी आज या ठिकाणी जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावामधील शेवटचा भाग वेगळा आहे. म्हणून मी आपल्याला सांगेन की, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचा जो चर्चेमध्ये असणारा प्रस्ताव आहे त्याचा वेगळ्या पध्दतीने विचार करणे जरुरीचे आहे आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आज दिलेला जो प्रस्ताव आहे तो वेगळा प्रस्ताव असून त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वेगळा निर्णय घेणे गरजेचे आहे. याच पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शिक्षणाच्या अनुषंगाने, मराठी भाषिक शाळांना मान्यता देण्याच्या अनुषंगाने जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावरही निर्णय घेणे गरजेचे आहे. 26 तारखेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये या दोन्ही प्रस्तावाच्या अनुषंगाने मी विषय मांडीन आणि

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबतीत केव्हा व किती वेळ द्यावयाचा याचा निर्णय घेण्यात येईल.

आजच्या प्रश्नोत्तराच्या तासापैकी 35 मिनिटांचा वेळ या चर्चेत गेला असल्यामुळे प्रश्नोत्तरासाठीचा वेळ मी 35 मिनिटांनी वाढवून देत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यामुळे खालच्या सभागृहाच्या कामकाजामध्ये व्यत्यय येण्याची शक्यता आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, 10-15 मिनिटांचा वेळ वाढवावा.

सभापती : ठीक आहे, मी 15 मिनिटांचा वेळ वाढवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कोल्हापूर जिल्ह्यात अवैध सावकारीचे फुटलेले पेव

(१) * २८५० श्री. दिवाकर रावते, डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सावकारी कायद्यानुसार सावकाराने उपनिबंधकाकडे नोंदणी करणे आवश्यक असतांनाही तसे न करता कोल्हापूर जिल्ह्यात अवैध सावकारी पेव फुटले असून त्याची संख्या ८०० च्या वर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर व इचलकरंजी येथे अवैध सावकारांचे प्रमाण जास्त असून तसेच इचलकरंजी हे खाजगी सावकारांचे आगार असून त्याठिकाणी सर्वाधिक सावकारी चालते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील व इचलकरंजी येथील खाजगी सावकारांच्या पाशातून सुटका करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता: (१) नाही.

(२) नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांना लेखी उत्तरात दुरुस्ती करावयाची आहे का ?

श्री.प्रकाश शेंडगे : नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षामध्ये कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी येथील अवैध सावकारीसंबंधी 10 गुन्हे दाखल झालेले आहेत हे खरे आहे काय, या गुन्हयांमध्ये असलेल्या 79 आरोपींवर कारवाई करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय आणि अवैध सावकारीसंबंधी श्री. भगवान जे बँकेचे अध्यक्ष असून त्यांच्याकडे सावकारीचा परवाना होता हे खरे आहे काय, सावकारी करण्यासाठी त्यांनी नोंदणी केली आहे काय आणि आता त्यांच्याकडे परवाना नसतानाही ते सावकारी करीत आहेत हे खरे आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी याठिकाणी सावकारीचे पेव फुटल्याबाबतचा हा प्रश्न आहे. यासंबंधी जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यानुसार मी सांगतो की, सन 2008-09 मध्ये कोल्हापूर जिल्हयात एकूण 202 परवानाधारक सावकार होते. परंतु सन 2009-10 ची परिस्थिती पाहिली तर 202 पैकी फक्त 119 सावकारांनी परवान्याचे नुतनीकरण

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेले आहे. त्याचबरोबर 4 नवीन सावकारांना परवाने दिलेले आहेत. अशाप्रकारे एकूण 123 परवानाधारक सावकार कोल्हापूर जिल्हयामध्ये आहेत. इचलकरंजीत सन 2009-10 मध्ये एकही परवानाधारक सावकार नाही. या व्यवसायासबंधी 5 तक्रारी आल्या होत्या. या पाचही तक्रारीसंबंधी तपास करुन निकाली काढण्यात आलेल्या आहेत. त्यासंबंधी कोणताही गुन्हा नोंदण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : या पाच तक्रारींचे स्वरुप काय होते ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी प्रत्येक केसनिहाय माहिती देतो. श्री.शाबु भिमाप्पा दुधाळे यांचेविरुध्द श्री.परेश दत्तात्रय भोसले यांनी शाहूपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे तक्रार केली होती. श्री.दुधाळे यांची चौकशी केली असता श्री.दुधाळे परवानाधारक सावकार असल्याचे आढळून आले असून तक्रारदाराकडून वसुलीसाठी न्यायालयात दावा दाखल केला असल्याने, सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्याने तक्रारदाराचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे. तसेच श्री.नितीजी कृष्णा निकम, हुपरी यांचेविरुध्द श्री.बाळासाहेब शिवाजी वाईंगडे, रा.रेवाळ यांनी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदारास वेळोवळी लेखी पत्र देऊन पुरावा सादर करण्याकरिता उपस्थित राहण्यासाठी कळविले असता तक्रारदार उपस्थित न राहिल्याने पुराव्या अभावी त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. अशाप्रकारे पाचही प्रकरणात पुरावे न आल्यामुळे ही प्रकरणे बंद करण्यात आली आहेत.

श्री.दिवाकर रावते : तक्रारदारांनी तक्रारी केल्या होत्या. परंतु त्यांची मुस्काटदाबी करण्यात आली आहे. अवैध सावकारीसंबंधी 5 तक्रारी आलेल्या असताना शासनाने स्वत:हून या सावकारांविरुध्द गुन्हा का दाखल केला नाही ?

श्री.प्रकाश सोळंके : हे परवानाधारक सावकार आहेत. तक्रारींसंबंधी पुरावे समोर आले नाहीत तर संबंधितांविरुध्द गुन्हा कसा दाखल करणार ?

श्री.दिवाकर रावते : त्या भागात अवैध सावकारी चालू नाही असे मंत्री महोदयांनी निवेदन केले आहे. त्यामुळे या अवैध सावकारीसंबंधी आता आम्ही कारवाई करण्याचे ठरविले तर त्याबाबत शासनाची कोणती भूमिका राहणार आहे, आम्हाला त्यांच्या घरावर जावे लागेल, घेराव घालावा लागेल, शासनाला हे अवैध सावकार सापडत नाहीत ? त्यामुळे आम्हाला याबाबत पुढाकार घ्यावा लागेल.

यानंतर श्री.शिगम.....

अशासकीय प्रत / ऑफिशियल नाही

श्री. प्रकाश सोळंके : तक्रार आल्यानंतर पुरावे समोर आले तर त्याबाबतीत निश्चितपणे कारवाई करता येईल. परंतु पुरावे समोर आले नाहीत तर कारवाई करता येत नाही. कोणतेही पुरावे न देता तक्रारी करणे उचित नाही. तक्रारी बरोबर पुरावे देखील समोर आले पाहिजेत. पुरावे समोर आले तर कारवाई करता येईल.

श्री. दिवाकर रावते : सावकाराच्या धाकाने गरीब जनता दबलेली आहे. या सावका-यांच्या तावडीतून गरिबांची सुटका करण्याचे सरकारचे काम आहे. अवैध सावकारी नाही असे माननीय मंत्री महोदय सांगतील काय ? अवैध सावकारी रोखणे हे सरकारचे काम आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सावकारी संबंधात जरुर तक्रारी येतात. परंतु मला सदनाला हे सांगावयाचे आहे की, मुंबई सावकार अधिनियम 1946 हा कायदा परिपूर्ण नाही. त्यामुळे कारवाई करता येत नाही. त्यामध्ये ब-याच त्रुटी आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2008 हा नवा कायदा सदनाने मंजूर केलेला असून तो दिल्लीला पाठविण्यात आलेला आहे. परंतु त्यामध्ये काही त्रुटी होत्या. त्या त्रुटी दुरुस्त करुन परवाच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2008 हा सर्वसमावेशक असा कायदा केलेला आहे जेणेकरुन अशा प्रकारच्या अवैध सावकारीला आळा बसेल.

प्रा. सुरेश नवले : सावकारांना जो परवाना दिला जातो त्याचे शुल्क किती आहे ? ते वाढविण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : परवाना नुतनीकरणासाठी कायद्याच्या कलम (1) नुसार तपासणी फी 5 हजार रु. आकारली जाते. त्यामध्ये वाढ करण्याचे विचाराधीन नाही. सन्माननीय सदस्यांनी तशी मागणी केली तर त्याबाबतीत जरुर विचार करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक नेमण्यात आलेला आहे. त्यामुळे तेथील शेतक-यांना ज्या पध्दतीने कर्ज वितरण व्हायला पाहिजे ते होत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना धन्यवाद देतो, त्यांनी अतिशय चांगला प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. तेथील शेतकरी सावकाराकडे जाणार नाहीत याची काळजी सहकार खाते घेईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील :कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक नेमला असला तरी कर्जवाटप बंद झालेले नाही. कर्ज वाटप चालू आहे. सन्माननीय सदस्यांच्या याबाबतीत काही तक्रारी असतील तर त्यामध्ये मी जरुर लक्ष घालीन. मी त्या जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. याबाबतीत जरुर सहकार्य केले जाईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १२० कारकुनांच्या केलेल्या नियमबाह्य नेमणूका

(२) * ४१६६ श्री. विनोद तावडे, श्री चंद्रकांत पाटील, श्री. संजय केळकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये माहे जुलै-ऑगस्ट या कालावधीत १२० कारकुनांची भरती आयुक्त, सहकार विभाग यांची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर कारकुनांच्या भरतीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे काय,

(३) असल्यास, या अनधिकृतपणे केलेल्या भरतीची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) सहकार आयुक्तांची पूर्व परवानगी न घेता ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जुलै-ऑगस्ट २००९ ला ८४ लिपीकांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक केलेली आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, उत्तरामध्ये मला दुरुस्ती करावयाची आहे. ती करण्यासाठी मला अनुमती द्यावी.

सभापती : ठीक आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : उत्तराच्या भाग (३), (४) व (५) ला "प्रश्न उद्भवत नाही" असे छापलेले आहे. त्याऐवजी "कारवाई चालू आहे" असे वाचावे.

श्री. विनोद तावडे : राज्यातील अनेक जिल्हा सहकारी बँका का बुडाल्या त्याची कारणे आपणास माहीत आहेत. ठाणे जिल्हा सहकारी बँक ही देखील त्या दिशेने पावले टाकीत आहे. या बँकेला सहकार आयुक्तांनी त्यांच्या दिनांक 6 जूनच्या पत्रान्वये बँकेने रोजंदारीवर कर्मचारी भरती करु नये असे कळविलेले होते काय ? तसेच जिल्हा उपनिबंधक यांनी देखील अशा प्रकारे भरती करुन नये असे पत्राने कळविलेले होते काय ? ही दोन्ही पत्रे येऊन देखील गेल्या 6 महिन्यामध्ये बँकेने 279 कर्मचा-यांची भरती केलेली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : तशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली आहे ही गोष्ट खरी आहे. 8 फेब्रुवारी 2010ला सहकार आयुक्तांच्या माध्यमातून जिल्हा सहकारी बँकेला पत्र दिलेले आहे, हेही खरे आहे. वैद्यनाथन समितीने मित्रा समिती गठीत केली होती. या मित्रा समितीच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती सहकार बॅकेच्या नोकर भरती बाबत, त्यांच्या वर्किंग बाबत गाईड लाईन्स ठरवून देण्यात आलेल्या आहेत. बँकेला कोणत्याही प्रकारची नोकर भरती करावयाची असेल तर बँकेचे डिपॉझिट, कर्जवाटप आणि एकंदरित बँकेची आर्थिक व्यवस्था यासंबंधीचे निकष ठरवून दिलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये निकष पाळले गेले की नाही यासंदर्भात मी आजच सहकार आयुक्तांना सूचना दिल्या आहेत. या संदर्भात मी स्थगिती द्यायचा निर्णय घेतला आहे. ही सगळी माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे. मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, हा एक नवीन विषय राज्यात निर्माण झालेला आहे. म्हणून आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांबाबत या भूमिकेमध्ये आहोत की, मित्रा समितीचा अहवाल आला तरी त्याचा सहकार खात्याचा काही संबंध नाही असे मानून आम्ही आमच्या निकषाप्रमाणे नोकर भरती करु अशी या बँकांना भूमिका घेता येणार नाही. नोकर भरती करीत असताना उद्या आर्थिक बोजा किती पडणार आहे, त्याचा परिणाम ठेवीदारांवर, कर्जदारांवर व व्याज आकारणीवर होणार आहे. म्हणून मित्रा समितीच्या अहवालासंदर्भात बैठक घेत आहोत. दरम्यानच्या काळात तो निर्णय होईपर्यंत अशा प्रकारची नोकरभरती करता येणार नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या बँकेचे सेवाप्रवेश नियम अद्याप तयार झालेले नाहीत. किती दिवसामध्ये सेवाप्रवेश नियम तयार करणार आहात? ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वर्षभरापूर्वी तसेच दोन अडीच वर्षापूर्वी सुध्दा नोकर भरती करण्यात आली. कंत्राटी पध्दतीने भरती करायची आणि नंतर सेवेत कायम करायचे ही मोडस ऑपरेंडी झालेली आहे. त्यामुळे नोकर भरतीच्या संदर्भातील सेवाप्रवेश नियमावली किती दिवसात पूर्ण करणार आहात? जी स्थगिती दिली त्या बाबतीतील कारवाई किती दिवसात केली जाईल? ही स्थगिती आता जी नोकर भरती करण्यात आली त्या संदर्भात लागू आहे की यापुढील नोकर भरतीबाबत लागू राहील?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आज या राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कळविले जाईल. कंत्राटी पध्दतीने नोकर भरती किंवा डेली वेजेसवर नोकर भरती करावयाची असली तरी निकषाप्रमाणे किती पदे रिक्त आहेत याचा अंतिम आढावा आयुक्त स्तरावर घेतला जाईल आणि आवश्यकतेनुसार नियमाप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल. याला स्थगिती देण्यात आली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4166....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या बँकेने रोस्टरचे पालन केले होते का? नसल्यास नोकर भरती करता येत नाही. या बँकेचा प्रशासकीय खर्च किती टक्के आहे?

श्री.हर्षवर्धन पाटील : म्हणून या संदर्भात मी स्थगिती दिली आहे. याची सगळी माहिती येईल. प्रशासकीय खर्च किती आहे, रोस्टरचे प्रमाण काय आहे, त्याचे पालन केले की नाही या संदर्भातील पूर्ण माहिती प्राप्त होत नाही तोपर्यंत ही स्थगिती उठविली जाणार नाही.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्यावतीने उड्डाण पुलाचे काम मंद गतीने व निकृष्ट दर्जाचे असल्याप्रकरणी करावयाची कारवाई

(३) * २९१३ डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, डॉ. दीपक सावंत : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्यावतीने १७ कोटी रुपये खर्च करुन सुरु असलेले उड्डाण पुलाचे काम अत्यंत मंदगतीने व निकृष्ट दर्जाचे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाचे काम गेल्या तीन वर्षापासून सुरु असून पुलाचा आराखडा बदलण्याच्या नावाखाली ठेकेदार, अधिकारी, पदाधिकारी यांनी संगनमत करुन हेच काम ९६ कोटी रुपयांपर्यंत नेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास तद्नुसार संबंधित दोषी अधिकारी, ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोक चव्हाण : (१) व (२) हे खरे नाही. पुणे-नाशिक महामार्ग-५० वरील भोसरी येथील उड्डाणपुलाची रुंदी सार्वजनिक बांधकाम विभाग व एस.आर. ॲंड टी.एच.च्या मार्गदर्शक तत्वानुसार पुलाची रुंदी १६.६० मीटर वरुन १९.७० मीटर करावी लागली असल्यामुळे सदर उड्डाण पुलाच्या आरसीसी डिझाईन व अनुषंगिक बाबीमध्ये बदल झाल्यामुळे सदर कामाच्या मंजूर निविदेची किंमत रु. ३८.१३ कोटीवरुन रु. ६९.६४ कोटी झाली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेली तीन-साडेतीन वर्षे या पुलाचे काम रखडले आहे. शासनाने उत्तरात म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग व एस.आर.अँड टी.एच.च्या मार्गदर्शक तत्वानुसार पुलाची रुंदी 16.60 मीटरवरुन 19.70 मीटर करावी लागली. प्रश्न असा आहे की, डिझाईनमध्ये बदल करावा लागल्यानंतर टेंडर का काढण्यात आले नाही?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सुरुवातीला ज्यावेळी मूळ निविदा काढण्यात आली होती त्यावेळचे स्पेसिफिकेशन्स हे वेगळे होते. नंतर केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्स्पोर्ट अँड हायवेज यांनी निकषात बदल केल्यानंतर पुलाचा स्पॅन 8.75 मीटर असावा, डिव्हायडरमधील अंतर 1.2 मीटर असावे अशा केंद्र शासनाच्या स्पेसिफिक गाईडलाईन्समुळे बदल करावा लागला ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आताची किंमत वाढली, कामाचा व्याप वाढला, कामाचा स्कोप बदलला हे लक्षात घेता तो निर्णय घेण्यासाठी पुन्हा स्थायी समितीसमोर जावे लागले ही वस्तुस्थिती आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2913.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वेळोवेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे हे काम आहे त्यामध्ये बदल झाला आणि तीन-साडेतीन वर्षे हे काम रखडले. बांधकाम करणारा पहिला ठेकेदार निघून गेला. त्याला परत बोलावण्यात आले आणि सिटी इंजिनिअर श्री.उगले यांच्यावर नव्याने आलेल्या आयुक्तांनी सातत्याने ताशेरे ओढले. बांधकामाची किंमत आणि नंतर झालेला खर्च याचा बोजा नागरिकांवर पडला आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2913..... डॉ. नीलम गोऱ्हे.....

एवढा जो प्रशासकीय विलंब झाला तयासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, सकृतदर्शनी जी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे त्यानुसार जी मूळ निविदा 18.2.2007 रोजी काढण्यात आली आणि वर्क ऑर्डर ऑक्टोबर, 2007 मध्ये काढली त्यानंतर केंद्रशासनाच्या गाईडलाईन्स दिल्या व त्यामुळे या कामाची किंमत वाढली म्हणून रिव्हाईज वर्क ऑर्डर काढावी लागली ही वस्तुस्थिती आहे. कारण 19 महिन्यांचा जो डिले झाला त्यामुळे ही किंमत वाढली. तसेच यामध्ये कामाच्या स्पेसिफिकेशनमध्ये जो बदल झाला त्यानुसार काम चालू नसल्याची सन्माननीय सदस्यांची तक्रार असेल तर त्याची बारकाईने चौकशी करण्यास शासन तयार आहे.

ॲड. अनिल परब : महोदय, केंद्रशासनाच्या गाईडलाईन्स वर्क ऑर्डर निघण्यापूर्वीच्या आहेत की अगोदरच्या आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे या गाईडलाईन्स वर्क ऑर्डर निघण्यापूर्वीच्या आहेत परंतु त्यावेळी अगोदरच टेंडर फ्लोट करुन ॲडिशन दाखविण्यात आले व ती रक्कम दुपटीवर गेलेली आहे. अशा प्रकारे सकृतदर्शनी यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे दिसत आहे. यासंबंधी सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तिवर शासन कारवाई करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, एकंदरित जी माहिती आहे त्यानुसार रस्त्याची रुंदी वाढलेली आहे, डिझाईन बदललेले आहे, साईज बदललेली आहे, आरसीसीचे डिझाईन बदलले आहे. सन्माननीय सदस्यांनी जर अशा प्रकारे स्पेसिफिक माहिती दिली आणि तांत्रिकदृष्टया यातील चुका दाखविल्या तर त्याचीही चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

तळेगांव दाभाडे (जि.पुणे) येथील सामाजिक कार्यकर्ते
श्री.सतिष शेट्टी यांचा झालेला खून

(4) * 3961 श्री.अरुण गुजराथी , श्री.मोहन जोशी, श्री सुभाष चव्हाण, श्री. चरणसिंग सप्रा, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त, श्री. विनोद तावडे, श्री चंद्रकांत पाटील, श्री. संजय केळकर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तळेगांव दाभाडे (जि.पुणे) येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.सतिष शेट्टी यांचा दिनांक 12 जानेवारी, 2010 रोजी खुन करण्यात आला हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, शासन यासंदर्भात काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर. पाटील यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) गुन्ह्याच्या तपासात आरोपी विजय ज्ञानेश्वर दाभाडे, रा.तळेगाव दाभाडे, याने आरोपी नवनाथ मारुती शेलार रा.सावरगाव, ता.जुन्नर, व डोंगऱ्या हनुमंता राठोड रा.भोसरी, पुणे यांना मयतास जिवे मारण्याची सुपारी दिल्याचे व त्यांना मयताची बसण्या उठण्याची ठिकाणे निवासस्थान व पळून जाण्याचे मार्ग दाखविल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्याचे कामी अटक करण्यात आलेली आहे. यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार प्रशांत कृष्णा गोटे याने आरोपीचे केलेले वर्णनापैकी आरोपी डोंगऱ्या हनुमंता राठोड याचे वर्णन व त्याचे हातावरील खूण ही मिळती जुळती आहे. त्याचे घराची घरझडती घेतली असता त्याचे घरात रक्तासारखे डाग असलेला टी शर्ट व बुट मिळून आलेला आहे. आरोपी विजय ज्ञानेश्वर दाभाडे, याने आरोपी नवनाथ मारुती शेलार व डोंगऱ्या हनुमंता राठोड यांना आपल्या कारमध्ये बसवून मयत याचे बसण्या उठण्याचे ठिकाण दाखविणेकामी वापरलेली कार पुरावेकामी जप्त करण्यात आली असून आरोपी प्रमोद दत्तात्रय वाघमारे रा.तळेगाव दाभाडे याने त्याचे मोटार सायकलवरुन आरोपी डोंगऱ्या हनुमंता राठोड यांस यातील मयत याचे घर, येण्या जाण्याचा रस्ता दाखविल्याने त्याची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.

यातील आरोपी नवनाथ मारुती शेलार व डोंगऱ्या हनुमंता राठोड तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीवर प्रशांत कृष्णा गोटे यांची दि.07/03/2010 रोजी नायब तहसिलदार, मावळ यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ओळखपरेड घेतली असून त्यात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार याने आरोपी डोंगऱ्या हनुमंता राठोड यास ओळखलेले आहे.

यातील आरोपी विजय ज्ञानेश्वर दाभाडे व डोंगऱ्या हनुमंता राठोड यांची नार्को टेस्ट, लाय डिटेक्टर व ब्रेन मॅपिंग चाचणी घेणेबाबत मे.कोर्टाची मंजूरी घेवून मा.संचालक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा मुंबई यांना अहवाल देण्यात आला असून याबाबतची प्रक्रीया सुरु आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3961..... श्री. रमेश बागवे....

यातील फरारी आरोपी श्याम रामचंद्र दाभाडे, रा.कोठेश्वररवाडी, तळेगांव दाभाडे यास राजुर पोलीस स्टेशन जि.अहमदनगर गु.र.नं.12/2010, भा.दं.वि. कलम 307, 504, 34 आर्म ॲक्ट कलम 3/51 (1) या गुन्ह्यात दि.02/03/2010 रोजी रात्रौ 02.45 वा. अटक करण्यात आली असून तो राजूर पोलीस ठाणेचे गुन्ह्यात पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहे. त्याची रिमांड संपताच त्यास वरील गुन्ह्यात वर्ग करुन घेवून अटक करुन त्याच्याकडे सदर गुन्ह्याबाबत सखोल तपास करुन गुन्ह्यातील आरोंपीविरुध्द अधिक पुरावा गोळा करण्यात येत आहे.

यातील फरारी आरोपी श्याम रामचंद्र दाभाडे, रा.कोठेश्वररवाडी, तळेगांव दाभाडे यास राजुर पोलीस स्टेशन जि.अहमदनगर गु.र.नं.12/2010, भा.दं.वि. कलम 307, 504, 34 आर्म ॲक्ट कलम 3/51 (1) या गुन्ह्यात दि.02/03/2010 रोजी रात्रौ 02.45 वा. अटक करण्यात आली असून तो राजुर पोलीस ठाणेचे गुन्ह्यात पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहे. त्याची रिमांड संपताच त्यास वरील गुन्ह्यात वर्ग करुन घेवून अटक करुन त्याच्याकडे सदर गुन्ह्याबाबत सखोल तपास करुन गुन्ह्यातील आरोपींविरुध्द अधिक पुरावा गोळा करण्यात येत आहे.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, श्री. सतीश शेट्टी यांच्या खुनाच्या संदर्भात एकूण किती संशयित आरोपी आहेत ? त्यापैकी किती आरोपींना पकडण्यात आले व किती फरार आहेत ? तसेच यासंबंधीचा निर्णय लवकर होण्याच्या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे ? आणि आजपर्यंत जे संशयित आरोपी आहेत त्यांच्यावर कोणती कलमे लावण्यात आली ?

श्री. रमेश बागवे : महोदय, श्री. सतीश शेट्टी यांच्या खुनामध्ये एकूण 6 आरोपी असून त्यांच्यावर कलम 302, 120 (ब) आणि 34 प्रमाणे गुन्हे दाखल झालेले आहेत. या सहा आरोपींनाही अटक केली असून त्यांना 7 दिवसांची पोलीस कस्टडी मिळाली आहे. हे आरोपी 26 मार्चपर्यंत पोलीस कस्टडीमध्ये आहेत. संपूर्ण सहा लोकांनाही अटक करण्यात आली असून त्यातील पाच आरोपींना मॅजेस्टिक कस्टडी मिळाली व फरार आरोपी एकही नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, यामध्ये मध्यंतरी जे आरोपी मुक्त आहेत त्यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्या घरात एके-47 सारखी हत्यारे मिळाली. ही सर्व माहिती वाहिन्यांच्या माध्यमातून आपल्यासमोर आली आहे. त्यासंदर्भात त्यांच्यावर पूर्वीचे गुन्हे दाखल आहेत काय ? आणि आणखी एक आरोपी श्री. दाभाडे याला तर दुसऱ्या पोलीस स्टेशनमध्ये सुध्दा गुन्हा करताना अडक झालेली आहे त्याला केव्हा ताब्यात घेणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3961.....

श्री. रमेश बागवे : संबंधित आरोपी श्री. शाम दाभाडे याला 7 दिवसांची पोलीस कस्टडी घेतलेली असून त्या अनुषंगाने कारवाई चालू आहे. तसेच त्याच्यावर दुसऱ्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला असल्याचे सांगितले त्यानुसारही पुढील कारवाई चालू आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, आमच्या माहितीप्रमाणे श्री. सतीश शेट्टी हे माहितीच्या अधिकाराखाली काम करणारे कार्यकर्ते होते, राजकारणाशी त्यांचा संबंध नव्हता. परंतु ज्यावेळेस आरोपिंना अटक झाली त्यात विजय दाभाडे हा देखील एक आरोपी आहे. त्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्री. विजय दाभाडे हा वकील असल्यामुळे तळेगांव-दाभाडे येथील बार असोशिएशनने सुडबुध्दीने श्री. विजय दाभाडे याच्यावर केस दाखल केल्याचा आरोप केला होता. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी नार्को टेस्टची मागणी पोलिसांनी केली असून पुन्हा पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो. कोणत्या स्टेजला अशी नार्को टेस्ट करण्यात येते ? व तशी टेस्ट झाली आहे काय ? असल्यास त्यातून काय माहिती समोर आली आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 3961.....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली कै. शेट्टी यांनी अनेक प्रकरणात माहिती मागितली होती व या प्रकरणात त्यांचा झालेला खून हा माहितीच्या अधिकाराचा वापर करुन जे लोक सोशल ॲक्टीव्हीटीजमध्ये सक्रीय असतात अशांसाठी हा एक धक्कादायक प्रकार आहे. या केसचे महत्व लक्षात घेऊन, पोलिसांनी एकाग्रचित्ताने चांगला तपास केलेला आहे. या प्रकरणातील आरोपींना अटकही केलेली आहे. पण असे असले तरी सुध्दा शेट्टी यांचे घरचे लोक आणि त्यांचे सहकारी समाधान व्यक्त करीत नाहीत. त्यांनी मला देखील तशा प्रकारची पत्र लिहिली आहेत. हा तपास उच्च स्तरीय विभागाकडून व्हावा याबाबत कोर्टाकडे मागणी देखील केलेली आहे. या केसचे महत्व लक्षात घेऊन मी असा निर्णय घेतला आहे की, पोलिसांनी आतापर्यंत केलेला तपास योग्य आहे, नार्कोटेस्टच्या बाबतीत हायकोर्टाकडून सुध्दा आदेश घेण्यात आलेले आहेत. या घटनेचे राज्यातील महत्व लक्षात घेऊन मी सीबीआयला तपास करण्याची विनंती करणार आहे. या केसचा सीबीआयने रिव्हयू घेऊन तपास करावा. ब-याच वेळा राज्यसरकारने सीबीआयला तपास करण्याची विनंती केली तरी सीबीआयकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे त्यांनी अनेक वेळा तपास नाकारलेले आहेत. परंतु या केसमध्ये सीबीआयला हे प्रकरण देण्यास राज्य सरकारची तयारी आहे. या प्रकरणात सहा आरोपी पकडण्यात आलेले असून नार्कोटेस्टची कोर्टाकडून परवानगी मिळालेली असून प्रक्रिया सुरु आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रकरणात उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "आरोपी विजय ज्ञानेश्वर दाभाडे, रा. तळेगाव दाभाडे, याने आरोपी नवनाथ मारुती शेलार, रा. सावरगाव याने मयतास जीवे मारण्याची सुपारी दिली होती. " जर आरोपीने सुपारी दिली असेल तर या गुन्हयाचा नेमका कोण सुत्रधार आहे याबाबत शासनाने तपास केलेला आहे काय ? तसेच या केसच्या संदर्भात आपण जर कलम 120 (ब) लावले असेल तर त्यासंदर्भात आपल्या उत्तरात कोठेही खुलासा केलेला नाही. कटकारास्थानच्या संदर्भात कलम 120 (ब) लावले आहे काय ? तसेच या घटनेचा सुत्रधार कोण आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, विजय दाभाडे हा प्रमुख सूत्रधार असून त्याला अटक करण्यात आलेली आहे.

--------- ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईत गेल्या काही वर्षात बंद पडलेल्या गिरण्यांना लागलेल्या आगी

(५) * २६८३ श्रीमती अलका देसाई, श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. अनिल परब, श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गेल्या काही वर्षात बंद पडलेल्या गिरण्यांना आगी लागण्याचे प्रकार वाढले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दादर, मुंबई येथील गोल्डमोहर या कापड गिरणीला दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आग लागण्यामागची कारणे काय आहेत व त्यात किती वित्त व जिवितहानी झाली आहे,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर आगीत मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना शासनाने किती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे?

श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर. पाटील यांच्याकरिता : (१) सन २००७, २००८, २००९ या ३ वर्षात मुंबईतील कोणत्याही बंद पडलेल्या गिरणीला आग लागलेली नाही. दि.२० जानेवारी, २०१० रोजी दादर, मुंबई येथील गोल्डमोहर गिरणीला आग लागली आहे. त्यामुळे मुंबईत गेल्या काही वर्षात बंद पडलेल्या गिरण्यांना आगी लागण्याचे प्रकार वाढले आहेत हे म्हणणे खरे नाही.

(२) होय.

(३) सदर आग जाणूनबुजून लावण्यात आली असल्याचे आढळून आले आहे.

सदर आगीत कोणत्याही प्रकारची जिवितहानी झाली नाही. सदर घटनेमुळे झालेल्या वित्तहानीबाबत तपास चालू आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी दादर मुंबई येथील गोल्डमोहर मिलमध्ये काम कारणाऱ्या व मिलमध्येच राहणाऱ्या मजूरांनी मिलमध्ये रॉकेल टाकून जाणूनबुजून आग लावल्याचे आढळून आले आहे. सदर घटनेबाबत भोईवाडा पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३०/१०, भा.दं.वि. सं. कलम ४२७, ४३६, १२० (ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटनेस जबाबदार असलेल्या आरोपींना अटक करण्यात आली आहे.

५) सदर घटनेत कोणीही व्यक्ती जखमी अथवा मृत झाली नसल्याने आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापतीत महोदय, मुंबईमध्ये गेल्या काही वर्षापासून बंद पडलेल्या गिरण्याच्या जागी आगी लावण्याचे प्रकार सर्रास सुरु आहे. दादर येथील गोल्ड मोहर या कापड गिरणीला दिनांक 20 जानेवारी, 2010 रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली हे खरे आहे

अशासकीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:2683....

श्रीमती अलका देसाई...

काय ? हा प्रकार घातपाताचा आहे काय ? असल्यास सदर आग लावण्यांची कारणे काय आहेत व त्यात किती वित्त व जिवितहानी झाली आहे ? उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केलेली आहे, चौकशी केली असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सरकारने कोणती कारवाई केली ? तसेच सदर आगीत मृत पावलेल्यांच्या नातेवाइकांना व जखमींना शासनाने किती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे?

उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सदर आग जाणूनबुजून लावल्याचे आढळून आलेले आहे. ज्यांनी ही आग जाणूनबुजून लावली ते आरोपी कोण आहेत ? या प्रकरणी निष्पाप कामगारांना आपण दोषी ठरवू नका अशी माझी आपल्या समोर मागणी आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2683.....

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, दादर येथील गोल्ड मोहर गिरणीला दिनांक 20.1.2010 रोजी आग लागली होती. ही गिरणी एन.टी.सी.च्या मालकीची असून या प्रकरणामध्ये सुमारे 15 आरोपी पकडण्यात आले आहेत. त्यापैकी 6 आरोपींनी अटकपूर्व जामीन घेतला आहे श्री.गणपत भाई परमार यांच्या सांगण्यावरुन श्री. दिनेश काळोजी मारवाडी यांनी आग लावली आहे. या संदर्भात कलम 427,436 120 (ब) प्रमाणें गुन्हा नोदविण्यात आला असून 15 लोकांना अटक करण्यात आलेली आहे.

श्री.किरण पावसकर :सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी जे लेखी उत्तर दिलेले आहे ते असत्य आहे असे मला म्हणावयाचे आहे. 2007,2008 आणि 2009 या सालात आगी लागलेल्या नाहीत असे माननीय मंत्रीमहोदयांनी लेखी उत्तर दिलेले आहे.मी माननीय मंत्रीमहोदयांना सागू इच्छितो की, दिनांक 31 मार्च 2004 रोजी कुर्ला, चुनाभट्टी येथील स्वदेशी मिलला आग लागली होती व त्यामध्ये या गिरणीतील एक इमारत भस्मसात झाली होती, दिनांक .2 जून 2005 रोजी लोअर परळ येथील सीताराम मिलला आग लागली होती त्यात गिरणीचा मोठा भाग भस्मसात झाला होता आणि ही आग दोन दिवस धुमसत होती. दिनांक 2 मे 2006 रोजी बॉम्बे डाईग मिलला किरकोळ स्वरुपाची आग लागली होती परंतु त्यामध्ये प्राणहानी झाली नाही. दिनांक 25 जानेवारी 2008 रोजी लोअर परळ येथील कमला मिलला आग लागली होती ....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे सांगितले आहे की, गिरण्यांना आगी लागलेल्या नाहीत म्हणून आजपर्यंत ज्या गिरण्यांना आगी लागल्या आहेत त्याच्या तारखा मी रेकॉर्डवर आणू इच्छितो .

श्री.रमेश बागवे : बंद गिरण्यांना आग लागलेली नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की,2007,2008 आणि 2009 रोजी गिरण्यांना आगी लागलेल्या नाहीत.म्हणून मी त्यांना तारखा देत आहे. दिनांक 25 जानेवारी 2008 रोजी लोअर परळ येथील कमला मिलला आग लागली होती. दिनांक 2 जून 2008 रोजी लालबागच्या कमानी इंडस्ट्रियल इस्टेट मधील

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कमानी ऑईल मिलला आग लागली होती . दिनांक 4 नोव्हेंबर 2009 रोजी भायखळा येथील न्यू ग्रेट इस्टर्न मिलला रात्री आग लागली होती त्यात तीन मजली इमारतीचे नुकसान झाले होते तसेच दिनांक 10 जानेवारी 2010 रोजी गोल्ड मोहर मिलला आग लागली होती.असे असतांना लेखी उत्तरात असे सांगण्यात आले होते की, गिरण्यांना आगी लागलेल्या नाहीत. आता गिरण्यांना आगी लागल्याच्या तारखा मी वाचून दाखविल्या आहेत. गिरण्यांना आग लावावयाची आणि नंतर त्या गिरण्यांची जागा पुर्नविकासासाठी द्यावयाची या दृष्टीने प्रयत्न केला जात आहे.या ठिकाणी असत्य माहिती देण्यापेक्षा ज्या गिरण्याना आगी लागल्या आहेत त्या कोणत्या कारणामुळे लागल्या आहेत याचा तपास करण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर या जागा पुनर्वविकासासाठी दिल्या जाणार नाहीत या बाबतीत मंत्री महोदय खुलासा करणार आहेत काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता ज्या गिरण्यांच्या आगीचा उल्लेख केलेला आहे. त्या सर्व गिरण्या चालू होत्या. दादर येथील ज्या गिरणीला आग लागली होती ती गिरणी मात्र बंद होती. अशाप्रकारे बंद असलेल्या गिरण्यांना आग लागली असल्याची ही पहिलीच घटना आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे ती माहिती मी स्वत: तपासून पाहीन. विभागाकडून आलेले उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे.जर चुकीची माहिती देण्यात आली असेल तर सबंधित कर्मचा-याविरुध्द आणि अधिका-याविरुध्द कारवाई देखील मी करीन. या प्रकरणात राखेचे विश्लेषण करीत असतांना त्यामध्ये रॉकेल आढळून आले होते त्याचबरोबर साईटवरसुध्दा रॉकेल सापडलेले होते. या आरोपीनी हा गुन्हा कबूल केलेला आहे.या आगीचा तपास करीत असतांना पोलिसांनासुध्दा अशी अडचण आलेली आहे की,या गुन्हयातील ज्या प्रमुख व्यक्ती आहेत त्यातील 6 व्यक्तिंनी ॲटी सिपेटरी बेल मिळविलेला आहे.तेव्हा ज्यांनी प्रत्यक्षात साईटवर आग लावण्याचे काम केले होते त्यांना पोलिसांनी पकडलेले आहे व त्यांनी हा गुन्हा कबूल केलेला आहे.परंतु ज्यांनी हे काम करावयास लावले त्यांनी ॲन्टी सिपेटरी बेल मिळवला आहे.त्यांचा ॲन्टीसिपेटरी बेल रद्द करण्याच्या बाबतील पोलिसांनी कारवाई सुरु केली असून त्यासाठी अर्ज केले आहेत लवकरच

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2683 श्री.आर.आर.पाटील..

त्याबाबतीत निर्णय होईल. हा ॲन्टीसिपेटरी बेल रद्द करुन घेण्यात येईल.सभापती महोदय, ही आग लावण्यामध्ये कोणाचा फायदा होणार होता याचा सुध्दा शोध लावण्याची आवश्यकता आहे.कोणाचा किती फायदा होणार आहे हे देखील तपासून पाहण्यासंबंधीच्या सूचना दिल्या आहेत. जर फायद्यासाठी राष्ट्रीय मालमत्ता जाळण्याचा प्रकार होत असेल तर सन्माननीय सदस्यांनी आता ज्या प्रकरणांचा उल्लेख केलेला आहे त्या बाबतीत एक वरिष्ठ अधिकारी नेमून चौकशी करण्यात येईल. जागेच्या वाढलेल्या किंमती लक्षात घेऊन या जागा डेव्हलप करण्यासाठी जर असे प्रकार घडत असतील तर निश्चितपणे संबंधिताविरुध्द कठोरपणे कारवाई केली जाईल आणि या सगळया आगीच्या संदर्भात एका आय.जी. मार्फत चौकशी करण्यात येईल तसेच या आगीच्या बाबतीत आता स्पष्ट झालेले असल्यामुळे खोलात जाऊन या प्रकरणाची तपासणी करण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे ....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 20 जानेवारी रोजी त्या मिलला आग लागली त्यावेळी मी स्वत: त्याठिक्राणी हजर होतो. त्यानंतर दहा दिवसांनी चीफ फायर ऑफिसरनी या मिलला आग लावण्यात आली असल्याचे स्टेटमेंट दिले. या घटनेला दीड महिना होऊन गेला आहे. या लोकांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना तो जामीन केव्हा मिळाला? मध्यंतरीच्या काळात त्या लोकांना बोलावून पोलिसांनी त्यांची चौकशी कां केली नाही? तिसरा प्रश्न असा की, अटकपूर्व जामीन मिळाला याचा अर्थ त्यांना चौकशीला बोलाविता येत नाही असे नाही. त्यांना फक्त अटक करता येत नाही. त्यांना आपण किती वेळा चौकशीसाठी बोलाविले आणि त्यामधून कोणती माहिती पुढे आली?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, यामधील आरोपी क्रमांक 1 ते 6 यांना दि.4.2.2010 रोजी अटकपूर्व जामीन मिळाला. आरोपींची नावे गौरव पटेल, हर्षदभाई पटेल, संजीव सारडा, सिराज मोहम्मद सैय्यद, गणपतभाई परमार, विनोद माहेश्वरी, दिनेश काळोजी मारवाडी, नटवारलाल बाबूजी दाबी, महेश भिकाजी दाबी, दिनेश नथूलाल शर्मा, पूराजी यमाजी पांचाळ, रामनाथ पांडे, सागर मोहिते, महेंद्र साळुंखे आणि विठोबा राणे अशा एकूण 15 जणांचा समावेश आहे त्यापैकी 6 कॉट्रॅक्टर आहेत व 5 मजूर आहेत, बाकीचे सर्व सिक्युरिटीचे लोक आहेत.

श्री. दिवाकर रावते : त्यांना जामीन दिल्यानंतर त्यांची चौकशी करु नये अशी अट आहे काय? याठिकाणी शाहरुखखानचे नाव घेतल्यानंतर आम्हाला सकाळपासून रात्रीपर्यंत थिएटरमध्ये सिनेमा लागला नसतांनाही पोलीस स्टेशनला बसवून ठेवले जाते. असे असतांना या प्रकरणामध्ये आरोपींकडून माहिती घ्यावयास कोर्टाने पोलिसांना मनाई केली होती काय?

श्री. रमेश बागवे : माननीय सदस्य म्हणत आहेत त्याप्रमाणे आरोपी क्र. 12 ते 15 यांना दिनांक 8 रोजी अटक केली होती आणि दिनांक 17 रोजी पोलीस कस्टडी दिली.

(गोंधळ)

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पोलिसांनी पहिल्यांदा आग लावणाऱ्यांना अटक केली. ज्यांनी आग लावण्यास भाग पाडले त्यांनी अटकपूर्व जामीन मिळविल्यामुळे पुढील चौकशी पोलीस करु शकले नाहीत. अटकपूर्व जामीन रद्द करण्याचा पोलीस प्रयत्न करीत आहेत. ज्यांनी आग लावण्यास भाग पाडले त्यांना इंटरोगेट करतांना त्यामध्ये मालकाचा संबंध आहे की, अन्य कुणाचा संबंध आहे? यामध्ये आणखी कुणाला फायदा होणार आहे काय? हे सर्व तपासणीमधून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. आर.आर.पाटील....

बाहेर येणार आहे. या गोष्टीचा तपास सुरु आहे. सभापती महोदय, शॉर्ट सर्किटने किंवा अपघाताने आगी लागण्याचे प्रकार घडत असतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. परंतु या प्रकरणात पोलिसांना खोलात जाऊन तपासणी करावी लागेल हे आपण सिध्द केले आहे. ही आग लावण्यात आलेली आहे हे विश्लेषणामधून बाहेर आले आहे. याबाबत पृथक्करण करण्यासाठी वेळ लागला आहे. तोपर्यंत काही आरोपी कोर्टात गेले, काही आरोपी फरार झाले. परंतु कायद्याच्या कचाटयातून हे आरोपी सुटणार नाहीत इतका विश्वास मी या सभागृहाला देईन.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, अटकपूर्व जामीन मिळाला म्हणजे तो आरोपी त्या गुन्हयामधून दूर झाला असे होत नाही. त्यांनी पोलिसांच्या तपासामध्ये सहकार्य करावे अशाप्रकारची त्यात अट घातलेली असते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, त्या कालावधीत हे आरोपी फरार होते, त्यानंतर त्यांनी अटकपूर्व जामीन मिळविला. त्यावेळी ते आरोपी कुठेतरी उपलब्ध आहेत हे पोलिसांना माहीत होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना बोलाविले काय? ज्यांच्याकडून आग लावण्याचा प्रकार करवून घेतला ते अटकेत आहेत. परंतु ज्यांनी हे कृत्य करावयास लावले आहे असे कर्ते करविते मोकाट व सुसाट सुटले तर अडचण निर्माण होईल. आणि म्हणून त्यांना आपण चौकशीसाठी बोलाविणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, दिनांक 22.2.2010 रोजी अटकपूर्व जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांनी अर्ज केला आहे. त्यांना बोलावून तपास सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : मूळ प्रश्न असा आहे की, कोर्टाने पोलिसांचे चौकशी करण्याचे काम थांबविले आहे काय?

श्री. रमेश बागवे : चौकशी थांबविलेली नाही, चौकशी सुरु आहे.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या एकूण गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन काहींनी अटकपूर्व जामीन मिळविला असला तरी पोलीस विभागाला त्या आरोपींना दिवसभरामध्ये चौकशीकरिता बोलाविण्याचा अधिकार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2683 . . .

सभापती . . . .

या दृष्टीकोनातून संबंधितांना सातत्याने बोलावून या गुन्ह्याचा छडा लावण्यात येईल काय ? तसेच संबंधित गुन्हेगारांचा ॲन्टीसिपेटरी बेल आहे तो रद्द करण्याचा प्रयत्न केला जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलिसांनी आरोपींना बोलावून विचारले तर ते बऱ्याच वेळेला गुन्हा कबूल करीत नाहीत. आम्ही असे केले नाही असे सांगतात.अलिकडच्या काळामध्ये खूप शास्त्रीय उपकरणे पोलिसांच्या हातामध्ये आलेली आहेत. त्यामुळे पोलिसांना शास्त्रीय पध्दतीने तपास करणे देखील शक्य होत आहे. फॉरेन्सिक लॅबचा आणि इतर आधुनिक सर्व मेथडचा वापर करुन आम्हाला ते आरोपी आमच्या कस्टडीमध्ये हवे आहेत आणि त्यांना मिळविण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. पहिल्यांदा पोलिसांनी ही आग मुद्दाम लावण्यात आली आहे यासंबंधीच्या निष्कर्षाबाबतचे पुरावे गोळा केलेले आहेत. त्यामुळे यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा संबंध नाही.

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळगांव (जि.जळगांव) येथील शिरसोली मार्गावर
गायत्री नगरात पडलेला दरोडा

(6) * 5707 श्री. गुरुमुख जगवानी, श्री. विनोद तावडे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगांव (जि.जळगांव) येथील शिरसोली मार्गावर गायत्री नगरात दिनांक 15 नोव्हेंबर, 2009 रोजी वा त्या सुमारास अज्ञात दरोडेखोरांनी दीड लाखांचा ऐवज लुटुन नेला हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीनुसार दरोडेखोरांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) व (2) होय,
(3) व (4) या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गु.र. 171/2009 भा.द.वि.क. 395 सह आर्म ॲक्ट क्र.3/25 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यात एका संशयीत आरोपीस अटक करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, जलगांव शहर में चोरी एवम् डकैती की घटनाएं आए दिन हो रही हैं. इसी तरह की एक घटना दिनांक 15 नवंबर, 2009 को जलगांव शहर में शिरसोली मार्ग पर गायत्री नगर में हुई, जहां अज्ञात चोरों ने लाखों रुपये लूट लिए. इस घटना के सिलसिले में एक आरोपी को शक की बुनियाद पर गिरफ्तार किया गया है. इस आरोपी को कब गिरफ्तार किया गया, इस आरोपी ने क्या खुलासा किया है, यह आरोपी अभी पुलिस स्टडी में है या बाहर है, आज इस आरोपी की स्थिति क्या है ? जब भी हम रात में पुलिस पेट्रोलिंग की मांग करते है तो जवाब मिलता है कि पुलिस फोर्स कम है. कम से कम रात में पुलिस पेट्रोलिंग की व्यवस्था होनी चाहिए. क्या यह सही है कि, आज जितनी पुलिस फोर्स होनी चाहिए उससे 50 प्रतिशत पुलिस की तादाद कम है ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सदर गुन्ह्यामध्ये संशयित आरोपी श्री.अजितसिंग खुशालसिंग जुई यांना दि.30-10-2009 रोजी अटक करण्यात आलेली आहे आणि त्यांना पाच दिवसाची पोलीस कस्टडी मिळालेली आहे. हा आरोपी जालना, परतूर या तालुक्यातील आहे. तसेच पोलिसांनी गु.र.171/2009 भा.द.वि.क.395 सह आर्म ॲक्ट क्र.3/25 अन्वये अटक केलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी यांनी प्रश्न विचारला की, आरोपीला कधी अटक झालेली आहे ? माननीय मंत्री महोदयांनी ती तारीख दिली.

ता.प्र.क्र.5707 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब, आपण यामध्ये सिरिअसली पाहिले पाहिजे की, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकरणामध्ये सदनामध्ये प्रश्न दिल्यानंतर अशा गुन्ह्यांमध्ये सिरिअसनेस निर्माण होतो. माननीय सदस्यांनी सांगितले की, ही विशिष्ट व्यापारी वस्ती आहे, तेथे पेट्रोलींग केले पाहिजे. येथे दरोडे पडतात आणि तेथे अशा प्रकारची पाचवी घटना घडलेली आहे. तेथे दरोडेखोर आणि पोलीस यांचे संगनमत असते. मग जर अशा प्रकारचा प्रश्न देण्यात आला की संबंधितांना धरुन आणले जाते, हे यातील दुर्दैव आहे. त्यामुळे आपण ही बाब सिरिअसली घेतली पाहिजे. या प्रकरणातील संबंधित आरोपीला कधी अटक केली ? खरे सांगावयाचे तर हा आरोपी सध्या अटकेत आहे की नाही याबद्दल आम्हाला शंका आहे. कारण सभागृहात प्रश्न येतो, पण हा सदनामध्ये येत असताना तो अनुक्रमांक 15 च्या आतमध्ये आहे का ? म्हणजे तो यादीमध्ये येणार आहे काय ? इतके या विषयाकडे खालच्या स्तरावर अधिकाऱ्यांकडून देखील पाहिले जाते.त्यामुळे याबाबतीत एवढे दिवस का लागले ? यामध्ये काय अडचण आहे ? हे आपण सिरिअसली पहावे एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत निश्चितपणे गांभीर्याने पाहिले जाईल. माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार राज्यातील दरोड्यांची संख्या पाहिली तर वाढत नसून घटत आहे. पण एक गोष्ट खरी आहे, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पोलिसांची संख्या पेट्रोलिंगसाठी, अन्य कामासाठी थोडीशी कमी आहे आणि ही संख्या भरण्याच्या दृष्टीने राज्यातील सगळया जिल्ह्यांमध्ये प्रक्रिया सुरु आहे. जळगाव जिल्ह्यातील ही व्यापारी पेठेमध्ये आणि अन्य भागामध्ये अशा प्रकारचे दरोडे पडू नयेत म्हणून गस्त वाढविण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच पोलिसांची संख्या वाढविली जाईलच. पण त्याचप्रमाणे काही व्हेईकल देण्याच्या बाबतीत सुध्दा भूमिका स्विकारली जाईल.

. . . .2 के-4

राज्यात कुपोषणग्रस्त बालकांना पुरविण्यात येणाऱ्या पोषक आहार पुरवठ्याचे कंत्राट खाजगी ठेकेदारांना देण्याचा घेतलेला निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(7) * 2891 **श्री. संजय दत्त, श्रीमती मधु जैन, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री सुभाष चव्हाण, श्री. चरणसिंग सप्रा, डॉ. दीपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. अनिल परब, श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री जयप्रकाश छाजेड, श्री.विक्रम काळे, श्री माणिकराव ठाकरे, प्रा. सुरेश नवले, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.एम.एम.शेख, श्री चंद्रकांत पाटील, श्री. विनोद तावडे, श्री. भगवान साळुंखे** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विशेषत: यवतमाळ जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांना पुरविण्यात येणाऱ्या पुरक पोषण आहार पुरवठ्याचे काम स्थानिक पातळीवरील बचत गटांनाच द्यावे असा मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असतानाही महिला व बालकल्याण विभागाने सदर कंत्राट खाजगी ठेकेदारांना 1 हजार 500 कोटी रुपयांना देण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक 13 जानेवारी, 2010 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पुरक आणि पोषण आहार योजना सदरच्या तीन संस्थाना देण्यामागील कारणे काय आहेत याबाबत राज्यशासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे व राज्यात सुमारे पाच लाखांहून अधिक महिला बचत गट, महिला संस्था कार्यरत आहेत आणि 25 लाखांहून अधिक महिलांचा रोजगार बचत गटांना मिळणाऱ्या कामावर अवलंबून असल्याने सदर कामाचे कंत्राट देण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती फौजिया खान, श्री.सुभाष झनक यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंगणवाडीतच खाण्यासाठी देण्यात येणारा आहार स्थानिक पातळीवर महिला बचत गट / महिला मंडळ / महिला संस्था यांचेकडून पुरविण्यात येत आहे. तर सुक्ष्म पोषक तत्वांनी तयार केलेला घरी नेवून खाण्यासाठी द्यावयाच्या (Take Home Ration) आहाराचे कंत्राट खाजगी ठेकेदारांना देण्यात आलेले नसून निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या 3 महिला संस्थांना देण्यात आलेले आहे.

(2) व (3) होय. घरी नेवून खाण्यासाठी द्यावयाचा आहार हा सुक्ष्म पोषक तत्वांनी युक्त आहार असून असा आहार उत्पादित करुन पुरवठा करण्यास सक्षम बचत गट / महिला मंडळ / महिला संस्था यांच्या मार्फत करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी राज्यस्तरावर जिल्हा निहाय अर्ज मागवून पात्र ठरलेल्या तीन महिला संस्थांची नावे घोषित केलेली असून, लाभार्थ्यांना सुधारित स्वरुपानुसार गुणात्मक व दर्जात्मक आहाराचा लाभ मिळावा यादृष्टीने लवकरात लवकर आहाराचा पुरवठा चालू होण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना देण्यात आलेल्या आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्रीमती मधु जैन : सभापती महोदय, माझे समाधान झालेले आहे.

. . . .2 के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी मूळ प्रश्न पाहिला आणि त्याला देण्यात आलेली उत्तरे पाहिली तर यामध्ये खूप मोठी तफावत आहे असे दिसून येते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2891....

डॉ. दीपक सावंत.....

सभापती महोदय, पहिल्या प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, "महिला व बालकल्याण विभागाने सदर कंत्राट खाजगी ठेकेदारांना 1 हजार 500 कोटी रुपयांना देण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक 13 जानेवारी, 2010 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय"? सभापती महोदय, तारीख दिली आहे, वार देण्यात आलेला आहे तर खरोखरच या दिवशी अशा प्रकारचा काही निर्णय झालेला आहे काय? कारण पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात "हे खरे नाही" असे म्हटले आहे. न्यायालयाचा आदेश कधी झाला, याच्याअगोदर झाला की, याच्यानंतर झाला? हा एक प्रश्न आणि दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, प्रश्न क्रमांक दोन आणि तीन ला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "लाभार्थ्यांना सुधारित स्वरुपानुसार गुणात्मक व दार्जत्मक आहाराचा लाभ मिळावा." सभापती महोदय, अशा प्रकाराच्या पोषण आहारामध्ये नेहमीच भ्रष्टाचार झालेला आपण पाहतो. पोषण आहारचा गुणात्मक दर्जा घसरलेला असतो आणि दर्जात्मक आहार देखील घसरलेला असतो, याबाबतीत नेमके काय करण्यात येणार आहे. हा दर्जा सांभाळण्यासाठी एखादी मॉनिटरींग समिती नेमण्यात येणार आहे काय असा माझा दुसरा प्रश्न आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक 22-4-2009 च्या आदेशानुसार व केंद्र शासनाने दिनांक 24-9-2009 रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार यामध्ये दोन भाग करण्यात आलेले आहेत. एक भाग 3 वर्षा खालील बालके आणि दुसरा भाग 3 ते 6 वर्ष या वयोगटातील कमी वजनाची बालके (श्रेणी 3 व 4) गर्भवती स्त्रिया - Lactating Mothers यांना Micronutrient Fortified Food असे टेक होम रेशन देण्याकरिता राज्यशासनाने दि.24-8-2009 च्या शासन निर्णयानुसार आयुक्त- ICDS यांना पुढील योग्य कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

सभापती महोदय, यानुसार एका वर्षाच्या (300 दिवसा करिता) टेक होम रेशनचा अंदाजित खर्च 476.39 कोटी रुपये इतका आहे. टेक होम रेशनचा पुरवठा करण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. यासंदर्भात रीतसर जाहिरात प्रसिध्द झाली असून त्यामध्ये विहित अटी देण्यात आलेल्या आहेत. खासकरुन Fortified Food

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/

ता.प्र.क्र.2891....

प्रा. फौजिया खान.....

च्या पुरवठयाच्या संदर्भात टेक्निकल अटी आहेत. महिला बचत गटांकडेच हे काम द्यावयाचे आहे. पण कमीत कमी एक कोटी रुपयांची त्यांची उलाढाल असली पाहिजे. तसेच एक लाख रुपये EMD डिपॉझिट असले पाहिजे अशा अटी आहेत. अन्य तांत्रिक पूर्तता करण्याच्या अट म्हणजे Fortified Micronutrients अनुसार असले पाहिजे.

सभापती महोदय, यासंदर्भात काही तक्रारी आल्या आहेत. त्यानंतर यासंदर्भात महिला व बाल कल्याण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका छाननी समितीची स्थापना करण्यात आली. पण त्या समितीचा अहवाल असा आला की, ही जी कार्यवाही झालेली आहे ती योग्य आहे. त्यामध्ये त्रुटी नाहीत. त्यामुळे जी स्थगिती देण्यात आली होती ती उठविण्यात आली आणि पुढची कार्यवाही चालू आहे. त्याशिवाय यासोबतच 3 ते 6 वयोगटातील जी बालके आहेत त्यांच्यासाठी Hot Cooked Meal ची दुसरी योजना आहे.ती योजना ज्या पध्दतीने अगोदर चालू होती त्याच पध्दतीने आज देखील चालू आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. विजय वडेट्टीवार (अतिरक्त कार्यभार वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पहाणी सन 2009-2010 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी सन 2009-2010 सभागृहासमोर ठेवेण्यात आली आहे.

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन 2002-2003 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड...

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "शासनाने विले-पार्ले (पूर्व) , मुंबई येथील नगररचना योजना क्र. 5, सन 1994 नुसार भूखंड क्र. 108 मनोरंजनाचे मैदान म्हणून व भूखंड क्र. 109 'हाऊसिंग फॉर डिस हाऊस्ड' राखून ठेवला असताही त्यावर पार्थ डेव्हलपर्स या विकासकाने झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत पुनर्वसन केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, प्रा. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. दिलीपराव सोनावणे यांनी " दि. 1 नोव्हेंबर, 2005 नंतर सेवेत येणाऱ्या शिक्षण सेवकांना अंशदायी पेन्शन योजना सक्तीची केली जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी बसेसना जनतेला सुकर सेवा देण्यासाठी पथकर व प्रवासी करातून वगळण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "पेण (जिल्हा रायगड) तालुक्यातील डोलवी गावाच्या हद्दीत असणाऱ्या पुलात इस्पात कंपनीने परिसरात गडब, डोलवी, कारावी या गावातील शेतकऱ्यांच्या पिकल्या जमिनीत शेतकऱ्यांना पूर्व कल्पना न देता अनधिकृतपणे माती भरण्याचे काम सुरु केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील देवदासी व विधवा महिलांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकरिता दि. 22 मार्च, 2010 रोजी वा त्यासुमारास मुंबईमध्ये ठिकठिकाणी रेलरोको, धरणे, आंदोलने केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील घाटकोपर येथे राहणाऱ्या 12 वर्षाच्या शाळकरी मुलीवर 9 जणांनी सामूहिक बलात्कार केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई शहरातील नेहरुनगर भागातील एका बेकरी व्यावसायिकाची अल्पवयीन मुलगी एका युवकाबरोबर पळून गेल्यावर तिचा शोध लागत नसल्याचा फायदा घेऊन एका राष्ट्रीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांना पाच लाख रुपये द्या असे सांगून चेंबूर पोलीस ठाण्याच्या तीन हवालदारांना पाच लाख रुपये दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "ए.पी.एम.सी.ने ठाणे, वाडा, वसई, पालघर व भिवंडी या ठिकाणच्या शेतकरी संस्था व त्यांच्या सभासदांना 1997 पासून शेतमाल थेट मुंबईत विक्री करण्याची परवानगी दिलेली असणे, या सर्व संस्थांची सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे नोंद नसल्याचे निदर्शनास येणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने मागील शैक्षणिक वर्षी खरेदी केलेले बेंच हे सागाच्या लाकडाचे नसून पंगेरा झाडाच्या लाकडाचे असल्याचे नुकतेच निष्पन्न झाल्याबाबत, त्यामुळे सदर खरेदी व्यवहरात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती.

सभापती : आज नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती करण्यासंबंधीच्या शासनाच्या दोन आदेशांमध्ये असलेली तफावत

मु. शी. : वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती करण्यासंबंधीच्या शासनाच्या दोन आदेशांमध्ये असलेली तफावत याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती करण्यासंबंधीच्या शासनाच्या दोन आदेशांमध्ये असलेली तफावत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही नियम 93 अन्वये दिलेली सूचना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागासाठी होती. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जी शिष्यवृत्ती मिळत होती त्यासंदर्भात शासनाने दोन निर्णय घेतले. पहिला निर्णय 25 नोव्हेंबर, 2003 ला घेतला. त्यानुसार सन 2003-04 या शैक्षणिक वर्षामध्ये शिष्यवृत्ती स्वरुपात 50 हजार रुपये ते 1 लाख रुपये शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे आदेश दिले. त्यानंतर दिनांक 28 नोव्हेंबर, 2005 रोजी शासनाने दुसरा निर्णय घेतला. त्यानुसार सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्कासाठी फक्त 50 टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याचे आदेश दिले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

त्यामुळे 10 ते 12 हजार अनुसूचित जाती/जमाती, ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम झाला आहे. ही रक्कम त्यांना अदा झालेली नाही. त्यांना रु.6,32,11,000/- इतकी रक्कम निर्गमित झाली नाही. सभापती महोदय, या निवेदनात असे नमूद केले आहे की, "मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फाऊंडेशन प्रकरणी दिनांक 31.10.2002 रोजी दिलेला न्याय निर्णय तसेच दि.14.8.2003 रोजी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक निदेशानुसार खाजगी विना अनुदानित शिक्षण संस्थांना शैक्षणिक शुल्क ठरविण्याचे अधिकार प्राप्त झाले. मात्र हे शुल्क मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावे असे स्पष्ट केले होते. त्याचा परिणाम म्हणून खाजगी विना अनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क मोठया प्रमाणावर वाढले." यामध्ये विद्यार्थ्यांचा दोष नाही. सन 2003-04 मध्ये एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला 1 लाख रुपये, बीडीएसच्या विद्यार्थ्याला 75 हजार रुपये, बीएएमएसच्या विद्यार्थ्याला 50 हजार रुपये, होमिओपॅथी, युनानी, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व परिचर्याच्या विद्यार्थ्यास 20 हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात होती. परंतु सन 2004-05 मध्ये ही शिष्यवृत्ती 50 टक्क्यांनी कमी करण्यात आली. त्यानुसार एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला 50 हजार रुपये, बीडीएसच्या विद्यार्थ्याला 25 हजार रुपये, बीएएमएसच्या विद्यार्थ्याला 12 हजार रुपये, होमिओपॅथी, युनानी, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व परिचर्याच्या विद्यार्थ्यास 5 हजार शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय झाला. या निवेदनात असे म्हटले आहे की, "या 2003-04 च्या शिष्यवृत्ती योजनेप्रमाणे शिष्यवृत्ती द्यावयाची झाल्यास 30 कोटी पर्यंत अतिरिक्त भार सोसावा लागेल." सन 2003-04 मध्ये गरीब विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यासाठी शिष्यवृत्तीचा जी.आर.काढण्यात आला. त्यानुसार त्यांना शिष्यवृत्ती द्यावयास पाहिजे होती. परंतु पुढील वर्षी शिष्यवृत्तीची रक्कम 50 टक्क्यांवर आणली, हा विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत आहेत, हे विद्यार्थी फी भरु शकत नाहीत. त्यामुळे सन 2003-04 प्रमाणे या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे काय ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सन 2003-04 च्या शिष्यवृत्ती योजनेप्रमाणे वैद्यकीय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातील अनुसूचित जाती/जमाती, व्हीजेएनटी, एसबीसी च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची 100 टक्के प्रतिपूर्ती केली जाते. हा प्रश्न ओबीसी व ईबीसीच्या विद्यार्थ्यांचा आहे. त्यांच्यासाठी प्रत्येक वर्षात शैक्षणिक धोरण ठरवून निर्णय घेतला जातो. आपण असे सांगितले की, सन 2003-04 मध्ये एमबीबीएसच्या विद्यार्थ्यास 1 लाख रुपये शिष्यवृत्ती दिली जात होती. सन 2004-05 मध्ये ही रक्कम 50 हजार रुपये करण्यात आली. तसेच 2005-06 मध्ये 50 हजार रुपये देण्याचा सन 2006 मध्ये जी.आर.इश्यू करण्यात आला. आपल्या सांगितल्याप्रमाणे सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार खाजगी महाविद्यालयांसाठी शैक्षणिक शुल्क ठरविण्याची जबाबदारी किंवा अधिकार शिक्षण शुल्क समितीला दिले. हे अधिकार त्यांना दिल्यानंतर सन 2006-07 मधील जे ईबीसीचे व ओबीसीचे विद्यार्थी आहेत त्यांची 50 टक्के प्रतिपूर्ती करण्याचा शासनाचा निर्णय झालेला आहे. तो जी.आर.आजतागायत लागू आहे. आजच्या 93 च्या सूचनेतील प्रश्न पूर्वीच्या विद्यार्थ्यांचा आहे. याबाबत मी सांगेन की, शासनाचा जी.आर. पुढील कालावधीसाठी लागू होतो. मागील प्रत्येक वर्षाचे शुल्क असते त्याची प्रतिपूर्ती शासनाच्या निर्णयानुसार केली जाते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यात ओबीसींवर अनेक बाबतीत अन्याय होतो. ओबीसीच्या विद्यार्थ्यांवर शिष्यवृत्तीबाबत अन्याय होत आहे, फी माफी देण्यासंबंधी अन्याय होत आहे. राज्यात ओबीसींची संख्या 52 टक्के आहे. त्यामुळे अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती दिली जाते त्याप्रमाणे याही विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती देण्याबाबत शासन सहानुभूतिपूर्वक विचार करणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. सध्या तरी 50 टक्के शैक्षणिक शुल्काची पूर्तता केली जाते.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ओबीसींच्या विद्यार्थ्यांबाबत शासनाने सहानुभूतिने विचार करण्याची गरज आहे असे म्हटले आहे. त्या विद्यार्थ्यांनाही 100 टक्के शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सभागृहाच्या आणि आपल्या भावना मी मंत्रिमंडळापुढे घेऊन जाईन.

डॉ. दीपक सावंत : शिष्यवृत्तीमध्ये ओ.बी.सी.विद्यार्थ्यांना अंतर्भूत केले तर त्यामुळे शासनावर फार मोठा आर्थिक भार पडणार नाही. मला वाटते केवळ 6 ते 8 कोटी रुपयाचा आर्थिक भार पडेल. ओ.बी.सी.चे 52 टक्के विद्यार्थी आहेत. त्यामुळे लवकरात लवकर हा धोरणात्मक निर्णय घ्यावा.

प्रा. वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी 100 टक्के शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भातील वेगळा प्रश्न विचारलेला आहे. मी या सभागृहाच्या भावना निश्चितपणे मंत्रिमंडळासमोर घेऊन जाईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयास मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेली नोटीस

मु.शी. : मुंबईतील के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयास मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेली नोटीस यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील यांनी "मंबईतील के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयास मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेली नोटीस" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ग्रामीण भागातील इन्स्पेक्शन आणि हे वैद्यकीय महाविद्यालयातील इन्स्पेक्शन सारखेच आहे असे वाटायला लागले आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापकांच्या ज्या जागा रिक्त दाखविण्यात आल्या त्या प्रत्यक्षात रिक्त नसून ते परीक्षणाच्या दिवशी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्या 2 प्राध्यापक व 4 सहयोगी प्राध्यापकांच्या विषयीचा अहवाल भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे पाठविण्यात आला आहे." म्हणजे इन्स्पेक्शनच्या वेळी एका लाईनमध्ये प्राध्यापक उभे करुन त्यांची हजेरी घेऊन जे हजर असतील ते कामावर आणि जे गैरहजर आहेत ते सेवेमध्ये नाहीत असे समजून इन्स्पेक्शन घेण्यात येते काय ? की फाईल्स पाहून इन्स्पेक्शन केले जाते ? मुंबईतील जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय हे नावाजलेले असून तेथे 98-99 टक्के मार्क्स असलेल्या विद्यार्थ्यांना ॲडमिशन मिळते. अशा या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जे हजर असतील ते कामावर आणि गैरहजर असतील ते सेवेतच नाहीत असे इन्स्पेक्शनच्या वेळी समजण्यात आलेले आहे काय ? मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने जानेवारी 2007मध्ये इन्स्पेक्शन केले हे खरे आहे काय आणि त्या इन्स्पेक्शनमध्ये कोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत ? जानेवारी 2008 तसेच डिसेंबर 2009 मध्ये इन्स्पेक्शन केल्यानंतर अशा प्रकारची नोटीस मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेली आहे, हे खरे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : हे इन्स्पेक्शन खास बाब म्हणून नाही तर नियमितपणे आणि वरचेवर इन्स्पेक्शन होत असते. ज्यावेळी इन्स्पेक्शन करण्यात आले त्यावेळी 97 पदे कायम असल्याचे कमिटीच्या लक्षात आले. त्यासंबधीचा खुलासा करीत असताना असे म्हटलेले आहे की, 17 पदे कमी होती असे वाटत असले तरी त्या दिवशी 2 प्राध्यापक आणि 4 सहयोगी प्राध्यापक कमी दिसत असले तरी ते त्या दिवशी गैरहजर होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एमसीआयचे इन्स्पेक्शन आधी ठरलेले असते. कॉलेजचे डीन हे खाजगी वैद्यकीय महाविद्यालय, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय, महानगरपालिकेचे वैद्यकीय विद्यालय, यांना इन्स्पेक्शनच्या संबंधात सूचना दिल्या जातात की, प्रत्येक प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकाने शंभर टक्के हजेरी द्यावी. अशा प्रकारच्या सूचना के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात आलेल्या होत्या काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेले प्रश्न वेगवेगळे आहेत. प्राध्यापकांची हजेरी घेतली होती का ? इन्स्पेक्शनच्या दिवशी ते हजर नव्हते म्हणून त्या जागा रिक्त दाखवण्यात आल्या का अशा आशयाचे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहेत.

...नंतर श्री. खंदारे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.... श्री.भास्कर जाधव.....

त्यांची नेमणूक झाली होती की नाही हे आपल्याला रजिस्टरवरुन कळेल. जर त्यांची नेमणूक झालेली नसेल आणि तरी देखील या ठिकाणी असत्य माहिती देण्याचा प्रयत्न झालेला असेल तर त्याची माहिती घेऊन असत्य उत्तर दिल्याबद्दल निश्चितपणे कारवाई केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एम.सी.आय.चे ज्यावेळी इन्स्पेक्शन असते त्यावेळी त्याची पूर्वसूचना दिली जाते.

श्री.भास्कर जाधव : इन्स्पेक्शनच्या वेळी सर्वांनी हजर रहावे असे असताना त्या दिवशी गैरहजर राहण्याची भूमिका घेतली होती का याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. अधिकची माहिती सन्माननीय सदस्यांना पुरविण्यात येईल. हा आयत्यावेळी आलेला विषय आहे. एकूण 97 पदे रिक्त आहेत. त्या 97 पदांपैकी 50 टक्के पदे.....(अडथळा)..एमपीएससीकडून ही पदे भरली जातात. त्याची प्रक्रिया सुरु आहे.....(अडथळा)...50 टक्के पदे.....

सभापती : मी हे निवेदन राखून न ठेवता एवढेच सांगेन की, मंत्रीमहोदयांनी आपल्या दालनामध्ये सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे या दोन ज्येष्ठ सदस्यांना बोलवावे आणि या संदर्भातील कार्यपध्दती त्यांना समजून सांगावी.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान मिळणे

मु. शी. : राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान मिळणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये वेगवेगळया माध्यमातून या सभागृहातील सन्माननीय सदस्य हा विषय सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न करतात. मला वाटते पुन्हा एकदा त्याचाच भाग म्हणून नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित झाला आहे. दोन महत्वाचे मुद्दे आहेत. एक म्हणजे राज्यातील अनुदानित शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. ते अनुदान पुन्हा सुरु करण्याच्या संदर्भात वेळोवेळी सभागृहात आश्वासन दिले. ते अनुदान सुरु करण्यासाठी एक उपसमिती गठित झाली होती. त्या उपसमितीचा अहवाल देखील शासनास प्राप्त झाला आहे. शासनाने उत्तर दिले आहे की, या संदर्भात आम्ही लवकरच मंत्रीमंडळापुढे जाणार आहोत. पुन्हा हा विषय पुढील अधिवेशनात येऊ नये म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने वेतनेतर अनुदान सुरु करण्याच्या संदर्भात मंत्रीमंडळासमोर जाऊन हा प्रश्न निकाली काढावा अशी मी विनंती करतो. दुसरा प्रश्न हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा आहे. सातत्याने गेल्या 10 वर्षापासून हा विषय सभागृहापुढे येत आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी हे दोन्ही विषय मार्गी लावावेत. सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मी विनंती करीत आहे. मंत्रीमहोदय याप्रमाणे कार्यवाही करतील काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात लवकरच मंत्रीमंडळापुढे जात आहोत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत मुख्य सचिवांची उच्चस्तरीय समिती आहे. त्यांना सूचना देत आहोत की, याबाबत त्यांनी लवकर निर्णय घ्यावा.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मागील अधिवेशनात न्याय देण्याचा आपण प्रयत्न केला होता. 15 डिसेंबर, 2009 रोजी हा विषय तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून चर्चेला आला होता. 22 डिसेंबर, 2009 रोजी आपल्या दालनात चर्चा करण्यासाठी पत्र दिले होते. शिक्षणमंत्री उपस्थित झाले होते. परंतु वित्त मंत्री व वित्त सचिव यांना बोलावणे आवश्यक होते. ती बैठक अद्यापही आपल्या दालनात झालेली नाही. आपण तातडीने ही बैठक बोलवावी आणि संबंधित आमदार व शिक्षणमंत्र्यांसमवेत वित्तमंत्री यांनी देखील बैठकीला येणे आवश्यक आहे. एका महिन्यात आत हा निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून ही बैठक बोलवावी.

सभापती : मी वित्तमंत्र्यांना जरुर बोलावतो. शिक्षणमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्याचे मुख्यमंत्री लेखी स्वरुपामध्ये गोविंदभाई श्रॉफ यांच्या शिष्टमंडळाला लिहून देतात.....

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

सभापती महोदय, वेतनेत्तर अनुदान हे कमिटेड एक्स्पेंडिचर असल्यामुळे ते दिले पाहिजे असे सभागृहामध्ये उच्च शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण मंत्री या दोघांनीही कबूल केले. अशा प्रकारचे कमिटमेंट राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनीही दिलेले आहे. परंतु या गोष्टीला 9 वर्षे होऊन देखील तसा निर्णय न होणे हे योग्य नाही. ग्रामीण भागातील शाळा आणि महाविद्यालयांची स्थिती आपणा सर्वांना माहितीच असेल, त्यांची तुलना शहरातील मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजेसबरोबर करुन चालणार नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारल्यानुसार हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधीचा निर्णय झाला पाहिजे तो शासन घेणार काय ? तसेच दुसरा प्रश्न म्हणजे गोविंदभाई श्रॉफ यांना जे लेखी लिहून दिले त्याचा शासनाला विसर पडला की काय अशी शंका येते. कारण आजच्या निवेदनामध्ये तो उल्लेख वगळण्यात आला आहे. परंतु शासनाने असे सांगावे ते खरे नसून निवेदनात लिहितांना जरी वगळले असले तरी हे अधिवेशन संपण्यापूर्वीच यासंबंधीचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, महाविद्यालयीन वेतनेत्तर अनुदान यामध्ये अंतर्भुत आहे. त्यासाठी आपण वर्षाला 72 कोटी रुपये खर्च करणार आहोत. हा विषय सुध्दा समितीसमोर झालेल्या चर्चेनुसार सुरु आहे. एकंदर ग्रामीण भागातील शाळांकरिता वेतनेत्तर अनुदान हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असून हा विषय लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणून त्यासंबंधीचा निर्णय घेण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहात वारंवार हा विषय उपस्थित झालेला आहे, त्याला अनेक वेळा उत्तरही दिलेले आहे. सन 2004 पासूनची थकबाकी अद्यापही मिळाली नाही. शासनाचा धोरणात्मक निर्णय जेव्हा होईल तेव्हा होऊ देत, परंतु ही थकबाकी ताबडतोब देण्यात येणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, हा संपूर्ण विषय आम्ही मंत्रिमंडळासमोर नेणार आहोत. त्याचप्रमाणे आपण निदेश दिल्याप्रमाणे आपल्या दालनात माननीय वित्तमंत्री आणि मी अशी एकत्रित चर्चा करुन यातून मार्ग काढण्यात येईल.

सभापती : येत्या 5 दिवसात अशी बैठक घेण्यात यावी.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या निवदनातील क्र. 4 च्या निवेदनासंबंधी

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आज शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटची बैठक असल्याने निवेदन क्रमांक-4 नंतर घेण्यात यावे.

डॉ. दीपक सावंत : सिनेटच्या बैठका अधिवेशन काळातच लावल्या जातात. कारण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची बैठक देखील दोन अधिवेशनांपूर्वी ठेवली होती. म्हणून अधिवेशन काळात अशा बैठका घेऊ नयेत. हा धोरणात्मक प्रश्न असल्यामुळे तशा बैठका अधिवेशन काळात ठेवू नयेत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्नासंबंधी</u>

श्री. विनोद तावडे : आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 29, पृ.क्र. 19 वर "विदर्भ राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्त्या" हा जो प्रश्न आहे तो सभागृहातील सन्माननीय सदस्यांनीच विचारलेला असल्याने "विदर्भ राज्य" हे संपूर्ण सभागृहाला मान्य आहे त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनाही ते मान्य आहे असे पाहून मला बरे वाटले. याबद्दल मी विधानमंडाळाचे अभिनंदन करतो. शेवटी स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा सभागृहालाही पटलेला आहे.

सभापती : 29 क्रमांकाचा जो प्रश्न आहे तो प्रा.सुरेश नवले, श्री. राजन तेली, श्री जयप्रकाश छाजेड, श्री. संजय दत्त व श्री. सुभाष चव्हाण या सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. हा विधान मंडळाबाबतचा मुद्दा आहे. तरी देखील यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता असेल तर ती बाब तपासून तशी दुरुस्ती करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात एखाद्या प्रश्नाला आपल्या बाजूने कारण नसतांना वळविण्याचा येथे प्रयत्न होत आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेतील 29 नंबरचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले आणि अन्य 5-6 सदस्यांनी विचारलेला आहे. खरे म्हणजे प्रश्नाचा गाभा टिकला पाहिजे तसेच त्याला हेडींग सुध्दा पाहिजे असते व त्यानंतर सप्लीमेंटरी 2-3-4 होत असतात.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या प्रश्नाला चुकीचे हेडींग दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी संबंधितांना भेटून काही तरी करुन हे हेडींग छापून आणलेले दिसते. श्री. विनोदजी तावडे यांनी संगनमताने हे केलेले आहे असा माझा आरोप आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाचे हेडींग बरोबर आले की, प्रश्न सुटतो. खरे म्हणजे हा विदर्भ राज्याचा विषय आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, प्रश्नाच्या हेडींगमध्ये "विदर्भ राज्य" छापणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे ज्यांनी ही चूक केलेली आहे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

सभापती : यासंदर्भात मी नोंद घेतली असून यामध्ये काय करता येईल ते पाहतो.

आजच्या कामकाज पत्रिकेत 5 लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत. या लक्षवेधी सूचना आज चर्चेला घेतल्या जाणार नाहीत. आजच्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते माननीय पांडुरंग फुंडकर तसेच गट नेते श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या बरोबर झालेल्या चर्चेत आज या पाच लक्षवेधी सूचना घेऊ नयेत अशी विनंती केलेली आहे. तसेच आजचे एकूण कामकाज बघितले तर अजून आपल्याला पुरवणी मागण्यावर चर्चा करावयाची आहे त्यानंतर 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे, एक शासकीय बील आहे तसेच त्यानंतर दोन अर्धा तासाच्या चर्चा आहेत. त्यामुळे आजच्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या असून या लक्षवेधी सूचना उद्या, परवाच्या कामकाजात एक दोन, एक दोन करुन कव्हर करण्यात येतील. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येईल व त्यानंतर मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित होईल येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : साहित्य संमेलनासाठी निधी योग्य त्या मार्गाने देण्याबाबत.

मु. शी. :साहित्य संमेलनासाठी निधी योग्य त्या मार्गाने देण्याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्या डॉ.नीलम गो-हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, साहित्य संमेलन पुण्यात मार्च महिन्याच्या अखेरीस होत आहे. या साहित्य संमेलनासाठी अनेक प्रायोजक समोर आले. साहित्य संमेलनाचे प्रायोजक म्हणून माणिकचंद फाऊंडेशनने 20 लाख रु. देऊ केले होते. डॉ. अभय बंग यांनी व्यसनाशी संबंधित पैसा नको असे जाहीर केले. विशेष म्हणजे माध्यमे व लोकांनीही यात अनुकूलता दाखवली. खरा प्रश्न असा आहे की, संमेलनांनी कशा प्रकारे निधी जमा करावा ? सर्वात महत्वाचे म्हणजे संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. सतीश देसाई व सर्व समितीने वीसलाख रुपयांच्या निधीचे प्रायोजकत्व नाकारावयाचे ठरविले की, माणिकचंदनेच पैसे न देणे योग्य मानले ? या प्रश्नापेक्षा हा तिढा सुटावा व साहित्य संमेलनाचा मार्ग सुकर व्हावावा. साहित्य संमेलनासाठी आम्हा स्थानिक आमदारांकडे देखील संयोजनकांनी विनंती केली होती परंतु नियोजन विभागाने परवानगी दिलेली नाही. परिणामी आमदारांनी पत्र देऊनही ती अनिर्णित आहेत. मला परवानगी न मिळाल्याने निधी देऊ शकले नाही. तसेच पुण्यातील शिवसेनेचे अन्य आमदार महादेव बाबर व आमदार चंद्रकात मोकाटे, आम्ही केवळ लाल फितीत निधी सापडू नये म्हणून प्रत्यक्ष निधी देऊ शकलो नाही. त्यामुळे शासनाने राज्य साहित्य संमेलनाबाबत स्थानिक आमदारांच्या स्थानिक विकास निधीबाबत योग्य तो धोरणात्मक निर्णय घ्यावा, याकडे विशेष उल्लेखाद्वारे आपले लक्ष वेधत आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

पृ.शी. : अतिसंवेदनशील आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनवाढीचा लाभ देणे

मु.शी. अतिसंवेदनशील आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनवाढीचा लाभ देण्यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

सभापती : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो

" राज्य शासनाच्या 6 ऑगस्ट 2002 च्या शासन निर्णयानुसार आदिवासी , अतिसंवेदनशील व नक्षलग्रस्त भागातील राज्य सरकारी कर्मचा-यांना एकस्तर वेतनवाढीचा लाभ देण्यात येतो, या योजनेचा लाभ ठाणे जिल्हयातील डहाणू व जव्हार प्रकल्पांतर्गत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळत होता.

सरकाराने राज्य सरकारी कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर नवीन वेतनश्रेणीनुसार विक्रमगड तालुक्यातील गृह विभागातील पोलिसांना एकस्तर वेतनवाढीचा लाभ या पूर्वी देण्यात आला होता परंतु आता तो बंद करण्यात आला असून या सर्वांना त्या योजनेपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे.

शिक्षण विभागातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनाही या एकस्तर वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय असूनही आणि तो मिळावा यासाठी वारंवार विनंती करुन व त्याबाबतीत शासनाने आदेश काढूनही संबंधित अधिकारी त्याची अंमलबजावणी करीत नाही व एक स्ज्ञतराचा लाभ या कर्मचा-ांना देत नाही तेव्हा या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती आहे की, अतिसंवेदनशील आदिवासी भागातील पोलिसांना व अनुदानित संस्थांमधील शिक्षक शिक्षंकेतर कर्मचा-यांना शासनाने मान्य केलेला एकस्तर वेतनवाढीचा लाभ तातडीने देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी."

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कवी नारायण सुर्वे यांना सरकारने विनाविंलब घर देणे

मु.शी. : कवी नारायण सुर्वे याना सरकारने विनाविलंब घर देण्याबाबत श्री.किरण पावसकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

सभापती : माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.:-

" महाराष्ट्राचे सुवर्ण् महोत्सवी वर्ष साजरे होत असतांना महाराष्ट्राची शान व मान अधिक उंचावर नेण्याचे काम साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांनी केलेले आहे. महाराष्ट्राला संताची भूमी समजली जाते या भूमीशी कवी , लेखक, साहित्यिक, खेळाडू, कवी ,नाटककार यांनी इमानइतबारे नाते टीकवले आहे. त्यामुळे काहीजण चांगल्या परिस्थितीत रहात आहेत तर काही कठीण परिस्थितीत रहात आहेत. ज्यांची परिस्थिती अत्यंत कठीण आहे ते असे म्हणतात की ,भ्रष्टाचाराने बरबटलेल्या यंत्रणेकडे आम्ही काय मागावयाचे आणि ते आम्हाला फुकट काय देणार आहेत ? मी या विशेष उल्लेखाव्दारे सांगू इच्छितो की ज्येष्ठ कवी श्री नारायण सुर्वे यांची प्रकृती ढासळली असून ते सध्या नेरुळ येथे आपल्या मुलाच्या घरी राहत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना घर देण्याच्या बाबतीत आश्वासन दिले होते. आजही त्यांच्याकडे घर नाही म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की त्यांना घर देण्यासंबंधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात यावी आणि साहित्यिकांमध्ये चांगले वातावरण निर्माण करावे "

सभापती : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी याची नोंद घ्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, नोंद घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे प्रादेशिक विकास योजना लागू असतांना होत असलेले अनधिकृत बांधकाम

मु.शी. : नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे प्रादेशिक विकास योजना लागू असतांना होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

सभापती : माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विनोद तावडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.:-

" सभापती महोदय, बारा ज्योर्तिलिंगा पैकी एक ज्योर्तिलिंग नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे आहे. त्याच्या सभोवतालचे भौगोलिक, नैसर्गिक नयनरम्य वातावरण अबाधित रहावे म्हणून शासन नियमाधारित प्रादेशिक विकास योजना त्या ठिकाणी लागू करण्यात आलेली आहे परंतु त्या योजनेकडे दुर्लक्ष करीत शाळा, अभियांत्रिकी, कृषी अशा विविध क्षेत्रातील शाळा इंटरनॅशनल स्कूलच्या नावाखाली सुरु करीत असतांना अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे.प्रादेशिक विकास योजनेमध्ये नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सुमारे 48 हजार एकर जागेचा त्यामध्ये समावेश होतो. या योजनेशी संबंधित हे क्षेत्र आरक्षित म्हणून सरकार दफ्तरी त्याची नोंद आहे.अशा क्षेत्राला रिजनल पार्क म्हणून संबोधले जाते. शासन निर्दिष्ट अशा क्षेत्रातील नैसर्गिक सौदर्य अबाधित रहावे, तेथील डोंगर द-याचा -हास केला जाऊ नये,नैसर्गिक स्त्रोताचे जतन व संवर्धन केले जावे, पुरातन मंदिरे आणि वास्तूचे अवशेष यांना धक्का पोहोचू नये याची काळजी घेणे आवश्यक आहे, त्यामुळे डोंगर फोडून सपाटीकरण करणें ही बाब तर दूरची आहे. या क्षेत्रात जर कोणाला काही कामे करावयाची असतील तर त्यासाठी शासनाची पूर्व परवानगी आवश्यक ठरते. त्र्यंबकेश्वर क्षेत्रातील सुमारे 20 हून अधिक गावाचा या योजनेत थेट संबंध येत असल्यामुळे एका अर्थाने हा संपूर्ण परिसर ना विकास क्षेत्रात समाविष्ट होतो परंतु दुर्देवाने काही मंडळीच्या पुढाकाराने नैसर्गिक परिसरातील शैक्षणिक संस्था सुरु करुन या भागातील नैसर्गिक असमतोल बिघडविण्याचे काम चालू आहे.मी या विशेष उल्लेखाव्दारे अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ....

विनंती करतो की, या प्रकरणाची शासनाने चौकशी करावी. तुळजापूर वा अन्य ठिकाणच्या क्षेत्रासाठी निधी देऊन त्या भागाचा विकास करण्याचे शासनाने ठरविलेले आहे तेव्हा त्र्यंबकेश्वरसाठी देखील अशा प्रकारे निधी देऊन विकास करण्याचे जर पुढील काळात शासनाने ठरविले व त्या ठिकाणी अगोदरच बांधकामे झाली असतील तर विकासाची कामे करणें अवघड जाते तेव्हा या बाबत शासनाने योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला विनंती करीत आहे."

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करणे

मु.शी.: शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करणे

याबाबत श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांचा विषय या शासनाने गांभीर्याने घ्यावा अशी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे. खरे तर या शिक्षण सेवकांना दरमहा 3 हजार रुपयांचे मानधन मिळते. या तुटपुंज्या पगारामध्ये त्यांना वेठबिगारासारखे राबविले जाते. हे मानधन आपल्याला कधी वाढवून मिळेल याची गेल्या दहा वर्षापासून शिक्षण सेवक वाट पहात आहेत. मध्यंतरीच्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये घेतलेला निर्णय पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केला व त्याची प्रेस नोट देखील काढली. त्यानंतर दूरदर्शन व चॅनेल्सवर ती बातमी दाखविण्यात आली. सर्वच शिक्षण सेवकांनी त्यांच्या मानधनामध्ये वाढ झाल्याबद्दल आनंद साजरा केला, फटाके वाजविले. परंतु एक तासानंतर शासनाच्या वतीने तो निर्णय मागे घेण्यात आला. त्यामुळे सर्व शिक्षण सेवकांना खूप दुःख झाले. अशा या शिक्षण सेवकांच्या भावनेशी खेळण्याचे काम या शासनाने करु नये अशी माझी विनंती आहे. आज 3 हजार रुपयांच्या मानधनामध्ये हा शिक्षण सेवक कसा काय जगू शकतो? आपली बायको-मुले उपाशी ठेवून हे शिक्षक चांगली पिढी महाराष्ट्राला कशी काय देऊ शकतो? सभापती महोदय, आज रोजंदारीवर काम करणारा, नाक्यावर काम करणारा कामगार सुध्दा दिवसाला 200 रुपये कमावितो, महिन्याला 6 हजार रुपये कमावितो. असे असतांना 3 हजारामध्ये शिक्षण देण्याचे काम गेल्या दहा वर्षापासून शिक्षण सेवकाच्या माध्यमातून चालले आहे. म्हणून माझी माननीय नामदार श्री. बाळासाहेब थोरात यांना विनंती आहे की, आपण या शिक्षण सेवकांचा जास्त अंत पाहू नये. आज 7 हजार शिक्षण सेवक उपोषणाला बसले आहेत ही बाब या शासनाला निश्चितपणे शोभादायक नाही. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण आपले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. रामदास कदम....

दोन शब्द खर्च करुन शक्य झाल्यास यासंबंधी शासनाला निदेश द्यावेत. आणि या शिक्षण सेवकांच्या भावनेशी न खेळता विशेष बाब म्हणून त्यांना न्याय देण्यात यावा अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नामध्ये स्वत: लक्ष घालून हा प्रलंबित प्रश्न सोडवावा.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय.

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(1.56 ते 2.30 मध्यंतर)

ार सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी./मु.शी.: सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

उपसभापती : आता सन 2009-2010 च्या ,खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्रीमती वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, पान क्र.29, बाब क्र.33 बाबत सांगावयाचे तर मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी निधीमधील वाढती तफावत भरुन काढण्याकरिता पूरक मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. मुंबईमध्ये अशा प्रकारचा प्रकल्प होणे हे अत्यंत आवश्यक आहेच. पण त्याचबरोबर इतर शहरांप्रमाणे पुणे शहरामध्ये सुध्दा अतिशय मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असते, तेथे देखील वाहतुकीचा प्रचंड प्रॉब्लेम निर्माण होतो. त्यामुळे त्याठिकाणी सुध्दा अशा प्रकारचे प्रकल्प राबविणे अत्यंत महत्वाचे आहे. या अनुषंगाने एक बाब जरुर सांगू इच्छिते की,आपण ज्यावेळी शहरातील ट्रान्सपोर्टच्या अनुषंगाने प्रकल्प हाती घेतो,तेव्हा त्याठिकाणी एक इंटीग्रेटेड ॲप्रोच होण्याची गरज आहे.मग काही ठिकाणी मोनोरेल, काही ठिकाणी ट्रेन्स्, काही ठिकाणी मेट्रो, काही ठिकाणी बी.आर.टी. तर काही ठिकाणी वॉक-वे सुध्दा तसेच एन.एम.टी म्हणजे नॉन मोटराईज् ट्रान्सपोर्टचे सुध्दा काही ॲप्रोचेस् घेतले जातात, तेव्हा ते सगळे इन्ट्रीग्रेटेड असावेत आणि ते एकमेकांना साजेसे असावेत असे मला आवर्जून सांगावयाचे आहे.म्हणून ज्यावेळेला प्रत्येक शहरामध्ये ट्रान्सपोर्टची सोय करावयाची असेल तेव्हा हा इन्ट्रीग्रेटेड ॲप्रोच घेऊन व्यवस्थित एक डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे गरजेचे आहे आणि याबाबतीत शासनाकडून संबंधितांना तशा पध्दतीचे निदेश जाणे सुध्दा महत्वाचे आहे. जेएनयुआरएमच्या माध्यमातून शहरांमध्ये खूप पैसा येऊ लागलेला आहे. पण असे दिसून येते की, जेव्हा हा निधी मागितला जातो,तेव्हा केवळ निधी मिळत आहे म्हणून लवकरात लवकर प्रस्ताव दाखल करावा, जेणेकरुन तसे केल्याबरोबर मग आपल्याला पैसे मिळतील अशा दृष्टीकोनातून प्रकल्प घेतले जातात.पण त्यामध्ये डिटेल्स् प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केलेला नसतो.त्याचे एक अतिशय ज्वलंत उदाहरण म्हणजे पुणे येथील बी.आर.टी.साठी पैसे मिळविले,त्यासाठी रोड वाईंडींग केले. पण त्यामध्ये व्यवस्थित इंटीग्रेटेड ॲप्रोच नव्हता, व्यवस्थित प्लॅनिंग नव्हते.त्यामुळे आजच्या घडीला

. . . .2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण . . . .

बी.आर.टी.प्रकल्प चांगला असून सुध्दा तो व्यवस्थितपणे सुरु होऊ शकलेला नाही. दोन वेळा बस स्थांबे बदलण्यात आले, दोन वेळा रेलींग बदलण्यात आले, सायनेजेस नाहीत त्यामुळे आपण निधी असून सुध्दा त्याचा व्यवस्थित वापर करीत नाही असे निदर्शनास आलेले आहे. म्हणून मला या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदरहू दोन मुद्दे मांडावेसे वाटतात.

सभापती महोदय, पान क्र.29, बाब क्र.32 याठिकाणी नांदेड-वाघाळा महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही नवीन गावे समाविष्ट झालेली आहेत आणि भोकर नगरपरिषदेच्या बाबत सांगावयाचे तर तेथे सुध्दा दर्जावाढ झाली आहे, त्यामुळे विशेष घटक योजनेअंतर्गत शहरी दलित वस्ती सुधार योजनेकरता पूरक मागणी करण्यात आलेली आहे. मला शासनाचे अभिनंदन करावयाचे आहे की, ज्यावेळेला नवीन भाग समाविष्ट होतो, तेव्हा तो सुरुवातीला थोडा दुर्लक्षित रहातो आणि त्यामुळे तेथे तातडीने काही कामे होऊ शकत नाही. म्हणून यासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. परंतु याच्या अनुषंगाने सुध्दा मला दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. ज्यावेळेला शहरांमध्ये नवीन भागांचा समावेश होतो,

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण ....

त्यावेळेला त्याचा डेव्हलपमेंट प्लॅन करावा लागतो. एम.आर.टी.पी.ॲक्टच्या अंतर्गत ज्यावेळेला डेव्हलपमेंट प्लॅनला खूप उशीर लागतो त्यावेळेला इललिगल कन्स्ट्रक्शन्स व्हायला लागतात त्यावेळेला त्या डेव्हलपमेंट प्लॅनला काहीही अर्थ रहात नाही. परत पुण्याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर पुण्याचा डेव्हलपमेंट प्लॅन पास होऊन गेल्या पाच वर्षापासून राज्य शासनाकडे तो पेंन्डिग आहे. म्हणून डेव्हलपमेंट प्लॅन लवकर पास होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी वित्त विभागाची बाब क्रमांक 37 पान क्रमांक 33 बाबत बोलू इच्छिते. यामध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र शासनाच्या वतीने न्यायालयात रुपये 6,28,563/- एवढी रक्कम जमा करण्यामुळे झाला आहे. म्हणून, हा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी रुपये 4,29,000/- चे पूरक विनियोजन विधानमंडळाला सादर केले आहे.". या प्रस्तावातून काही बोध होत नाही. हे कॉम्पेन्शेशन आहे की ही कॉस्ट आहे हे कळत नाही. कॉम्पेन्सेशन असेल तर शासन हे कशासाठी देत आहे? शासनाची अशी काय चूक झाली की, हे कॉम्पेन्सेशन शासनाला द्यावे लागणार आहे. याला जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई होणार आहे काय? यासंदर्भात खुलासा करण्यात आला तर तो निश्चित स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, यानंतर मी अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची बाब क्रमांक 80 पान क्रमांक 69. बाबत बोलू इच्छिते. या बाबीमध्ये राष्ट्रीय व जागतिग ग्राहक हक्क दिन साजरा करण्यासाठी रुपये 48,82,000/- भारत सरकारने उपलब्ध करुन दिले होते. या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, ग्राहक संरक्षण व ग्राहकांच्या हक्का विषयकी जागरुकता निर्माण करणे हे अत्यंत महत्वाचे आहे, हे वर्षभर केले गेले पाहिजे ते एक वर्ष करुन चालणार नाही. या अनुषंगाने शहरात जे होर्डिंग्स लावलेले असतात त्या होर्डिंग्सवर कायदा करुन किंवा त्यासंबंधात सर्क्युलर काढून एका छोटयाशा कॉर्नवर प्रत्येक शहरातील सिव्हिक्स मेसेज किंवा या पध्दतीच्या हक्काचे मेसेजेस असतील ते त्या ठिकाणी लिहिणे किंवा वेगवेगळया पध्दतीने जाहिराती देणे हे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे. नाही तर कायदा होतो आणि तो कायदा अंमलात आणण्यासाठी लोकच पुढे आले नाहीत तर त्याचा काही उपयोग नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण ....

सभापती महोदय, मला शेवटची बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे. पान क्रमांक 121 बाब क्रमांक 127. महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत तरतुदीच्या संदर्भात ही बाब आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याठिकाणी म्हटले होते त्याप्रमाणे जेन्डर बजेट हे अत्यंत महत्वाचे आहे. सगळया स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातूनसुध्दा ते करायला पाहिजे या पध्दतीचा सगळीकडे विचार आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये सुध्दा जेन्डर बजेटखाली काही तरतुदी होत्या पण यंदाच्या वर्षी त्या वापरल्याच गेल्या नाहीत. माननीय सभापती महोदय, मला याबाबतीत याठिक्राणी आवर्जून सांगावयाचे आहे की, या बाबतीत राज्य शासनाने सर्क्युलर काढावे. जेन्डर बजेट म्हणजे नेमके काय? जेन्डर बजेटखालीच तरतुदी आल्या पाहिजेत असे नाही. पण महिलांच्या अनुषंगाने डायरेक्टली किंवा इनडायरेक्टली एखादी तरतूद असेल तर ती सुध्दा जेन्डर बजेट होते. तेव्हा ती नेमकी कशी होते, यासंबंधीचे रिपोर्टिंग झाले पाहिजे. सभापती महोदय, या बाबतीत काही व्यवस्थित प्रोफार्मा डेव्हलप करणे हे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, वर्ष 2009-10 के लिए पेश की गई पूरक मागणी के ऊपर मैं अपने विचार आपके सामने रखना चाहता हूँ. पेज नं. 4 पर बाब क्रमांक 1 के अन्तर्गत कुछ राष्ट्रीय महानुभावों के स्मारक बनाने का प्रावधान किया गया है. श्री. नाशिकराव तिरपुडे नागपुर और विदर्भ के बहुत ही वरिष्ठ नेता रहे हैं. मेरी सरकार से मांग है कि इसमें उनका समावेश किया जाए.

सभापति महोदय, पेज क्रमांक 83 पर बाब क्रमांक 98 और 99 गृह निर्माण विभाग के बारे में है. नागपुर में 3-4 टेक्सटाइल मिल बंद हो गई है. इन सूत गिरणी के कामगार पिछले कई सालों से शासन से मांग कर रहे हैं कि जिस तरह से मुंबई के गिरणी कामगारों के लिए म्हाडा के अन्तर्गत विशेष बाब के रुप में सुविधा दी गई है, वैसी ही सुविधा का प्रावधान नागपुर की एम्प्रेस मिल और सूत गिरणी के कामगारों के लिए किया जाए. ऐसी मैं सरकार से मांग करता हूँ.

सभापति महोदय, पेज क्रमांक 57 पर बाब क्रमांक 61 श्रम मंत्रालय के बारे में है. सरकार में सब से उपेक्षित विभाग श्रम मंत्रालय है. मैं आपके माध्यम से महाराष्ट्र सरकार का ध्यान खींचना चाहता हूँ कि सरकार ने पिछले कई सालों से श्रम मंत्रालय पर बहुत ही कम ध्यान दिया है. मंत्रालय में मॅन पावर नहीं है, अधिकारी नहीं है. नागपुर में सरकार ने बहुत प्रयत्नों के बाद एडीशनल लेबर कमिश्नर का स्टेटस दिया है, लेकिन आज तक हमको पूरे समय का एडीशनल लेबर कमिश्नर नहीं मिला है. महाराष्ट्र सरकार ने बहुत सारे प्रोग्रेसिव कानून बनाए हैं, माथाडी कामगारों के लिए कानून बनाया, निजी सुरक्षा गार्डों के लिए कानून बनाया और अभी पिछले वर्ष ही घरेलू मोलकरिन के बारे में कानून बनाया है. बिल्डिंग कन्सट्रक्शन में काम करने वाले 10 लाख से ज्यादा कामगारों के लिए केन्द्रीय सरकार ने कानून बनाया है, लेकिन इस पर अमल देरी से शुरु हुआ. इन कानूनों पर अमल करने के लिए श्रम मंत्रालय के पास कोई मशीनरी नहीं है, कोई व्यवस्था नहीं है, साधन नहीं है और इस प्रकार से जिन मजदूरों के लिए हम कल्याणकारी कानून बनाते हैं, उनको वर्षों तक लाभ नहीं मिलता है.

सभापति महोदय, महाराष्ट्र में हमने माथाडी कामगारों के लिए कानून बनाया है, निजी सुरक्षा रक्षकों के लिए कानून बनाया है, घरेलू मोलकरिन के लिए कानून बनाया है, लेकिन आज लाखों की संख्या में कॉल सेन्टर्स में पढ़े लिखे कामगार काम कर रहे हैं और इन कामगारों में लड़कियों की संख्या अधिक है. आई.टी. सेक्टर में बहुत बड़े बड़े नाम वाले लोग इनसे काम

. . . WW 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

करवा रहे हैं. आउटसोर्सिंग के नाम पर कॉन्ट्रॅक्ट लेबर के रुप में काम करने की वजह से इनके ऊपर कोई भी श्रम कानून लागू नहीं होता है. जब ये लोग संगठन बनाने की बात करते हैं तो तुरन्त नौकरी से निकाल देते हैं. महाराष्ट्र में पुणे, मुंबई, नागपुर और नाशिक जैसे शहरों में आई.टी. सेक्टर में लाखों की संख्या में ये लोग काम कर रहे हैं, लेकिन इनको श्रम कानून का संरक्षण नहीं है और उनको संगठन बनाने का अधिकार नहीं है. दुख की बात यह है कि हमारा श्रम मंत्रालय इनके बारे में कोई विचार नहीं कर रहा है. अगर ये लोग संगठन बनाने की कोशिश करते हैं तो नौकरी से हटा दिया जाता है. आई.टी. सेक्टर में डिग्री और डिप्लोमा लिए हुए लाखों लोग काम कर रहे हैं और इनको कोई संरक्षण नहीं है. महाराष्ट्र सरकार ने कामगारों की भलाई के लिए कई कानून बनाए हैं, इसलिए मेरी सरकार से गुजारिश है कि इन लोगों को संरक्षण देने के लिए कानून बनाया जाए.

सभापति महोदय, नागपुर में इन्डस्ट्रियल कोर्ट और लेबर कोर्ट में बहुत सारी वेकेन्सी हैं. इन्डस्ट्रियल कोर्ट में प्रिसाइडिंग ऑफिसर नहीं है. 10 साल या 20 साल पहले अगर कोई कामगार डिसमिस हो गया है तो उसका प्रकरण अभी भी चल रहा है, उसके लिए कोर्ट में कोई जज नहीं है, कोई प्रिसाइडिंग ऑफिसर नहीं है. मैं आपके माध्यम से सरकार से अनुरोध करना चाहता हूँ कि इनके लिए फास्ट ट्रॅक कोर्ट बनाए जाएं. जिन कामगारों का समरी डिसमिसल होता है तो ऐसे इन्डस्ट्रियल कोर्ट या लेबर कोर्ट के सारे मामले फास्ट ट्रॅक कोर्ट में लिए जाएं. इससे जिन कामगारों की गलती नहीं है, उनको न्याय मिल सकेगा. आज 10-20 साल से ऐसे मामले कोर्ट में पेंडिंग है, इसलिए मैं सरकार का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ कि इस बारे में ध्यान दिया जाए. श्रम विभाग, इन्डस्ट्रियल कोर्ट और लेबर कोर्ट में भर्ती की जाए, नए अधिकारी और जज अपाइंट किए जाएं. एम.बी.ए. पास किए हुए नए लोगों को श्रम विभाग में अपाइंट कर सकते हैं. जब आप प्रमोशन देकर नागपुर में एडीशनल कमिश्नर बनाते हैं तो कोई नागपुर जाना नहीं चाहता.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

14:45

एस.क्यू. जमा....

सभापति महोदय, बाब क्रमांक 76 व पृष्ठ क्रमांक 68 - अन्न व नागरी पुरवठा विभाग के तहत मैं यह कहना चाहता हूं कि जनता महंगाई से बहुत त्रस्त हो गई है. अनाज की जमाखोरी की वजह से भी महंगाई बढ़ रही है. आज हर आदमी महंगाई से प्रभावित है. यह प्रावधान किया गया था कि प्रत्येक विधान सभा क्षेत्र में दक्षता समिति बनाई जाएगी. अफसोस की बात है कि महंगाई बढ़ रही है, जमाखोरी बढ़ रही है लेकिन फिर भी दक्षता समिति नहीं बनी है. दक्षता समिति महंगाई पर चेक कर सकती है, जमाखोरी के बारे में दक्ष रह सकती है. इसलिए मेरा अनुरोध है कि जल्द से जल्द दक्षता समिति बनाई जाए ताकि महंगाई को रोकने के लिए कदम उठा सके, उस ओर ध्यान दिया जा सके.

सभापति महोदय, बाब क्रमांक 36,37 व पृष्ठ क्रमांक 33 - वित्त विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहता हूं और जिस बात से हम सब प्रभावित है. वह यह है कि आनलाईन बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम है लेकिन यह आनलाईन बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम, आनलाईन बजट डिले सिस्टम हो गई है. क्योंकि कोई भी काम हो, वह काम एक दो साल होता ही नहीं है. दूसरी बात यह है कि हमारी विधान सभा एवम् विधान परिषद की कुल सदस्य संख्या करीब 367 है. इन सम्माननीय सदस्यों को पगार लेने के लिए आधा किलो कागज पर दस्तखत करनी पड़ती है. 21 जगह पर दस्तखत करनी पड़ती है. इसलिए मेरा अनुरोध है कि इस सिस्टम को सरल किया जाए. इस सिस्टम को सरल करने के लिए आनलाईन करना जरुरी है. अत: इस सिस्टम को आनलाईन करने के बारे में विचार किया जाए. क्योंकि यह सिस्टम आऊटडेटेड हो चुकी है. इसलिए इस सिस्टम को आधुनिक करने की जरुरत है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 91,92, तथा 93 व पृष्ठ क्रमांक 82 - नियोजन विभाग के तहत मैं जो कहना चाहता हूँ उसके बारे में मेरे पास कागजात है, सुबूत है. मैं दो साल से नियोजन विभाग को पत्र लिख रहा हूं. आमदार फंड से पैसा देने के लिए कामों की जो सूची बनाई गई है, उसको रिवाईज करने के लिए मैंने नियोजन विभाग के प्रधान सचिव को पत्र लिखे हैं. यह विषय 2008 से विचाराधीन है. किसी कैंसर से पीड़ित व्यक्ति को मदद करना चाहते हैं तो विभाग कहता है कि यह निजी कार्य है, यह नियम में नहीं बैठता है. किसी स्कूल को मदद नहीं कर सकते हैं. जो नये स्कूल खुल रहे हैं, उनको हम मदद नहीं कर सक रहे हैं. इसलिए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामों की लीस्ट को रिवाईज करना बेहद जरुरी है. हमने रिवाईज लीस्ट दी है लेकिन वह लंबित है. सरकार से मेरा अनुरोध है कि आमदारों से सलाह-मशविरा करके लीस्ट को रिवाईज किया जाए. क्योंकि हम अच्छे कामों के लिए आमदार निधि से पैसा नहीं दे पा रहे हैं. सरकार इस विषय में ध्यान दें, ऐसी मेरी विनती है.

सभापति महोदय, मेरा आखरी मुद्दा यह है कि, अल्पसंख्यकों के विकास के लिए बजट में हेड वाईज अलोकेशन किया जाए. प्रधानमंत्री के 20 सूत्रीय कार्यक्रम के अन्तर्गत इस बात का समावेश है कि अल्पसंख्यकों के विकास के लिए हेड वाईज बजटरी अलोकेशन होगा. 26.10.2006 को आदेश भी निकाला गया है, जिसमें यह कहा गया है कि जो वार्षिक बजट बनेगा उसमें हेड वाईज बजट अलोकेशन होना चाहिए. लेकिन इस प्रकार का आदेश होने के बावजूद अल्पसंख्याक विकास विभाग के लिए कभी 150 करोड़ रुपये का प्रावधान कर दिया जाता है, कभी किसी साल 200 करोड़ का प्रावधान कर दिया जाता है. यह धन राशि काफी नहीं होती है. इसलिए मेरा नियोजन विभाग के माननीय मंत्री एवम् माननीय मुख्यमंत्री जी से अनुरोध है कि अल्पसंख्याक के विकास के लिए हेड वाईज बजटरी अलोकेशन किया जाए ताकि उनके विकास के लिए बेहतर काम किए जा सके. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

....

यानंतर श्री रामदास कदम यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना सकाळच्या सत्रामध्ये माझे अपूर्ण राहिलेले भाषण मी पुढे सुरु करीत आहे. मी महत्वाचे एक-दोन मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे.

महिला व बालविकास विभागाच्या पान क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 127 संबंधी बोलत असताना मी सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुभाष झनक यांच्या काही गंभीर गोष्टी निदर्शनास आणून देत आहे. बालक आश्रम घोटाळा मी या अगोदरही बाहेर काढला होता. त्या घोटाळयाचे पुढे काय झाले, कोणती कारवाई करण्यात आली, हे मात्र समजलेले नाही. राज्यामध्ये बालकांसाठी 765 आश्रमशाळा देण्यात आल्या. प्रत्यक्षात तपासणी केली त्यावेळी मोठया संख्येने आश्रमशाळा फक्त कागदावरच होत्या. त्या आश्रमशाळांना नियमबाह्य आणि बेकायदेशीरपणे मान्यता दिली होती. यासंबंधी आयुक्तांनी तपासणी केली होती आणि त्या तपासणीचा अहवाल माझ्याकडे आहे. सभापती महोदय, बेकायदेशीरपणे आश्रमशाळांना मंजुरी दिली एवढेच नाही तर एका तालुक्यामध्ये फक्त एकच बालक आश्रमशाळा असावयास पाहिजे असा नियम असताना एकेका तालुक्यामध्ये पाच-पाच आश्रमशाळा दिलेल्या आहेत. त्याच्याही पुढे जाऊन एवढा गंभीर प्रकार केलेला आहे की, प्रत्यक्षात ज्या आश्रमशाळा उभ्या राहिलेल्या नाहीत, ज्या फक्त कागदावरच आहेत अशा आश्रमशाळांना 2 कोटी रुपय अनुदान दिलेले आहे. पुढा-यांच्या संस्थांना दोन कोटी रु. अनुदान दिलेले आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी समिती नेमली होती. त्या चौकशी समितीचे पुढे काय झाले ? या प्रकरणी विधानसभेमध्ये उत्तर देताना सांगितले होते की, हे 2 कोटी ताबडतोबीने वसूल करण्यात येतील. तेव्हा हे 2 कोटी रुपये संबंधितांकडून वसूल केलेले आहेत काय ? तसेच नियमाप्रमाणे एका तालुक्यामध्ये एक बालक आश्रमशाळा ठेवून बाकीच्या बालक आश्रमशाळा रद्द केलेल्या आहेत काय? ज्या तालुक्यातून नियमाप्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत, जे प्रस्ताव पुणे येथे छाननी करुन आलेले आहेत, त्या प्रस्तावाना तुम्ही मंजुरी देत नाही . ती मंजुरी मिळण्यासाठी काय करायला पाहिजे? टेबलाखालून काही द्यावयास पाहिजे काय ? कोकणातील एकही प्रस्ताव मंजूर केलेला नाही. फक्त कागदावर असलेल्या बालक आश्रमशाळासाठी आपण अनुदान दिले. हे शासनाच्या घरचे पैसे नाहीत. महाराष्ट्राच्या जनतेच्या घामाचे पैसे आहेत. जिसकी लाठी, उसकी भैंस.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम....)

सभापती महोदय, कोकणातून किती प्रस्ताव आले ? ते प्रस्ताव का प्रलंबित ठेवले ? एकेका तालुक्यामध्ये दिलेल्या 5-5 बालक आश्रमशाळा नियमाप्रमाणे का रद्द करण्यात येत नाहीत, बेकायदेशीरपणे दिलेल्या अनुदानाची वसुली का करण्यात येत नाही ? या सर्व मुद्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. कोणकोणत्या शाळांना अनुदान दिले त्याची यादी माझ्याकडे आहे. माहितीच्या अधिकारामध्ये मी सर्व माहिती घेतलेली आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुभाष झनक यांच्याकडून कोकणातील संस्थांना न्याय मिळेल अशी मला आशा आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पान क्रमांक 57 वरील बाब क्रमांक 61 बाबत बोलत असताना विजेच्या संदर्भातील आणखी एक महाघोटाळा आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कोळसा खरेदीमध्ये 240 कोटीचा घोटाळा झालेला आहे.

...नंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, ऊर्जा विभागातील या प्रकरणासंबंधी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन चौकशी करावयाची विनंती केली होती. या चौकशीचे काय झाले याची मला कल्पना नाही. परंतु मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये या प्रकरणासंबंधीचा खुलासा केला पाहिजे. अदानी कंपनी ऊर्जा क्षेत्रात कार्यरत आहे. शासनाला 20 लाख टन कोळसा खरेदी करावयाचा होता. दिनांक 11.2.2009 रोजी या कोळसा खरेदीचे टेंडर निघाले. कोणत्याही इतर कंपनीला या निविदेमध्ये सहभागी करुन घेतले नाही. अदानी कंपनीने प्रती टन 6708 रुपये या दराने 20 लाख टन कोळशाचा पुरवठा केला. लगेच पुढे तीन महिन्यांनी म्हणजे दिनांक 2.5.2009 रोजी पुन्हा 4.5 लाख टन कोळसा खरेदीच्या निविदा निघाल्या. त्यावेळी पुन्हा या अदानी कंपनीने सहभाग घेतला आणि तीन महिन्यानंतर पुन्हा कोळसा खरेदीच्या निविदा निघाल्या त्यावेळी नियमानुसार सहा कंपन्यांनी निविदेमध्ये सहभाग घेतल्यामुळे प्रती टन 5738 रुपये भाव देण्यात आला. 20 लाख टन कोळशाची खरेदी प्रती टन 6708 रुपयांनी करण्यात आली आणि तीन महिन्यानंतर 4.5 लाख टन कोळशाची खरेदी स्पर्धात्मक झाल्यामुळे 5738 रुपये प्रती टन या दराने झाली. या कोळसा खरेदीमध्ये नेट 240 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. महाराष्ट्र शासन कर्जबाजारी झालेले आहे. का होणार नाही? विजेचे भाव वाढत आहेत. का वाढणार नाहीत? या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणार आहात की नाही? हा अदानी कोण आहे? सरकारचा जावई आहे का? कोण आहे हा? शासनाचे 240 कोटी रुपये नुकसान कोणी केले? शासनाचा महसूल कोणी बुडविला? यामध्ये नेमके काय घडले आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. मी पुढे जाऊन हेही सांगू इच्छितो की, अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडच्या राजेश अदानीला अलिकडेच केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग आणि भ्रष्टाचार विरोधी पथकाच्या गोवा शाखेने अधिकाऱ्यांच्या संगनमताने षडयंत्र रचल्याबाबत आणि सरकारी तिजोरीचे करोडो रुपयांचे नुकसान केल्याबाबत अटक केली होती. केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने भ्रष्टाचार विरोधी अधिनियम आणि भारतीय दंड विधान कलम 120 (ब), 288, 420, 13(1), 13(2) अन्वये शुल्क चुकविल्याबद्दल अटक केली होती. याला तुम्ही जेलमध्ये टाकणार आहात की नाही?

सभापती महोदय, माझ्याकडे आणखी भयानक प्रकरणांची माहिती आहे. मी सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी मिळेल त्यावेळी उघड करणार आहे. नेमके या राज्यामध्ये काय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

चालले आहे? कुंपणच शेत खात आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने उत्तराच्या भाषणामध्ये शासनाकडून सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. सभापती महोदय, माझ्याकडे शासनाच्या अनेक घोटाळ्यांची माहिती उपलब्ध आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, हे आता थांबवा. केवळ एकच कलमी कार्यक्रम सुरु आहे. "आपण दोघे भाऊ भाऊ, दोघांनी मिळून वाटून खाऊ" हा एकमेव कार्यक्रम सुरु आहे. मी सकाळी सहकार विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडला. ऊर्जा क्षेत्रातील कोळसा खरेदीत झालेल्या भ्रष्टाचाराला कोण जबाबदार आहे? सभापती महोदय, या पुरवणी मागण्या मान्य करण्यास कोणतीही अडचण नाही. शासन पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी खर्च करणार आहे. परंतु हा निधी कोणासाठी घेत आहात? मी या सगळ्या गोष्टींचा धिक्कार करतो आणि निषेध करतो. सरकारकडून उत्तराच्या भाषणात मी मांडलेल्या मुद्यांबाबत माहिती मिळेल अशी अपेक्षा बाळगतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलताना प्रामुख्याने बाब क्र.65, पान क्र. 61 च्या संदर्भात असे सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी वीज निर्मितीमधील भ्रष्टाचार सभागृहात उघडकीस आणला. त्याच विभागाने या पुरवणी मागणीच्या माध्यमातून 200 कोटीची तरतूद अधिक दराने वीज खरेदीसाठी केलेली आहे. दुसऱ्या बाजूला कॅगने जो ठपका ठेवला तो ऑलरेडी 600 कोटीचा फटका बसला असताना पुन्हा वाढीव दराने वीज खरेदी करण्यासाठी 200 कोटीची मागणी केली आहे त्यालाच माझा विरोध आहे.

महोदय, पृ.क्र.5, बाब क्र. 4 व 5 च्या अनुषंगाने वेगवेगळ्या प्रतिष्ठित पुरुषांची स्मारकांसाठी ही तरतूद केली आहे. प्रामुख्याने शिवाजी महाराज ज्यावेळेस पन्हाळगडावरुन विशाळगडाकडे गेले त्यावेळेस पावनखिंडीत घनघोर युध्द करुन बाजी प्रभू देशपांडे यांनी छातीचा कोट करुन विशाळगडापर्यंत पोहचण्यास मदत केली. त्या पावनखिंडीत बाजी प्रभूंचे जे स्मारक आहे त्याची अवस्था दयनीय आहे. म्हणून या स्मारकाला उर्जितावस्था आणावी आणून त्याची देखभाल करण्यासाठी देखील तरतूद करण्याची गाज आहे.

त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या मागोमागा आता बेरोजगारांच्या आत्महत्त्या देखील सुरु होतील अशी शंका वाटते. शासन अशा आत्महत्त्या होण्याची वाट पाहते की काय असे वाटायला लागले. म्हणून ज्या हातांना रोजगार शासन देणार होते त्यांना बेरोजगार भत्ता देण्याचा विचार करावा. तसेच स्वयंरोजगाराच्या बाबतीत सुध्दा सभागृहात वारंवार मांडणी करण्यात आली. प्रमुख्याने ग्रामीण तरुणांना कोणत्याही प्रकारची व्यावसायिक पार्श्वभूमी नसल्याने त्यांना कमी व्याजदराने स्वत:चे उद्योग सुरु करण्यासाठी कर्ज मिळाले पाहिजे. तसेच "डी" झोनमध्ये जी सवलत असते ती म्हणजे 12 वर्षे व्हॅट कलेक्ट करुन वापरण्याची जशी परवानगी असते अशी तरतूद या ग्रामीण भागातील तरुणांना दिली तर सुरुवातीलाच असा व्यवसाय सुरु करण्याचे बळ त्यांना मिळेल. अशा प्रकारच्या चांगल्या योजना स्वयंरोजगाराच्या बाबतीत आणल्याशिवाय स्वयंरोजगार राज्यात सुरु होणार नाहीत परिणामी शहरात येणारे लोंढेही कमी होणार नाहीत.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

यानंतर पशुसंवर्धनच्या संदर्भात पृ.क्र. 21, बाब क्र. 23, वैरणीचे बियाणे वाटप करण्यासाठी वाढीव तरतूद या माध्यमातून करण्यात आली आहे. राज्यात दुष्काळी वर्ष सुरु असताना आतापासूनच जनावरांसाठी छावण्यांचा विचार केला पाहिजे अन्यथा निधीची व्यवस्था न झाल्याने जनावरे मृत्युमुखी पडतील, अशी वेळ येऊ नये म्हणून दुष्काळी भागातील जनावरांसाठी छावण्यांची अगोदरच व्यवस्था करावी.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले तसेच माननीय श्री. सय्यद जमा यांनी सकाळी जो मुद्दा उपस्थित केला तो विचार करण्यासारखा आहे. त्यांनी सांगितले की, गेल्या आर्थिक वर्षात विधानसभेचे आमदार चार महिन्यांनी निवृत्त होणार होते तरी देखील त्यांना 1 कोटीचा निधी प्रत्येकी देण्यात आला. त्यानंतर नव्याने आलेल्या आमदारांना देखील 25 लाखाचा निधी मिळाला व त्यासाठीच 92 कोटीची ही तरतूद आहे. या अनुषंगाने माझी अशी विनंती आहे की, 6 जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र विधानपरिषदेच्या आमदाराला असते. एका बाजूला 15 आमदारांना 15 कोटीचे वाटप निवडणुका डोळयासमोर ठेवून करण्यात आले आणि 5-7 जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असणाऱ्या, 58 तालुके आणि 5500 गावांचे क्षेत्र असलेल्या विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक आमदारांना हा निधी वाढवून देण्याबाबत विचार करावा अशी माझी देखील विनंती आहे.

यानंतर बाब क्र.79 व 80, पृ.क्र. 69 - अन्न व नागरी पुरवठ्याच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, बीपीएलसाठी जो धान्याचा साठा येतो तो अपुरा येत असल्याने पुरेसा धान्यपुरवठा करु शकत नाहीत. त्याचप्रमाणे दुकानदार सुध्दा एकाच वेळेस संपूर्ण साठा उचलत नसल्याने गरजू लोकांना पुरेसा धान्याचा पुरवठा होत नाही. दुकानदार पैसे कमी असतात म्हणून कमी साठा उचलतात आणि नंतरचा साठा ते उचलल्याचे दाखवून लोकांना प्रत्यक्षात कमीच साठा मिळतो. म्हणून टप्प्याटप्प्याने साठा उचलणाऱ्या तसेच क्षमता नसलेल्या दुकानदारांचे लायसन्स काढून घ्यावीत, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 126, पृष्ठ क्रमांक 121 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. जे वृध्द आहेत व ज्या वृध्दांनी दारिद्रय रेषेच्या कार्डची मागणी केलेली आहे अशा वृध्दांना दारिद्रय रेषेचे कार्ड उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 133, पृष्ठ क्रमांक 127, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संदर्भात मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना बंद पडेल आणि पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी खाजगी संस्थेकडे दिली जाणार आहे असे विचार आज व्यक्त होत आहेत. खाजगी लोकांकडे जर पाण्याचे वितरण झाले तर पाण्याची किंमत किती होईल, पाण्याचे किती दुर्भिक्ष्य निर्माण होईल याचा शासनाने विचार केलेला आहे काय? त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बरखास्त करुन नये तसेच पाण्याचे वितरण खाजगी लोकांना देण्याबाबत जे विचार व्यक्त होत आहेत त्याला माझा विरोध आहे.

पुरवणी मागण्यावर मला बोलण्याची आपण संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 49 वरील मोठे व मध्यम पाटबंधारे यासंदर्भात मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. जलसिंचनाचे काम संपूर्ण महाराष्ट्रभर मोठया प्रमाणात घेतले जात आहे. आपल्या जलसिंचनाची तुलना देशातील इतर राज्यांबरोबर केली तर ती अतिशय कमी आहे. महाराष्ट्रात जलसिंचनाचे प्रमाण 16 टक्के असून देशातील इतर राज्याचे जलसिंचनाचे प्रमाण साधारणत: 90 ते 98 टक्के एवढे आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, जलसिंचनाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाशी पाठपुरावा करुन आपल्या राज्याचे सिंचन इतर राज्यांच्या प्रमाणात कशा प्रकारे वाढेल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे प्रयत्न करीत असतांना तालुका घटक मानून त्या प्रमाणे कार्यक्रम शासनाने राबवण्याची आवश्यकता आहे. आपल्या राज्यात 221 दुष्काळी तालुके आहेत. 221 दुष्काळी तालुक्यांपैकी काही तालुके तर कायमस्वरुपी दुष्काळी आहेत. संपूर्ण राज्यात दुष्काळ पडला तर ज्या प्रमाणे नियोजन केले जाते त्याच प्रकारचे नियोजन जे तालुके कायमस्वरुपी दुष्काळी आहेत त्यांच्या बाबतीत करण्याची आवश्यकता आहे. दुष्काळी तालुक्यांचा विकास करीत असतांना मागील अधिवेशनात सर्व दुष्काळी तालुक्यातील आमदार एकत्र आले होते त्यावेळी शासनाने दुष्काळी तालुक्यांसाठी दुष्काळी विकास महामंडळ काढले जाईल असे सांगितले होते परंतु अजूनपर्यंत या महामंडळाचे काय झाले त्याची माहिती आम्हा लोक प्रतिनिधींना मिळू शकेलेली नाही.

सभापती महोदय, शासनातर्फे शेत तळयांचा कार्यक्रम घेतला जातो. परंतु के.टी.वेअरसारखे छोटे छोटे बंधारे बांधले तर पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघू शकतो. त्यामुळे यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी माझी कळकळीची मागणी आहे.

सभापती महोदय, ताकारी म्हैसाळ आणि टेंभू या चांगल्या योजना आहेत. या योजनांना शासनाने अधिक निधी देण्याची आवश्यकता आहे. मान, खटाव, कवठेमहांकाळ, जत या योजनेतूनही पाणी पुरवठा होऊ शकतो त्यामुळे या योजनांना सुध्दा अधिक निधी देण्याची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

आवश्यकता आहे. या योजनांना अधिक निधी उपलब्ध करुन दिला तर लवकरात लवकर या योजनांची कामे पूर्ण होऊ शकतील. म्हैसाळ योजना तर ब-याच अंशी पूर्ण झाली आहे. परंतु या ठिक्राणावरुन जो पाणी पुरवठा केला जातो त्या विद्युत पंपाचे वीज बील न भरल्यामुळे मध्यंतरी ही योजना बंद पडली होती. विजेचे बिल न भरल्यामुळे या ठिकाणावरुन पाणी सोडले जात नाही.

सभापती महोदय, मिरज-कवठेमहांकाळ या ठिक्राणच्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात माननीय आर.आर.पाटील साहेबांनी पुढाकार घेतला होता परंतु पाणी पुरवठाही सुरु झाला होता परंतु नंतर सुध्दा वीज बील भरले नाही नसल्यामुळे या पंपाचा विद्युत पुरवठा बद करण्यात आलेला आहे. त्यामुळे या सर्व योजना शासनाने त्वरित सुरु कराव्यात अशी मी शासनास विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 21, पशू संवर्धनाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या राज्यातील ज्या शेळयांच्या जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्या जगल्या पाहिजेत यासाठी शासनाने निधी सुध्दा उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे शासनाने बेरारी या जातीच्या शेळयांप्रमाणेच कोकण कन्याळ या शेळीच्या जातीच्या संदर्भात सुध्दा काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कोकण कन्याळ नावाची शेळीची जात फार चांगली आहे. तसेच शेळयांबरोबर मेंढयांचे सुध्दा चांगल्या प्रकारे संवर्धन झाले पाहिजे. माडग्याळ जातीची मेंढी ही खूप चांगली आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

त्या मेंढीचे वजन रोज पाव किलो वाढत असते.अशा प्रकारे ही मेंढी मासासाठी अतिशय उपयुक्त आहे.

श्री.भाई जगताप : आम्हाला देखील अनेक शेळी मेंढीच्या जाती माहीत नाहीत परंतु सन्माननीय सदस्य त्यासंबंधी अतिशय उपयुक्त अशी माहिती देत असल्यामुळे शासनाला व इतरांना त्याचा फायदा होऊ शकेल. तेव्हा आमच्या ज्ञानात भर टाकल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांचा आभारी आहे.

श्री.रमेश शेंडगे : त्याबद्दल मी आपणासही धन्यवाद देतो. आपण ज्या चवीने शेळी मेंढीचे मटन खात आहात तेवढयाच समाधानाने तो उल्लेख या ठिकाणी केल्याबद्दल मला सुध्दा आनंद वाटला आहे.या सभागृहात ज्या ज्या वेळी शेळी मेढीचा विषय चर्चेसाठी येत असतो त्यावेळी हसण्यावारी नेण्यापुरतीच ही चर्चा होत असते.परंतु जे फक्त शेळी मेंढीचे मटन खातात जे फक्त शेळी मेंढीच्या मटनावर अवलंबून असतात त्यांना मी हे सांगू इच्छितो की आपल्याला आठवडयातून दोन तीन वेळा शेळी मेंढीचे मटन खाल्याशिवाय चैन पडणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री रमेश शेंडगे यांनी आम्हाला चांगली माहिती दिली आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय,शेळी मेंढीचा व्यवसाय करणारा जो वर्ग या राज्यामध्ये आहे त्याच्याकडे तेवढया प्रेमाने, आपुलकीने, आदबीने लक्ष् देणे अधिक महत्वाचे आहे. पशुसंवर्धन विभागाकडून या व्यवसायाकडे दुर्लक्ष केले जाते. मागच्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय पशुसंवर्ध्न मंत्री श्री. राऊत यांनी भाषण करतांना असे सागितले की, या राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाला राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी दिला जात नाही. या व्यवसायाच्या विकासाकरिता कोणतीही योजना राबविली जात नाही त्याकरता स्वत: माननीय मत्री महोदयांनी खेद व्यक्त केला होता. अशा प्रकारे स्वत:मंत्री महोदयांवर खेद व्यक्त करण्याची वेळ येते तेव्हा मला मुद्दाम सूचित करावेसे वाटते की, या मुद्याकडे सभागृहाने लक्ष द्यावे शेळी मेंढीचा व्यवसाय करणारे लोक दस-याला शेळया मेंढया घेऊन भटकंतीस सुरुवात करतात आणि मे महिन्या पर्यत ते भटकत असतात. अशा प्रकारे वर्षातील जवळजवळ आठ महिने मुलाबाळाना घेऊन ते भटकत असतात. त्यावेळी त्यांच्याकडे एक घोडा असतो त्या घोडयावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रमेश शेडगे .

कोंबडया असतात, कुत्र्याचे पिल्लु असते, मेंढीचे पिल्लु असते तसेच लहान मूल देखील असते अशा प्रकारे आठ महिने हे कुटुंब निरनिराळया ठिकाणी भटकंती करीत असते . उदरनिर्वाहासाठी भटकंती करणा-या या वर्गासाठी शासनाने कोणते नियोजन केलेले आहे त्यांच्याकरिता काय तरतूद करण्यात आली आहे, त्यांच्यासाठी कोणंती योजना तयार करण्यात आली आहे या संदर्भात आम्ही सातत्याने पाठपुरावा केला होता .उस्मानिया या शेळीच्या जातीच्या विकासासाठी पाच कोटी रुपये मिळावेत यासाठी आम्ही पाठपुरावा केला होता परतु त्यापैकी फक्त 2 कोटी 31 लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. त्याबाबतीत कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आला होता परंतु राज्य शासनात काम करणा-या काही अधिका-यांनी अजून पर्यत 2 कोटी 31 लाख रुपये प्रत्यक्षात दिले नाहीत . माननीय केन्द्रीय कृषी मंत्री आदारणीय श्री शरद पवार यांच्याकडे विनंती केल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत 5 कोटी रुपये मंजूर केले होते ते पैसे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले होते परंतु महाराष्ट्रातील अधिका-यांना ती योजना पसंत पडत नाही म्हणून त्यातील एक रुपया सुध्दा वापरु शकत नाही. या महामंडळाकडे किंवा या व्यवसायाकडे दुर्लक्ष केले जात आहे तेव्हा हा व्यवसाय करणा-या धनगर समाजाला जास्तीत जास्त सवलती कशा देता येतील यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी प्रयत्न करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 27 बाब क्रमांक 22 संबंधी बोलावयाचे आहे. मच्छिमारासाठी अपघात गट विमा लागू करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे.त्यासंबंधी मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर राज्यातील मेंढपाळाचा व्यवसाय करणा-यांना देखील अशा प्रकारची अपघात गट विमा योजना लागू करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बाब क्रमाक 122 पान नंबर 117 सबंधी मला बोलावयाचे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य प्रकाशित करण्याकरिता ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.फुले, आंबेडकर, शाहू यांच्या विचाराने काम करणा-या या राज्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,महात्मा फुले ,राजर्षी शाहू आणि अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रमेश शेडगे .

निधीची तरतूद करण्यात आली आहे त्याचप्रमाणे या देशात काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत स्वत:च्या कार्याचा ठास उमटविणा-या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या महाराष्ट्राच्या कन्या होत्या त्यांचे देखील साहित्य प्रकाशित करण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे

नंतर श्री.सरफरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

सभापती महोदय, या महामंडळाच्या माध्यमातून या राज्यातील बऱ्याचशा महिलांना बंदिस्त शेळया पालन योजना करण्याचे मोफत प्रशिक्षण दिले आहे. इतर ठिकाणी त्यासाठी 300 रुपये घेण्यात येतात. महिलांना हे प्रशिक्षण दिल्यानंतर या महिला स्वत:ला कर्ज मिळविण्यासाठी जिल्हा बँकेकडे जातात. परंतु त्याठिक्राणी त्यांना कोणत्याही प्रकारे कर्ज मंजूर केले जात नाही . माझी आपणास विनंती आहे की, ज्या महिला बचत गटाच्या माध्यमातून अशाप्रकारे शेळी-मेंढी प्रकल्प राबवीत आहेत त्यांना जिल्हा बँकेने शून्य टक्के व्याजाने कर्ज द्यावे अशी विनंती करतो. व आपली रजा घेतो. जय हिंद.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, जल संधारण विभागाच्या बाब क्रमांक 52 व पृष्ठ क्रमांक 48 च्या निमित्ताने माझे विचार याठिकाणी व्यक्त करणार आहे. जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर मी गेल्या दोन-तीन अधिवेशनामध्ये माझ्या भावना सतत व्यक्त करीत आलो आहे. यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये, त्याच्या पूर्वीच्या अधिवेशनामध्ये आणि त्याही पूर्वीच्या अधिवेशनामध्ये टुकूर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत मंत्रिमहोदयांना विनंती केली होती. हा प्रकल्प माझ्या तालुक्यातील लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी निश्चितपणे उपयुक्त ठरणार आहे. तेव्हा आपण हा टुकूर प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. गेल्या अनेक वर्षापासून या प्रकल्पाला प्रशासकीय मंजूरी देऊनसुध्दा अद्यापपर्यंत या प्रकल्पाचे काम सुरु होत नाही. तेव्हा मंत्रिमहोदयांनी यामध्ये लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे. कारण बीड तालुक्यातील जनता या शासनाकडे टकमक पहात आहे, आणि हा टुकूर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी इच्छा व्यक्त करीत आहे. तेव्हा हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा. बीड तालुक्यामध्ये दारिद्रय रेषेखालील जीवनमान असलेल्या लोकांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या लोकांच्या हाताला काम मिळण्यासाठी आपण प्रयत्न केले तर निश्चितपणे बीड तालुक्यातील जनता आपल्याला आशिर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. शेवटी त्याला काम मिळाले नाही म्हणून घराकडे परत फिरणारा मराठी माणूस, अंगावरच्या जीर्ण झालेल्या वस्त्रांची दुपटी करुन आपल्या मुलांच्या अंगाखाली अंथरता येईल काय? अशी विवंचना वहात आहे. एखाद्या झोपडीमध्ये एखादी मानिनी बाळंतपणाच्या वेदना सहन करते, तिच्या अंगा-खांद्यावरुन पावसाचे पाणी जाते, परंतु प्रत्यक्ष ज्या पाण्याची जनता वाट पहात आहे ते पाणी मात्र शासन त्यांना देत नाही. हे दुर्दैव आहे. ही शोकांतिका दूर करण्यासाठी माननीय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मी आग्रहपूर्वक विनंती करतो.

सभापती महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 69 वरील बाब क्रमांक 79 च्या निमित्ताने सांगू इच्छितो की, मराठवाडयामध्ये बहुतांशी ठिकाणी धान्याचा साठा काळया बाजारामध्ये विकणाऱ्यांची संख्या खूप आहे. त्यांच्यावर एक वेळ खटला दाखल करावा, दुसऱ्या वेळी खटला दाखल करावा. दोन-तीन प्रकरणे झाल्यानंतर व तो पुन्हा सापडला तर त्याला मोक्का लावण्याचा प्रयत्न करावा. गोरगरिबांच्या अन्नामध्ये माती कालविण्याचे काम करणाऱ्या अशा लोकांना तुरुंगामध्ये डांबा. त्यांच्या हाता-पायामध्ये बेडया घाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

प्रा. सुरेश नवले....

सभापती महोदय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 20 व बाब क्रमांक 19 च्या निमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, मराठवाडयाचे लोकप्रतिनिधी माननीय श्री. पाशा पटेल सभागृहात उपस्थित आहेत. मराठवाडयामध्ये ज्वारी व बाजरीचे उत्पन्न जास्त होते. मराठवाडयाच्या बाहेर हे उत्पन्न जास्त होत नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊसाचे उत्पन्न जास्त होते. नाशिकमध्ये द्राक्ष आणि त्यापासून वायनरीचे उत्पन्न जास्त होते. विदर्भामध्ये गहू तर कोकणामध्ये तांदूळ जास्त पिकतो. तांदूळ व गव्हापासून बियर तयार केली जाते. ऊसापासून दारु तयार केली जाते. मराठवाडयामध्ये ज्वारी आणि बाजरीचे उत्पादन जास्त होत असेल तर त्यापासून दारु निर्माण करण्यामध्ये अडचण काय आहे? ती दारु आपण पाकिस्तान आणि चीनमध्ये निर्यात करा. जो दारु पिणारा माणूस आहे, तो जगात कुठेही जाऊन दारु पितो. मराठवाडयातील लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांना पूरक व्यवसाय दिला गेला पाहिजे. ज्वारीचे पीक सहा महिन्यांनी येते, बाजरीचे पीक तीन महिन्यांनी येते. उन्हाळयात किंवा कोणत्याही मोसमामध्ये येणारे हे पीक आहे, त्यावर कीड पडत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांना पैसा मिळेल,त्यांच्या हातामध्ये, खिशामध्ये पैसे येतील.गोरगरिबांच्या मुलां-मुलींची लग्ने होतील. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा यांनी ज्वारी व बाजरी पासून बनविण्यात येणाऱ्या दारु उत्पादनाला पाठिंबा जाहीर केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.मराठवाड्याचा उत्कर्ष करणारी ही जी व्यवसाय पध्दती आहे,त्याला महाराष्ट्र शासनाने पाठिंबा दिला पाहिजे असा माझा आग्रह आहे.स्वातंत्र्यानंतर कोणत्याही स्वस्त धान्य दुकानांवर ज्वारी किंवा बाजरी दिली गेली नाही. त्यामुळे येथे अन्न-धान्याची टंचाई होईल आणि महाराष्ट्रला अन्न-धान्याच्या टंचाईला सामोरे जावे लागेल असे चित्र मुंबई-पुणे येथे बसून काही मंडळी तयार करीत आहेत हे दुर्दैव आहे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

ते पुस्तक पंडित आहेत. त्या पंडितांना असे सांगावे की, जरा त्यांनी काळया मातीमध्ये यावे आणि त्यामध्ये पाय ठेवावेत. मग त्यांना कळेल.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

कोकणातील नाचणी, आता ज्यांना नाचता येत नाही त्यांना अंगण वाकडे आहे असे ते सांगणारच आहेत.आता याठिकाणी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब उपस्थित आहेत आणि महाराष्ट्र राज्याचे सगळे मंत्री महोदय उपस्थित आहेत. पण आमच्या मराठवाड्यातील बहुधा चार लाख लोक पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊस तोडावयास जातात आणि पाचर्डा येथे त्यांची मुले पडलेली असतात. अशा स्थितीमध्ये आम्ही जाहीर सभांमधून असे सांगतो की, तुमचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासन असे-असे प्रयत्न करणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की,जरा गोरगरिबांकडे लक्ष द्यावे.आम्ही उपेक्षित आहोत, मागासवर्गीय भागातून आलो आहोत. आमचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करावा. या राज्याच्या अर्थसंकल्पावर किंवा अभिभाषणाबद्दल महाराष्ट्र शासनाचे कौतुक करुन आमची जीभ बाहेर पडावयाची वेळ येते, तरी देखील आपण आमच्याकडे लक्ष देत नाही. अहो, आम्ही कुठपर्यंत कौतुक करावयाचे ते तरी सांगावे. तेव्हा आम्ही आपले कौतुक करीत असताना आपण आमच्या किमान मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा अशी मी आपल्याला आग्रहाची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवर बोलत असताना फक्त एक-दोन मुद्देच मांडणार आहे.

सभापती महोदय,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या बाब क्र.79, पान क्र.69 यामध्ये लातूर जिल्ह्यातील अन्न साठवण गोदामांच्या दुरुस्तीच्या व परिरक्षणाच्या कामांसाठी तरतूद करण्यात आली आहे. मी निर्वाचित झाल्यानंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये माझी पहिली लक्षवेधी सूचना आली होती आणि माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, आदिवासी भागामध्ये साठवणूक करण्यासाठी गोदाम आणि धान्य खरेदीसाठी शेडची व्यवस्था केली जाईल. पण या आश्वासनाची पूर्तता या क्षणापर्यंत करण्यात आलेली नाही आणि ते आश्वासन कचऱ्याच्या टोपलीत टाकण्यात आले आहे असे वाटते.विदर्भातील शेतकऱ्यांच्या मालाची साठवण करण्यासाठी गोदामांची जेवढी व्यवस्था करावयास पाहिजे, तेवढी केली नाही. साधारणत: विदर्भातील चार जिल्हे, जे धान उत्पादक जिल्हे आहेत, त्याठिकाणी आजही उघडयावर धान्याचा साठा पडलेला आहे आणि या निष्क्रियतेमुळे शासनाचे फार मोठे नुकसान होणार आहे म्हणून मी दि.25-02-2010 रोजी प्रधान सचिव, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांना पत्र दिलेले आहे आणि त्यात अशी मागणी केली होती की, स्थानिक जन प्रतिनिधी आणि राईस मिल असोसिएशन यांना तात्काळ बोलावून ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. हमालांना 2000 ते 2005 पर्यंत त्यांची मजूरी अद्यापपर्यंत मिळालेली नाही. माझे असे म्हणणे आहे की, हमालांना जर मजुरी दिली नाही तर तो मरेल नाहीतर काय होईल ? म्हणून मला विनंती करावयाची आहे की, हमालांना तात्काळ त्यांची मजुरी देण्यात यावी. गेल्या दोन वर्षापासून वाहतुकीचे भाडे त्यांना प्राप्तच झालेले नाही. 2008-2009 हे वर्ष देखील संपले.परंतु गेल्या कित्येक दिवसापासून शासनाकडून वाहतुकीचे भाडे अद्याप ठरविण्यात आलेले नाही. आता अशी स्थिती आहे की, गोडाऊन नाही, माल नाही, माल असेल तर कोणी माल उचलत नाही, काही माल उघड्यावर पडलेला आहे. परंतु शासन वाहतुकीचे भाडेही ठरवत नाही, सभापती महोदय, अशा परिस्थितीत काय होणार आहे ? यावरुन असे लक्षात येईल की, संपूर्ण व्यवस्था विस्कळीत झालेली आहे. माझा असा प्रश्न आहे की, शासन वाहतुकीचे भाडे केव्हा ठरविणार आहे? तसेच "अ" दर्जाच्या तांदूळाऐवजी साधा तांदूळ जमा केल्यानंतर आता संबंधितांवर पेनल्टी लावण्यात आली आहे. एकतर शासन व्यवस्था तयार करीत नाही, परंतु त्यांच्यावर पेनल्टी बसविली जात आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

अशा वेळी शेतकरी, राईस मिल असोसिएशन आणि शासन यांच्यामध्ये कुठेतरी समन्वय होऊन पूर्व विदर्भात शासनाचे होणारे नुकसान थांबविले पाहिजे तसेच गोंदिया, भंडारा, चंद्रपूर हे जे धान उत्पादक जिल्हे आहेत याठिकाणी शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे गोदामाचे बांधकाम तात्काळ करण्यात यावे, अशी आग्रहाची विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 133, पान क्रमांक 127. पाणी पुरवठा व स्वच्छता यावरील भांडवली खर्च याबाबत सभापती महोदय, आपणही या बाबीचे समर्थन केलेले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उभारलेल्या रोख्यांच्या मुद्दलाच्या रकमेची व त्यावरील व्याजाची परतफेड करण्यावरील अधिक खर्च भागविण्यासाठी 3,67,4000/- रुपयाची तरतूद चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या प्राधिकरणाचे खासगीकरण करु नये अशी माझी मागणी आहे. कारण सामान्य माणसाला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. सामान्य माणसाला पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देणे ही शासनाची जाबाबदारी आहे. या प्राधिकरणावर चांगले नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. कारण हे प्राधिकरण विद्युल बिल भरीत नाही, त्यामुळे अनेक पाणीपुरवठा योजना बंद पडत आहेत. नळाचे कनेक्शन देण्यासंबंधीचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे धोरण उदासीन आहे, त्याला सबळ करण्याची गरज आहे. तसेच सामान्य माणसाला पिण्याचे स्वच्छ, शुध्द आणि निर्मळ पाणी मिळेल यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात योजना राबविण्याची गरज आहे. महाराष्ट्राला 50 वर्षे पूर्ण झालेली आहेत. महाराष्ट्राचे हे सुवर्णमहोत्सवी वर्षे आहे परंतु आपण सामान्य माणसाला शुध्द पिण्याचे पाणी देऊ शकत नाही ही खेदाची बाब आहे. सभापती महोदय, एक महिना खाण्यासाठी अन्न दिले नाही तरी चालेल परंतु पाण्याशिवाय माणूस जगू शकत नाही म्हणून मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो की, पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने अग्रक्रम द्यावा. सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी याठिक्राणी उभा आहे.

सभापती महोदय, मी पान क्रमांक 22, बाब क्रमांक 25. मत्स्यव्यवसाय विभागावर बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हयात आणि कोकणात फयान वादळ आले. या वादळाच्या वेळी सर्व मंत्र्यांनी त्याठिकाणी जाऊन भेटी दिल्या. त्यानंतर या फयान वादळाची चर्चा या सभागृहात मोठया प्रमाणात झाली. या वादळात सिंधुदुर्ग जिल्हयात झालेल्या जाळयांच्या आणि होडयांच्या नुकसान भरपाईसाठी चार कोटी रुपये देण्यात आले. त्यापैकी जवळ जवळ 1 कोटी 23 लाख रुपयाचे वितरण झाले आणि 2 कोटी 77 लाख रुपयाचे वाटप अद्याप झालेले नाही. सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये दिनांक 23/12 रोजी नियम 93 अन्वये सूचना मांडण्यात आली होती.तेव्हा जाळया घेतल्याचे पुरावे म्हणून पावत्या मागण्याची अट घालण्यात आलेली आहे ती अट शिथिल करावी अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरात असे म्हटले होते की, "महसूल विभागात किंवा अन्य ठिकाणी येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती प्रमाणे ही देखील नैसर्गिक आपत्ती समजून जाळयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश पारित केले जातील." परंतु अद्याप त्यांसबंधीचे आदेश पारित न केल्यामुळे आणि मार्च महिना संपत आल्यामुळे जवळ जवळ 2 कोटी 77 लाख रुपये परत जाण्याची भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. त्यामुळे तातडीने यासंबंधीचे आदेश काढण्यात यावेत आणि ज्या जाळयांचे पुरावे नसतील त्यांना पंचनाम्याप्रमाणे कारण पंचनाम्यावर पाच वेगवेगळया खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सहया असल्यामुळे या पंचनाम्याप्रमाणे जाळयांची नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने आदेश काढावेत अशा प्रकारची मी या ठिकाणी विनंती करतो.

सभापती महोदय, मत्स्य दुष्काळाबाबत याठिकाणी अनेकवेळा चर्चा झालेली आहे. मत्स्य दुष्काळाबाबत अनेक वेळा अनेक उपाययोजना सांगितल्या जातात. मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना पर्यटन व्यवसायाकडे वळविण्याच्या अनेक उपाययोजना सांगितल्या जातात. परंतु त्याच्यावर कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही होत नाही. या मच्छिमारांनी पाच ते सात वर्षापूर्वी जिल्हा बँकेचे कर्ज घेतले होते पण मत्स दुष्काळामुळे जिल्हा बँकेचे कर्ज फेडू न शकल्यामुळे फयान वादळाच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

काळात देखील या जिल्हा बँकने या सर्व मच्छिमारां विरुध्द नियम 101 अन्वये नोटिसा काढून जप्तीचे आदेश काढलेले आहेत. या मच्छिमारांचे कर्ज माफ होण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत जेणेकरुन या मच्छिमारांना दिलासा मिळेल, अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करतो..

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, यानंतर मी वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 33 वरील बाब क्रमांक 36 बाबत बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 24 जून रोजी गाजावाजा करुन मंत्रिमंडळाची बैठक झाली. अनेक मंत्री त्या ठिकाणी आले. निवडणुकीपूर्वी झालेल्या त्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये शासनाने 5232 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आणि त्या ठिकाणी कोकणातील माणसाला फसविण्याचे काम केले. या पॅकेजच्या अनुषंगाने 30 जुलै रोजी एक जी.आर. काढण्यात आला. या जी. आर. नुसार 2009-1010 मध्ये पैशाचे वितरण करण्याच्या बाबतीत आकडेवारी पाहिली तर कालच्या पुरवणी मागण्यांमध्ये आणि आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली दिसत नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे कोकणाला कोणत्याही प्रकारचा निधी दिलेला नाही. ते पैसे कोकणाला देण्यात यावेत. माननीय मंत्रिमहोदय, श्री. भास्कर जाधव हे मागच्या अधिवेशनात निधी दिला असे सांगत आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये फक्त दोन हेडवर पैसे दिले होते. ड्रेझर खरेदी करण्यासाठी 20 कोटी रुपये आणि महसुली इमारती बांधण्यासाठी 13 कोटी रुपये त्यावेळी देण्यात आले. या व्यतिरिक्त कोणतीही तरतूद केलेली नाही. आताच्याही पुरवणी मागण्यांमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण कोकणातील मंत्री आहात. त्यामुळे कोकण विभागासाठी आपण भांडले पाहिजे. कोकणासंबंधी आपण प्रयत्न करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये जाहीर केलेल्या तरतुदी या वर्षीच्या म्हणजे 2010-2011 च्या बजेटमध्ये देण्याची विनंती मी या ठिकाणी करीत आहे. माननीय पाटबंधारे राज्यमंत्र्ञी या ठिकाणी बसलेले आहेत. त्या ठिकाणी पॅकेजमध्ये पाटबंधाऱ्यांसाठी 725 कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या ठिकाणी 16 प्रकल्प आहेत. आज माझ्याकडे अधिक्षक अभियंत्यांचे पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, सन 2007 पासून तेथील पाटबंधारे प्रकल्पांना काहीही निधी न मिळाल्यामुळे आज त्या पाटबंधारे प्रकल्पांची कामे बंद आहेत. या प्रकल्पांना तातडीने निधी द्यावा. या सर्व प्रकल्पांच्या किमती चौपट झालेल्या आहेत. 40 वर्षापासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

सरकार एकही प्रकल्प पूर्ण करु शकले नाही, ही कोकणाच्या दृष्टीने शोकांतिका आहे. त्यामुळे कोकणाला जास्तीत जास्त पैसे देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 57 वरील बाब क्रमांक 61 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. परंतु त्या ठिकाणी खनिजाचे उत्खनन करणारे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सुरु झालेले आहेत. खनिज उत्खननाच्या नावाखाली जिल्ह्यात झाडतोड आणि पर्यावरण नष्ट करण्याचे काम चालले आहे. पर्यावरणाचा भाग म्हणून केंद्राने गाडगीळ समितीची नियुक्ती केलेली आहे. मी माननीय पर्यावरण राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, केंद्राच्या गाडगीळ समितीचा अहवाल सहा महिन्यात दाखल होणार आहे. सहा महिन्यात त्यांचा अहवाल येईपर्यंत आपण जनसुनावणी थांबवून तेथील खनिज उत्खनन प्रकल्प थांबविण्याचा प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. नियोजन विभागाने 30 डिसेंबरला 1 जी.आर. काढलेला आहे. त्यामध्ये 148 योजना हस्तांतरित, एकत्रिकरण आणि वगळण्यासाठी दिलेल्या आहेत. या जी.आर. नुसार स्टेटकडून येणारा जो निधी आहे तो पूर्णपणे बंद झालेला आहे. हा निधी जिल्हा नियोजनकडे वर्ग केल्यामुळे बंद झालेला आहे. या योजना परत चालू करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 127 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सुमारे एक हजार बचत गटांना शालेय पोषण आहाराचे काम देण्यात आले. गेली सहा महिने या बचत गटांना शालेय पोषण आहाराचे अनुदान न मिळाल्यामुळे काही महिलांनी आपले दागिने गहाण ठेवले तर काही महिलांनी कर्ज काढले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

कर्ज काढल्यामुळे या महिला विवंचनेत सापडलेल्या आहेत. या मुलांना पोषण आहार देऊन शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शालेय पोषण आहार ही योजना सुरु केलेली आहे. परंतु या योजनेचा निधी वितरित न झाल्यामुळे या महिलांचे हाल होत आहे. म्हणून हा निधी लवकरात लवकर वितरित करण्यात यावा अशी मी विनंती करतो आणि याठिकाणी थांबतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, पान क्रमांक 33 वरील बाब क्रमांक 36 वर मी बोलू इच्छिते. सातारा जिल्हयामध्ये शालेय शिक्षण घेत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्या वास्तूमध्ये रहात होते ती वास्तू राज्य संरक्षित स्मारक करण्याचा निर्णय दिनांक 13.2.2007 रोजी घेण्यात आला होता. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही सुरु झाली होती. जिल्हाधिकारी, सातारा यांनी भूसंपादनाच्या कामासाठी शासनाकडे निधीची मागणी केली होती. परंतु वित्त विभागाने दोन वेळा ही फाईल परत पाठविली आहे. त्या वास्तूमध्ये जे गृहस्थ राहतात त्यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे सांगून दोन वेळा ही फाईल परत पाठविली आहे. तत्कालीन राज्यमंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील यांनी यासंबंधी एक बैठक घेऊन भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणाला आता कोणतीही स्थगिती नाही, तरीही वित्त विभागाने दोन वेळा फाईल परत पाठविली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे सरकार असल्यामुळे वित्त विभागाकडे ही फाईल पुन्हा पाठवावी आणि ती मंजूर होऊन परत येण्याची व्यवस्था करावी अशी यानिमित्ताने मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मी महिला व बाल विकास विभागाच्या पान क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 126 वर बोलू इच्छिते. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराने चालणारे हे राज्य आहे. महिलांचे सक्षमीकरण करणारे हे राज्य आहे. राज्य महिला आयोगातील रिक्त पदे 3-3 वर्षे भरली जात नाहीत. आता राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपदही रिक्त आहे. पूर्वी एक सभासद व एक अध्यक्षांचे पद भरले होते. परंतु आता या आयोगाची मुदतही संपलेली आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी महिला आयोगाचे गठन करण्यात यावे. राज्य महिला आयोगाला फंड दिला जातो, त्यातून आयोगाच्या इमारतीचे भाडे सुध्दा देता येत नाही. त्यामुळे कर्मचा-यांच्या पगारावर त्याचा बोजा येतो. महिलांच्या सक्षमीकरणाचे कार्यक्रम घ्यावे लागतात, त्यासाठी प्रायोजक शोधावे लागतात. त्यामुळे महिला आयोगाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य ती पावले उचलावीत.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण खात्यासाठी जेंडर सेंसेटिव्ह बजेट द्यावे. त्यासाठी चर्चा घडवून आणावी आणि त्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा अशी मी विनंती करते. जगामध्ये महिलांचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न होतात. त्या अनुषंगाने राज्यात महिला बचत

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

गटांची निर्मिती झालेली आहे. पुणे जिल्हयातील पीडीसी बँकेमार्फत महिला बचत गटांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज दिले जाते. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही या बचत गटांना कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर जलसंपदा विभागाच्या पान क्र.48 वरील बाब क्र.50 वर मी बोलू इच्छिते. बीड जिल्हयात बुटेनाथ तलाव आहे, धारुर तालुक्यातील कालारी, मैंदवाडी, सारुकवाडी, आष्टी तालुक्यातील चिंचोली (गहिनीनाथगढ), पाटोदा तालुक्यातील हनुमानगड सावरगाव हे सर्व पाझर तलाव, साठवण तलाव, लघुसिंचन तलाव दुरुस्त करावेत. कारण या तलावातून पाणी वाहून जाते. मांजरा खो-यातील तलावांचे गाळ काढणे गरजेचे आहे. त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने भौतिक अनुशेष पूर्ण करणे आवश्यक आहे. हा अनुशेष दूर झाला आहे असे सांगितले जाते ते चुकीचे आहे. त्यामुळे हा अनुशेष पुन्हा मोजण्यात यावा अशी मी विनंती करते.

यानंतर उद्योग विभागाच्या पान क्रमांक 58 वरील बाब क्र.64 वर मी बोलू इच्छिते. दहिफळ (वडमाऊली) ता.केज येथे एमआयडीसी स्थापन करण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांना एक पत्र दिलेले आहे. त्याठिकाणी दोन साठवण तलाव आहेत. त्यामुळे तेथे एमआयडीसी स्थापन करण्यात यावी अशी यानिमित्ताने विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पान क्रमांक 68 वरील बाब क्रमांक 78वर बोलत असताना माननीय मंत्री महोदयांच्या एक गोष्ट मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, दर महिन्याला प्रत्येक कुटुंबाला सबसिडी म्हणून अन्नधान्याच्या माध्यमातून 500 रुपये दिले जातात असे मी ऐकलेले आहे. हा खेळ असा आहे की, लोक रेशनच्या दुकानावर रांगा लावून धान्य घेतात पण ते पुरेसे मिळत नाही आणि मिळाले तरी ते धान्य अशा प्रकारचे असते की ते शिक्षा म्हणून खावे लागते. आता जो गहू येतो तो आपोआप लाल होतो. ह्या व्यापातून जनतेला वाचवायचे असेल तर 500 रुपयाचे अनुदान हजार रुपये करावे. तसेच हे अन्नधान्य सरकारने खरेदी करु नये. कारण राजा बेपारी, प्रजा भिकारी, अशी आज जनतेची अवस्था झालेली आहे. तेव्हा या अनुदानामध्ये वाढ करुन लोकांना कुपन्स द्यावीत, जेणेकरुन लोक चांगले धान्य खाऊन तरी मरतील. ही कुपन्स दिल्यानंतर रेशनच्या दुकानावरील धान्य खाऊन लोकांनी कुजून मरण्यापेक्षा त्या कुपन्सवर बाजारातून धान्य घेऊन खाण्याची संधी सर्वसामान्य माणसाला द्यावी अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पान क्रमांक 69 वरील बाब क्रमांक 81वर बोलत असताना मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्यातील साठेबाजांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा ठपका नेहमी शिधावाटप केन्द्रातील कर्मचा-यांवर ठेवला जातो. शिधावाटप यंत्रणेमध्ये महत्वाचा दुवा असलेले शिधावाटप निरीक्षक, उप निरीक्षक, लिपिक यांची पदे रिक्त आहेत. ठाणे, पुणे येथील प्रत्येक शिधावाटप कार्यालयामध्ये वर्षाला 10 लाख लोक येत असतात. शिधापत्रिका काढण्यासाठी नियमानुसार 7 दिवसांचा कालावधी नेमून दिलेला आहे. परंतु प्रत्यक्षात शिधापत्रिका मिळण्यासाठी दोन-तीन महिने लागतात. याचे कारण असे आहे की, या शिधावाटप कार्यालयातील कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत. मुंबई आणि ठाणे येथील शिधावाटप कार्यालयातील कर्मचा-यांची 66 टक्के पदे रिक्त आहेत. जागा रिक्त असल्यामुळे जनतेची कामे रेंगाळतात. 5 परिमंडल कार्यालयातील 1809 पदे मंजूर पदापैकी 1210 पदे भरलेली आहेत व 680 पदे रिक्त आहेत. आजपर्यन्त ही पदे भरलेली नाही. पदे रिक्त असल्यामुळे कामाचा उरक होत नाही. परिणामी शिधापत्रिका किंवा इतर कामासाठी कर्मचा-यांवर ठपका ठेवला जातो. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सर्वांकडून होत असते. आज आपण पहात आहोत की, सरकारी यंत्रणातील कर्मचा-यावरच ठपका ठेवण्याचे काम चालू आहे. मात्र जी रिक्त पदे आहेत ती भरण्याचे काम होत नाही. बाब क्रमांक 81 मध्ये 1.9 कोटीची मागणी केलेली आहे. या मागणीला मी विरोधी करतो. या शिधावाटप कार्यालयामध्ये आपण गेलो तर क्लार्कच्या जागा रिकामी असतात, निरीक्षक कामासाठी बाहेर गेलेले असतात, असे चित्र पहावयास मिळते. तेव्हा या शिधावाटप कायालर्यातील रिक्त जागा केव्हा भरल्या जातील याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करावा.

नगरविकास विभागाच्या पान क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 35अंतर्गत मुंबई नगर परिवहन प्रकल्पासाठी कर्ज देण्यावरील खर्चाकरिता 235.77 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबईचा विकास झाला पाहिजे. सौंदर्यीकरण झाले पाहिजे, दर्जेदार शहर झाले पाहिजे असे नेहमीच बोलेले जाते. झोपडपट्टी निर्मूलनाचा ध्यास शासनाने घेतलेला आहे. जुन्या इमारतीच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. किरण पावसकर...

पुनर्विकास केला जात आहे. पण या विकासाच्या नावावर काय काय गोष्टी घडत आहे हे मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. नियम 33(7) अंतर्गत पुनर्विकास करताना विकासकावर अशा पुष्कळशा गोष्टी लादलेल्या आहेत की त्यामुळे विकासकाला विकास करणे कठीण जाते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

परंतु एक महत्वाची गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाने सुधारणा केली. त्या सुधारणेप्रमाणे कलम 33(24) अन्वये नवीन कलम अंतर्भूत करण्यात आले. या सुधारणेप्रमाणे सार्वजनिक वाहनतळ बांधण्यासाठी स्वस्त दरात अमाप एफएसआय देण्याचे ठरले आहे. पार्किंग लॉट बांधण्यासाठी 50 चौ.मीटर बांधकाम करावयाचे आहे. ज्यामधून रॅम्प किंवा इतर सुविधा देता येईल. 25 चौ.मीटरचे बांधकाम केल्यानंतर 25 चौ.मीटरचा एफएसआय मोफत दिला जाईल. अशा प्रकारचे बांधकाम करण्यासाठी चार प्रस्ताव देण्यात आले आहेत. यामध्ये लोअर परळ येथील पार्किंग लॉटमध्ये 11865 गाड्या पार्क केल्या जाणार आहेत. या राज्याचे मुख्यमंत्री आणि नगरविकास विभागाचे प्रमुख यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. ज्याठिकाणी पार्किंग लॉट उभारले जाणार आहेत तेथे मॉल्स, कॉलेज, हॉस्पिटल्स आहेत. सार्वजनिक ठिकाणी कोणत्या हेतूने एवढे मोठे पार्किंग लॉट देत आहात? तेथील स्थानिक नागरिकांना सुविधा मिळावी म्हणून हे धोरण आखले आहे का? या बांधकामापोटी मिळणारा मोफत एफएसआय दिल्लीस्थित कंपन्यांना मिळून त्यांना मुंबईमध्ये इतरत्र बांधकाम करता यावे म्हणून परवानगी दिली आहे का? 11865 वाहने उभी करता येतील असे यामध्ये नमूद केले आहे. एका वाहनाला वरुन खाली येण्यासाठी तीन मिनिटे वेळ लागणार आहे. 11000 वाहने वरुन खाली येण्यासाठी एकूण 35595 मिनिटे इतका वेळ लागेल. म्हणून 25 दिवस इतक्या फेऱ्या द्याव्या लागतील. त्याचप्रमाणे वरळी येथे 864, भायखळा येथे 2065 व माहिम येथे 3800 वाहनांसाठी पार्किंग लॉट उभारले जाणार आहेत. राज्यावर 2 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. इतके बांधकाम झाल्यामुळे जो एफएसआय मोफत दिला जाणार आहे त्यामुळे राज्य शासनाचा 2500 कोटी रुपयांचा महसूल बुडणार आहे. हा भ्रष्टाचाराचा सर्वात मोठा प्रकार आहे. या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी विरोधी पक्षात असताना उपस्थित केलेले प्रकरण "भूखंडाचे श्रीखंड" म्हणून गाजले होते. या मुंबई शहरातील असे 70 प्रस्ताव मंजूर होतील त्यावेळी भूखंडाचे श्रीखंड नव्हे तर श्रीखंडाबरोबर पुरणपोळी व इतर सगळे प्रकार असतील अशा प्रकारे एफएसआय वाटप होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, नगरविकास विभागाच्या अनेक फाईल्स या वर्षा बंगल्यासमोरील इमारतीमध्ये असतील. परंतु या वाहनतळाच्या संदर्भातील फाईल्स कोणत्या इमारतीमध्ये ठेवल्या आहेत याची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

मला कल्पना नाही. हा सर्वात मोठा भ्रष्टाचार आहे. वाहनतळांसाठी मंजूर केलेल्या जागा चुकीच्या असतील तर त्या ताबडतोब रद्द करुन कोणत्या कारणासाठी या जागा मंजूर केल्या याची छाननी होऊन सभागृहासमोर याचे स्पष्टीकरण व्हावे असे सांगून माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, दोन-तीन महत्वाच्या मुद्यांकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 29 वर मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या कर्ज तत्वावरील खर्चासाठी तरतूद करण्याकरिता 235 कोटी 77 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. हा परिवहन प्रकल्प असून त्याचा एस्टीमेटेड खर्च किती आहे, या खर्चामध्ये राज्य शासनाचा वाटा किती आहे आणि केंद्र शासन किती मदत करणार आहे याची माहिती सभागृहाला मिळावी.

दुसरा महत्वाच्या प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

महोदय, बाब क्र. 36, 37, 38 व 39, पान क्र. 33 या मागणीच्या अनुषंगाने वेतनेत्तर सेवानिवृत्ती भत्ते आणि निवृत्ती वेतन विषयक खर्च भागविण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. राज्यात शासनाच्या सेवेत एकूण नोकरवर्ग किती आहे याचा विचार केला तर साधारणपणे 22 लाख कर्मचारी आहेत. उत्तर प्रदेशसारख्या राज्याचा विचार केला तर ज्या राज्यात 85 खासदार, 405 आमदार आणि 17 कोटी लोकसंख्या असलेल्या राज्याचा प्रशासकीय कारभार पाहण्यासाठी व राज्य सांभाळण्यासाठी फक्त 13 लाख एवढेच कर्मचारी आहे. आपल्या राज्यात मात्र 288 विधानसभा मतदारसंघ, 48 लोकसभा मतदारसंघ आणि 10 कोटी लोकसंख्या असलेल्या राज्यात जवळपास 22 लाख कर्मचारी आहेत. या राज्यात अशी परिस्थिती आहे की, काही कार्यालयांमध्ये कर्मचारी आहेत परंतु त्या विभागात त्यांना कोणते काम करायचे याची सुध्दा माहिती नसते, असा कारभार या राज्यात चालला आहे. यासंबंधीचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने यामध्ये किती खर्च होतो याचा आढावा घ्यायचा होता. राज्यशासनाने 5 वा वेतन आयोग मान्य केला होता त्यावेळेस राज्यावर फार मोठा आर्थिक भार पडला होता. त्या अडचणीतून आपण बाहेर येतो न येतो तोच 6 वा वेतन आयोग राज्यातील कर्मचाऱ्यांनालागू केला आहे. अशा वेतनावर तसेच निवृत्ती वेतनावर राज्याचा किती खर्च येतो याची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे अशी माझी विनंती आहे. आज आय.टी. इंडस्ट्रीजचा विचार केला तर त्या क्षेत्रात चांगल्या नोकऱ्या मिळतात परंतु कामगारांचा विचार केला तर मात्र त्यांना कंत्राटी पध्दतीनेच काम दिले जाते. या तुलनेत सरकारी कर्मचाऱ्यांवर किती खर्च होतो याची माहिती मिळाली पाहिजे. माझ्या माहितीनुसार राज्यात 63 टक्के खर्च हा वेतन व निवृत्ती वेतनावर होतो आणि दुसऱ्या बाजूला विकासाची कामे करण्यासाठी पैसा लागत असेल तर तो कर्ज रुपाने काढून राज्यावर 1.85 लाख कोटी एवढा कर्जाचा बोजा वाढलेला आहे. असे असताना योजनेअंतर्गत व योजनेत्तर खर्चासाठी पैसे मिळत नाहीत. त्यासाठी कर्जाऊ रक्कम घेऊन खर्च करावयाचा आणि महसुली उत्पन्नाचा कमीत कमी भाग अशा विकासासाठी खर्च करण्यात येतो, यासंबंधीची वस्तुस्थिती मंत्री महोदयांनी द्यावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 145, पृष्ठ क्रमांक 145 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मौलाना आझाद अप्लसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या भाग भांडवली अंशदानात वाढ झाल्यामुळे आवश्यक ती तरतूद करण्यासाठी व हा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी रु.,21,76,83,000 ची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, हा जो निर्णय घेण्यात आलेला आहे त्याबद्दल मी शासनाचे खास अभिनंदन करतो. सच्चर कमिटीच्या अंतर्गत युपीए सरकारच्या माननीय पंतप्रधान यांनी अल्पसंख्याकाच्या विकासासाठी 15 कलमी कार्यकम निश्चित केलेला आहे. माननीय पंतप्रधांनानी अल्पंसख्यांक समाजासाठी जो 15 कलमी कार्यक्रम सुरु केला आहे त्याची कठोर अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये आणि तालुक्यांमध्ये होण्यासाठी संबंधित विभागाच्या प्रमुखांना लेखी निवेदन दिले पाहिजे. केंद्रशासनाच्या 15 कलमी कार्यक्रमाचा निधी आपल्या मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला मिळाला तर आपल्याला या महामंडळाच्या योजना अजून चांगल्या प्रकारे राबविता येतील. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंतराव पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, पूरक मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. पृष्ठ क्रमांक 90, पूरक मागणी क्रमांक आर-1, विनियोजन क्रमांक 2210वर माझे विचार व्यक्त करणार आहे. जीवनदायी योजनेमधून दुर्बल घटकांना मदत करीत असतो. यासाठी 1 कोटी रुपयांची पूरक मागणी या ठिकाणी देण्यात आलेली आहे. नाशिक येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर संपावर असल्यामुळे हॉस्पिटल बंद पडलेले आहे त्यामुळे याबाबत शासनाने लक्ष द्यावे अशी कळकळीची विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता पुरवणी मागण्यांवरील सदस्यांची भाषणे संपलेली आहेत आता चर्चेच्या उत्तराला सुरुवात होईल. प्रथम श्री. सचिन अहिर उत्तर देतील.

श्री. सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या विशेष करुन उद्योग विभगाच्या बाब क्रमांक 98,99 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्यांनी याबाबत काही अतिशय चांगल्या सूचना शासनाला केलेल्या आहेत. विशेष करुन सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी 2-3 महत्वाच्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे. त्यांनी सांगितले आहे की, एसआरए योजनेच्या संदर्भात गेल्या एक वर्षापासून एसआरएच्या योजनांना गती मिळालेली आहे. केंद्र आणि राज्य शासनाची भूमिका आहे की, झोपडपट्टी पुनर्विकास योजनांच्या कामांना गती दिलेली आहे. अशी केंद्रशासनाची आणि राज्य शासनाची भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांनी आमच्या विभागाला चांगली पुष्टी दिल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. तसेच त्यांनी एसआरए योजनेंचे सीईओ आयएएस कॅटॅगरीचा असावा तसेच आएएस अधिकारी असला म्हणजे कामामध्ये पार्दशकता येते अशी सूचना केलेली आहे. परंतु यासंदर्भात सांगू इच्छितो की, एसआरए योजनेचे सीईओ श्री. झेंडे हे 1993 च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यामुळे एसआरए योजनेचे काम आता पारदर्शक होऊन योजनेला चांगल्या प्रकारे गती मिळालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विकासकाबद्दल मुद्दा उपस्थित केलेला आहे. या विकासकाने त्यांच्या कर्मचा-यांना खोल्या उपलब्ध करुन दिलेल्या आहेत व काही चूकीचा प्रकार झ ालेला आहे असा त्यांनी मुद्दा मांडलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात निश्चितप्रमाणे माहिती घेऊन त्या संदर्भातील निर्देश दिले जातील. पात्रतेच्या संदर्भात सुध्दा त्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय,पात्रतेच्या संदर्भात प्रत्येक बोर्डामध्ये ग्रिव्हेन्सेस कमिटी असली पाहिजे मग ती केवळ झोपडपट्टीसाठी नाही, चाळीच्या इमारतीच्या प्रश्नाबाबत, मुंबई बोर्डाच्या बाबतीत असेल किंवा महाराष्ट्राचे जेवढे काही रिजनल बोर्ड आहेत त्यासंदर्भात ठोस भूमिका घेण्याचे काम केले पाहिजे. एवढेच नव्हेतर या सर्वांवर आळा घालण्यासाठी किंवा विकासकाकडून जी काही फसवणूक केली जाते त्यावर नियम प्राधिकरण आयोग स्थापन करण्याचा मानस शासनाच्या स्तरावर सुरु आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनेक वेळा ही मंडळी लोकप्रतिनिधीकडे जात असतात आणि त्यंना संबंधित अधिका-यांकडे पाठविल्यानंतर पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळत नाही. म्हणून या संदर्भात सर्वावर बंधन आणण्याच्या दृष्टीकोनातून नियम प्राधिकरण करण्याची शासनाची भूमिका राहणार आहे

सभापती महोदय,.सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी या चर्चेत भाग घेत असतांना,कलम 33(7) आणि 33 (24) सबंधी उल्लेख केला आहे.अर्थात या सदर्भात नगरविकास खात्याच्या माध्यमातून सूचना केल्या जातात. परंतु या सूचना करीत असतांना राज्य शासन धोरण जाहीर करण्याचे काम करीत असते परंतु धोरण जाहीर केल्यानंतर त्या त्या महानगरपालिकेला यासंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार असतो .म्हणून सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी त्यांचा मुद्दा सबंधित महानगरपालिकेकडे मांडण्याचे काम केले तर त्यांना तेथे न्याय मिळू शकेल.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी या विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना काही मुद्दे मांडलेले आहेत. त्यांच्या भागात एम.आय.डी.सी. उभी करण्याच्या बाबतीत त्या पुढाकार घेत आहेत त्यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, गाव तेथे एस.टी. ही संकल्पना आपण मांडली होती त्या प्रमाणे आता इन्डस्ट्री तेथे गॅस अशी संकल्पना मांडण्याचे काम शासन करणार आहे.सध्याच्या परिस्थितीमध्ये निव्वळ कोल किंवा फ्युएल बेस इन्डस्ट्री न करता गॅस बेस इन्डस्ट्री करण्याची भूमिका शासन घेत असून यासाठी राज्य शासनाची मान्यता घेऊन एम.आय.डी.सी.च्या बोर्डात त्यासंबंधीचा ठराव करण्यात येईल,एम.आय.डी.सी. गॅस कंपन्यांमध्ये प्रवेश करील आणि गुजराथ, गेल आणि रिलायन्स याच्या बरोबर टायअप करुन ज्या कंपन्याकडून गॅस मिळेल त्या कंपन्याकडून एम.आय.डी.सी.ला गॅस पुरविण्याचा शासनाचा विचार आहे. असे केल्यामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्र वाढेल असे मला वाटते. परंतु हे क्षेत्र वाढत असतांना डिमान्ड किती आहे हे सुध्दा पहावे लागेल. अनेकदा असे घडते की , आग्रहामुळे एम.आय.डी.सी सुरु केल्या आहेत परंतु त्यासाठी लागणा-या जमिनी शेतक-यांकडून घेतल्या आहेत आणि त्या ठिकाणी प्रत्यक्षात एम.आय.डी.सी. मध्ये ज्या प्रमाणात इन्डस्ट्री यावयास पाहिजे होती त्या प्रमाणात दुर्देवाने आलेली नाही. त्यामुळे त्या भागाची पहाणीसुध्दा करु त्याचबरोबर त्यासंबंधी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा देखील करु. त्या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चांगली एम.आय.डी.सी. उभी करण्याची शासनाची भूमिका आहे.सभागृहाला माझी अशी विनती आहे की.....

श्री. सय्यद जमा : माननीय मंत्री महोदय जी, नागपूर के वस्त्रोद्योग इन्डस्ट्रीज में काम करने वाले कामगारों के घर के बारे मे मैंने प्रश्न उपस्थित किया है. आप उस समय सभागृह में उपस्थित नहीं थे. इसके बारे में आपने जबाब नही दिया है.

उपसभापती : माननीय मंत्री महोदय का जबाब पूरा हो जाने के बाद आप उनसे प्रश्न पूछ सकते हैं.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, वस्त्रोद्योग मंत्री त्यासबंधीचे उत्तर देतील. परंतु गिरणी कामगारांच्या घराच्या बाबतीत शासनाने भूमिका घेतली आहे. तसेच गिरणी कामगारांच्या घरासाठी शासन मुंबई शहरामध्ये योजना करीत आहे . त्याचबरोबर शासन नव्याने असा निर्णय घेत आहे की,जिल्हा स्तरावर देखील काही घटकांसाठी योजना व्हावयास पाहिजे. त्यामध्ये कामगार,पत्रकार,पोलीस इत्यादींना डोळयासमोर ठेवून प्रत्येक जिल्हयामध्ये या प्रत्येक घटकासाठी योजना तयार करण्याची राज्य शासनाची मानसिक तयारी आहे.त्याप्रमाणे योजना तयार करण्याचे काम होईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो. उद्योग आणि गृहनिर्माण विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी कांदिवली येथील शिवशक्ती एस.आर.ए. योजनेसबंधी मी स्पेसिफिक माहिती विचारली होती. बोगस रेशन कार्डस आणि गुमास्ता लायसेन्सच्या माध्यमातून चुकीच्या पध्दतीने लोकांना पात्र ठरविण्याचे काम त्या ठिकाणी सुरु असल्याचा मुद्दा मी मांडला होता. त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. यासबंधी नेमण्यात आलेल्या ट्रायब्युनलचे हिअरीग होऊन निर्णय येण्यास बराच वेळ लागेल तोपर्यंत या बाबतीत आपण स्थगिती देऊन चौकशी करणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय, याबाबतीत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल . बोगस गुमास्ता लायसन्स आणि रेशनकार्डसच्या बाबातीत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे तेव्हा शिवशक्ती नगराच्या संदर्भात निश्चितपणे चौकशी करु.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक 32.,33 आणि 34 संबंधी चर्चा करीत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सिडकोमध्ये महिला किंवा मुलीच्या वसतीगृहासाठी जागा राखून ठेवण्यात यावी अशा प्रकारची मागणी केलेली आहे.तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासबंधीचा एक भूखंड राखून ठेवण्यात आला असून तेथे मुलींचे वसतिगृह व्हावे यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाणार आहे.

नंतर श्री.सरफरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, वसतिगृहासाठी राखीव असलेल्या भूखंडाच्या विक्रीसाठी निविदा काढण्यात आली होती. तो भूखंड शासनाला देण्यात आलेला नाही तर एका खाजगी माणसाने करोडो रुपयांना तो विकत घेतला आहे. जर त्या भूखंडासाठी त्या माणसाने करोडो रुपये टाकले असतील तर तो त्याठिकाणी वसतिगृह चालू करणार नाही तर कुंटणखाना चालविणार. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, पुण्याच्या नंतर नवी मुंबई हे विद्येचे माहेरघर झाले आहे. म्हणून त्याठिकाणी मुलींसाठी वसतिगृह निर्माण करण्यात येईल काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मुलींच्या वसतिगृहासाठी राखीव ठेवण्यात आलेला भूखंड निविदा काढून विक्रीला काढण्यात आला आहे असे माननीय सदस्यांचे म्हणणे असले तरी माझ्याकडील माहिती व माननीय सदस्यांची माहिती तपासून बघितली जाईल. आणि यामध्ये जर चुकीची माहिती दिली गेली असेल तर शासन योग्य ती कारवाई करील. त्याचबरोबर शासनाने असा निर्णय घेतला आहे की, ज्या निराधार मुली आहेत त्यांच्यासाठी 140 चौरस मीटरचा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. त्यादृष्टीने शासन निश्चितपणे विचार करील अशाप्रकारची ग्वाही मी याठिकाणी देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी प्रश्न विचारला होता की, भाडे तत्वावर घरे बांधण्यापूर्वी जिल्हाधिकारी किंवा संबंधित महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागते. त्याकरिता विलंब लागतो. तेव्हा त्याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा अशाप्रकारची सूचना केली आहे. त्यांचे प्रस्ताव तांतडीने मंजूर होण्यासाठी त्या संदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांना....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्या भाषणाच्या वेळी मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नव्हते. एमएमआरडीएने 5 लाखामध्ये भाडयाची घरे बांधण्यासंबधीची योजना सन 2008 मध्ये वसई-विरारच्या परिसरामध्ये आणली होती. त्या योजनेमध्ये जे अर्ज करतील त्यांना 4 एफएसआय देण्याचे ठरले होते. उदा. अलिबागमध्ये 0.2 आणि वसईमध्ये 0.75 एफ.एस.आय. मिळतो. आपली योजना त्याअंतर्गत असल्यामुळे भाडयाची घरे वसईच्या परिसरामध्ये बांधण्याकरिता 4 एफ.एस.आय. दिला गेला पाहिजे. तसे केले तरच तो प्रकल्प व्हाएबल होईल, अन्यथा भाडयाची घरे बांधली जाणार नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या अशाप्रकारच्या अनेक मौलिक सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. त्यांनी केलेल्या सूचना निश्चितपणे स्वागतार्ह आहेत. त्या एकत्रित करुन व त्या संदर्भात अधिक माहिती घेऊन या पुढील काळात हे शासन योग्य ती सुधारणा करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करील.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात व या राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत मौलिक सूचना केली. त्यांनी सांगितले की, या राज्याचा आस्थापनेवरील खर्च 63 टक्के होतो. त्या मानाने बिहार हे राज्य क्षेत्रफळाच्या तुलनेत आपल्यापेक्षा दुप्पटीने अधिक असलेले व अधिक लोकसंख्या असलेले, अधिक लोकप्रतिनिधी असलेले असतांनाही तुलनेने त्या राज्यामध्ये आस्थापनेवरील खर्च कमी होतो. याचे कारण त्या राज्यामध्ये कर्मचारी वर्ग कमी आहे. अशाप्रकारची माहिती त्यांनी सदनाला दिली. मध्यंतरी या विषयावर चर्चा झालेली आहे. या राज्यामध्ये असे अनेक विभाग आहेत ज्याठिकाणी कितीतरी कर्मचाऱ्यांना काम नसल्यामुळे ते बसलेले आहेत व सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा व सर्व प्रकारचे त्यांना मिळणारे फायदे घेत आहेत. अशाठिकाणी एका विभागातील कर्मचारी दुसऱ्या विभागामध्ये पाठविण्यामध्ये तांत्रिक अडचणी आणल्या जातात. आणि म्हणून राज्यातील वेगवेगळया विभागामध्ये असलेल्या आयडल कर्मचाऱ्यांची एकत्रितपणे माहिती घेऊन ती सादर करण्यासंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मुख्य सचिवांना सूचना करण्यात आली होती. तेव्हा ती माहिती लवकरात लवकर शासनाकडे आल्यानंतर त्याचे व्यवस्थितपणे समायोजन करण्याबाबत शासन विचार करील. आणि या राज्याच्या विकासासाठी अधिकचा निधी कसा मिळेल यासाठी प्रयत्न करील. तेव्हा माननीय सदस्यांनी केलेल्या मौलिक सूचनांचा शासन निश्चितपणे आदर करील. नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 32, 33, 34 व 35 तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1, 2, 3, 4, 5, 6 व 7 या मागण्या तसेच, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाबतीत...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

मघाशी आमच्या सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितले की, सातारला माननीय परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा प्रस्ताव हा निश्चित अशा निर्णयाप्रत आलेला नाही. एकदा हा प्रस्ताव मंजूरीसाठी आला, पण नंतर तो मागे पडला. म्हणून त्यासंदर्भातील माहिती आणि सदरहू बाब माननीय मुख्यमंत्री महोदयांना अवगत करुन देण्यात येईल अशा प्रकारचे मी आपल्याला आश्वासित करतो. धुळयाचा विषयही तसाच आहे. या सर्व बाबींचा निश्चितपणे शासन योग्य तो विचार करील. म्हणून सांस्कृतिक कार्य विभागाच्या 137,138,139,140 मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

. . . .3 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल सत्तार (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा खात्याबद्दल माननीय प्रा.सुरेश नवलेसाहेबांनी साठेबाजी करणाऱ्यांच्या विरुध्द मोक्का लावावा, बोक्याला मोक्का लावावा अशी सूचना केलेली आहे. या सर्व गोष्टींसाठी आपण जिल्हा स्तरीय, विभागीय स्तरीय पथक तयार केलेले आहे. त्यांच्यामार्फत काळाबाजार करणाऱ्या, रॉकेलची साठेबाजी करणाऱ्या लोकांविरुध्द कारवाई करु.

सभापती महोदय, श्रीमान पाशा पटेलसाहेबांनी रेशन धान्य दुकानांमधून चांगल्या दर्जाचा माल मिळावा यासाठी कुपनची मागणी केलेली आहे.पण आपल्याला केंद्र शासनाकडून माल वितरित होत असतो. त्यामुळे याबाबतीत आपण निश्चितपणे केंद्र शासनाकडे विनंती करु की, त्यांनी कुपनव्दारे माल उपलब्ध दिला तर मग तो चांगला आहे की वाईट आहे हा मुद्दा निर्माण होणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर साहेबांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत मागणी केली आहे.. . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.अब्दुल सत्तार बोलण्यासाठी उभे राहिले की मला एका गोष्टीची आठवण होते की, आमच्या संरक्षणाचे काय ? काल साडेपाच वाजेपर्यंत याबाबत निवेदन करतो असे सांगितले. रात्री 9.00 वाजताही विचारले, तेव्हाही "उद्या" असे सांगितले म्हणजे आज करणार. पण ते कधी करणार आहात ते सांगावे .

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय,उद्या. वितरण व्यवस्थेच्या बाबतीत रिक्त पदे भरण्या-साठी आम्ही महसूल विभागाला सूचना दिलेल्या आहेत आणि महसूल विभाग सदरहू रिक्त पदे भरणार आहे.सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी शिधापत्रिका वाटपाबाबत मुद्दा मांडला आहे. त्या सर्व बाबी तपासून यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री.विक्रमजी काळे, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी धान्य उशीरा उचलले जाते आणि त्यामुळे ते उपलब्ध होत नाही असे सांगितले.याबाबतीत संबंधित जिल्ह्याचे जे अधिकारी आहेत, त्यांना निश्चितपणे आदेश देण्यात येतील की, त्यांनी टप्याटप्याने धान्य न उचलता पूर्णपणे एकाच वेळी उचलावे आणि लोकांपर्यंत पोहोचवावे. तेव्हा अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र.76 ते 84 च्या 197840.48 रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्र.106 ते 110 अशा मागण्या आहेत. या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.मोतेसाहेब, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेब तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी भाग घेतला आणि अत्यंत चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. विशेषत: सन्माननीय सदस्य मोतेसरांनी सूचना केलेल्या आहेत की, आदिवासींच्या आश्रमशाळेमध्ये मिळणाऱ्या जेवणाच्या बाबतीत सांगितले आहे. याठिकाणी मुलांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, संगणकीकरणाचे शिक्षण मिळावे आणि तेथील शिक्षकांना सुध्दा त्याबाबत शिक्षण देण्यात यावे. कारण तेथे संगणक दिल्यानंतर जर तेथील शिक्षकांनाच ते चालवता येत नसतील तर अडचण निर्माण होईल. म्हणून यामध्ये आम्ही वेगळया पध्दतीने सुधारणा करीत आहेत. मे महिन्यामध्ये "यशदा" मार्फत शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचे काम सुरु केले आहे.संगणकीकरणाचे सुध्दा त्यांना शिक्षण देण्यात येणार आहे. याचबरोबर मुलांना जे जेवण दिले जाते, ते व्यवस्थित आहे की नाही हे देखील पहाण्यात येणार आहे. तसेच या अनुषंगाने मुलांची हजेरी ठेवण्यासाठी, शिक्षकांची हजेरी ठेवण्यासाठी बायो-मॅट्रीक अटेंन्डन्सच्या माध्यमातून थम्स् किंवा बोटाच्या सहाय्याने उपस्थिती घेण्याची पध्दत सुरु करणार आहोत. कारण मुले हजर असतात पण प्रत्यक्षात जेवणाच्यावेळी कमी असतात किंवा हजेरीपटावर मुलांची भरपूर संख्या असते पण प्रत्यक्षात ते कमी असतात, त्यामुळे याबाबत माहिती मिळत नाही. ती माहिती व्हावी, तसेच शिक्षक हजर आहेत की नाही यासाठी त्यांची दिवसातून तीन वेळा हजेरी घेणार आहे आणि जो विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये रहात आहे त्याची चार वेळा बायो मॅट्रीक पध्दतीच्या सहाय्याने हजेरी घेणार आहोत. त्यामुळे सगळा प्रॉब्लेम सुटणार आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, बांधकामाचा दर्जा चांगला असला पाहिजे यासंदर्भात सूचना करण्यात आलेली आहे. जुन्या शाळांची बांधकामे मोठया प्रमाणात घेण्यात येत आहेत. त्यामुळे याबाबतीत अडचण येणार नाही. जुन्या शाळांची बांध्याकामे चांगल्या प्रकारे होतील.

सभापती महोदय, याठिकाणी इंग्रजी शिक्षणाच्या संदर्भात सूचना करण्यात आलेली आहे. यासंदर्भात आता आपल्याकडे दहा शाळा इंग्रजीच्या आहेत परंतु के.जी. पासून पी.जी. पर्यंतचे पूर्ण शिक्षण इंग्रजीतून देण्याचा एक कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. त्यासाठी केंद्र सरकारचे अर्थसहाय्य मिळालेले आहे. त्यासाठी या वर्षी 36 कोटी रुपये मिळाले आहेत. आणखी पैसे मिळणार आहेत. यासंदर्भात 350 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. 16 जिल्हयामध्ये प्रत्येक जिल्हयामध्ये एक आणि प्रत्येक 66 तालुक्यामध्ये एक इंग्रजी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावर्षी 15 ते 20 पर्यंत जसे बजेट प्राप्त होईल त्याप्रमाणे इंग्रजी शाळा सुरु करण्यात येणार आहेत. इंग्रजीचे शिक्षण चांगले मिळाले पाहिजे यासाठी निवासी शाळा होण्याची गरज आहे. शिक्षक सुध्दा त्या कॅम्पसमध्ये राहिले पाहिजेत. इंटीग्रेटेड अशा प्रकारचा कॉम्प्लेक्स उभा करणे आणि त्या ठिकाणी उत्तम प्रकारचे शिक्षण देणे हे महत्वाचे आहे. यासंदर्भात जी सूचना करण्यात आलेली आहे ती महत्वाची आहे. त्यामध्ये जरुर सुधारणा करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री. सावंत साहेबांनी खात्याचा अभ्यास करुन अनेक योजनांचा अभ्यास करुन खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत. आपण वेगवेगळया एन.जी.ओं.ना उभे केलेले आहे. गरोदर माता असतील की, स्तनपान करणाऱ्या माता असतील, मुलांचे संगोपन असेल यासंदर्भातील कुपोषण नष्ट करण्याच्या संदर्भात विभागामार्फत खूप मोठया प्रमाणात योजना घेण्यात येत आहेत. पण या योजना तेथपर्यंत जातात की नाही, हे पहाण्याचे काम करावे लागणार आहे. यावर लक्ष ठेवण्यात आलेले आहे. आपण जामखेडच्या संदर्भात सांगितलेले आहे. परवा मी जामखेडला डॉ. आरोळे यांच्याकडे जाऊन आलो आणि उद्याच नंदूरबार जिल्हयात दोन ठिकाणी जात आहे. याठिकाणी जो कार्यक्रम चालू आहे तो कशा पध्दतीने चालू आहे याची पहाणी करण्यात येईल. त्यांनी त्या ठिकाणी वेगळया पध्दतीने हा कार्यक्रम राबविला आहे. त्या ठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

महिलांना प्रशिक्षण देण्यात येते आणि त्याच महिलांना बरोबर घेऊन आपल्याच मुलांना आपलीच आई खाऊ घालते असा वेगळा प्रकार चांगल्या प्रकारे सुरु केलेला आहे. त्यामुळे त्यांना सुध्दा वाढ दिलेली आहे.

सभापती महोदय, गॅस वाटपाच्या संदर्भात या ठिकाणी सूचना करण्यात आलेली आहे. ही योजना चांगली आहे. बी.पी.एल.च्या लोकांना हा गॅस द्यावयाचा आहे. ते खूप गरीब आहेत. त्यामुळे त्यांना एकदा गॅस दिल्यानंतर पुन्हा ते भरुन आणू शकत नाहीत, ही अडचण होते. विभागाने गॅस वाटपासाठी पैसे दिल्यानंतर महामंडळाने त्या पैशात शेगडया खरेदी केल्या. लाभार्थी निवडण्याच्या आधीच शेगडयांची खरेदी करण्यात आली त्यामुळे चार-पाच वर्षापासून त्या शेगडया तशाच कुजत पडलेल्या आहेत. मी ज्यावेळी ही परिस्थिती पाहिली त्यावेळी निर्णय घेतला आणि त्यामध्ये सुधारणा केली. बी.पी.एल., ए.पी.एल. हा विषयच काढून टाकला. जो सरकारी नोकर नाही किंवा नीम सरकारी नोकर नाही अशा आदिवासीला लाभार्थी म्हणून निवडायचे आणि त्याला हा गॅस देऊन टाकायचा असा निर्णय घेण्यात आला आहे. लाभार्थी वाढले पाहिजेत. काही लाख लाभार्थीना यासंबंधीचा लाभ देण्याचे ठरले होते पण तेवढे लाभार्थी मिळाले नाहीत म्हणून ही योजना थोडीशी मॉडीफाय करुन राबविण्यात येत आहे.

सभापती महोदय, कन्यादानाच्या योजनेच्या संदर्भात याठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. कन्यादानाच्या योजनेंतर्गत दहा हजार रुपये देण्यात येतात. यापूर्वी दागिने देण्यात येत होते पण त्यामध्ये भ्रष्टाचार व्हायला लागल्यामुळे आता रोख पैसे देण्यात येतात. प्रत्यक्षात लग्नाच्या वेळी खाते उघडून पैसे देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सभापती महोदय, याठिकाणी महिला व बालविकास मंत्री उपस्थित आहेत तसेच समाजकल्याण विभागाचे मंत्री श्री. मोघे साहेब याठिकाणी उपस्थित आहेत. दहा हजार रुपये कमी पडत असल्यामुळे आणखी पाच हजार रुपये वाढवून देण्याचा निर्णय आम्ही तिघानी मिळून घेतला आहे. सभापती महोदय, मी सामुदायिक विवाहाच्या ठिकाणी हजर राहिलो आहे. एका ठिकाणी 350 सामुदायिक विवाह झाले. दुसऱ्या ठिकाणी 300 विवाह झाले, पावणे तीनशे विवाह झाले. या सर्व मुलांपैकी एकाच्या अंगावरही नवे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

कपडे नव्हते. असे कां याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, तीन वर्षापूर्वी अक्षय तृतीयेला साडी घेतलेली आहे तीच कधीतरी घालण्यात येते. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला की, पंधरा हजार रुपयापैकी दहा हजार रुपये लग्नाच्या वेळी आणि लग्न जमल्यानंतर स्वयंसेवी संस्थेने आमच्याकडे नोंद केल्यानंतर लगेच या पाच हजार रुपयापैकी मुलीला अडीच हजार रुपये आणि मुलाला अडीच हजार रुपये देण्यात यावेत. जेणे करुन लग्नासाठी लागणारी खरेदी करता येईल. त्यामध्ये आणखी एक अडचण आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, अतिशय मनापासून या गोष्टीला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. दहा हजार रुपयात वाढ करुन ते पंधरा हजार रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे तो स्वागतार्हच आहे. दहा हजार रुपये देण्याचे ज्यावेळी ठरविण्यात आले त्यावेळी सोन्याचा भाव पाच हजार रुपये तोळा होता. आता तो वीस हजार रुपये तोळा झ ालेला आहे त्यामुळे ही मदत पंचवीस हजार रुपयापर्यंत वाढविण्यात यावी अशी विनंती आहे. या माध्यमातून गरिब माणसाला खऱ्या अर्थाने मदत करता येईल.

श्री. बबनराव पाचपुते : शासनाने चांगल्या भावनेने मदत करण्याचे ठरविले पण याबाबतीत काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत. महिला व बालविकासच्या अंतर्गत "शुभमंगल"मध्ये एकाच मुलाचे तीन-तीन वेळा लग्न करण्यात आलेले आहेत आणि पैसे लाटण्याचे काम करण्यात आलेले आहे. ज्यावेळी शासन काही वाटायला निघते त्यावेळी लाटणाऱ्यांची संख्या काही कमी नसते. यासंदर्भात आम्ही परत एकत्र बसणार आहोत. सन्माननीय सदस्यांची भावना बरोबर आहे. पण त्यामध्ये आणखी एक प्रश्न आहे. "कन्यादान" योजनेंतर्गत मुलाला आणि मुलीला पैसे देण्यात येतात.

यानंतर श्री. बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

पण ज्यांना लग्नाच्या आधी मुले झाली त्यांना पैसे देत नव्हतो. मी पाहिलेले आहे. मी कोरकू समाजाच्या आणि बाकी समाजाच्या लग्नाला प्रत्यक्षात नाशिकला पेठ तालुक्यात हजर राहिलो. त्या ठिकाणी 350 मुले लग्नाची होती आणि सगळे मुंडावळ्या बांधून तयार होते. मी त्यांना विचारले की, आपल्यापैकी ज्यांना मुले आहेत त्यांनी हात वर करा. आधी हात वर करत नव्हते. नंतर हात वर करावयास लागल्यानंतर 90 टक्के मुलांनी हात वर केले. त्यांची मुले काही लहान नव्हती. मुले आईच्या मुंडावळ्या बांधत होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यामागचे कारण असे आहे की, हे लोक लग्नासाठी सावकाराकडून पैसे उचलतात आणि त्या सावकाराकडे वेठबिगार म्हणून काम करतात. लग्न न करता ते तसेच जर बरोबर राहिले तर त्यांना कर्ज घ्यावे लागत नाही. ज्यावेळी सरकार ही योजना करते त्यावेळी ते लग्न करतात. त्यामुळे त्यांना दोन-दोन मुले असतात ही गोष्ट खरी आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी स्वत: त्या ठिकाणी राहिलो आणि माहिती करुन घेतली. ज्यावेळी मुलगी आणि मुलगा लग्नाला येतो त्यावेळी पैसे नसतात. त्यावेळी जवळचे लोक जमतात आणि गंध लावण्याचा कार्यक्रम होतो आणि त्यांनी एकत्र राहावयाचे असे अंडरस्टॅण्डींग होते. त्यामुळे मग मुले होतात आणि ज्यावेळी पैसे येतील त्यावेळी लग्न करावयाचे असे ठरवतात. मुलाचे लग्न व्हावे असे बापाला वाटते कारण बापाचे लग्न झालेले नसते. मुलाचे लग्न करावयाचे असेल तर बापाचे लग्न करावेच लागते. म्हणून बापाला असे वाटते की पोराचे लग्न व्हावे. त्यामुळे मुलाचे आणि बापाचे लग्न आम्ही एकाच वेळेस, एकाच मंडपात लावलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. हा वेगळा जरी विषय असला तरी परिस्थितीच तशी असल्यामुळे अडचण होत होती. आधी असे होते की, ज्यांना मुले आहेत त्यांना पैसेच द्यावयाचे नाहीत. माझ्याकडे हे खाते आल्यानंतर मी पहिली जर कशावर सही केली असेल तर या बिलावर केली की, ज्यांना मुले आहेत आणि लग्न झालेले नाही आणि 18 ते 35 वर्षे वयापर्यंतचे असतील तर त्यांना सुध्दा आपण कन्यादान योजना लागू करावयाची आणि तशा प्रकारे त्यांना योजना लागू केलेली आहे. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

त्यांचा बराच मोठा प्रश्न सुटलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी पीव्हीसी पाईपच्या संदर्भात सांगितले. पीव्हीसी पाईप किंवा इंजिन असेल त्यामध्ये आता जे वाटप होते ते व्यक्तीला वाटप होते. आता व्यक्ती बाजूला करुन कुटुंब घटक धरलेले आहे. कुटुंबातील एकाला विहीर द्यावयाची, एकाला इंजिन द्यावयाचे, एकाला पाईपलाईन द्यावयाची, एकाला शेतीची अवजारे द्यावयाची, एकाला बैल द्यावयाचा आणि कोणाला तरी बी-बियाणे द्यावयाचे. म्हणजे आम्ही लाभार्थी वाढवत होतो पण स्तर मात्र वाढत नव्हता. आता स्तर वाढवावयाचा असेल तर कुटुंब हा घटक धरावयाचा असा आम्ही निर्णय घेतलेला आहे. एकाच कुटुंबाला एकाच वेळेस विहिरीपासून थेट शेतीची अवजारे आणि बी-बियाणे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कुटुंबाचा स्तर वाढविण्याचा कार्यक्रम आपण वेगळ्या पध्दतीने करावयास लागलो आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ठक्करबाप्पा योजनेच्या संदर्भात सांगितले. ही खूप चांगली योजना आहे. माडा, मिनीमाडा या ठिकाणी त्यांच्या गावात सुधारणा करावयाची असेल तर रस्ते असतील, गटारे असतील अशा वेगवेगळ्या बाबी आहेत पण एकाच वेळेस एका गावाला दोनच बाबीसाठी पैसे द्यावयाचे आहेत आणि तेही 15 लाख रुपयांपर्यंत द्यावयाचे आहेत. दोन बाबी असतील तर आता 25 लाख रुपयांपर्यंत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत ही गावे कव्हर होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. प्रत्यक्षात त्या गावातील सामान्य माणसाला मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो आणि त्यामुळे आम्ही तशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, आश्रमशाळांच्या बाबतीत सांगावयाचे तर एकूण आश्रमशाळा ज्या आहेत त्यामध्ये शासकीय आश्रमशाळा 551 आहेत. त्यामध्ये इमारती असलेल्या 428 शासकीय आश्रमशाळा असून भाडेतत्वावर 123 आश्रमशाळा आहेत. ज्या आश्रमशाळा भाडे तत्वावर आहेत त्या ठिकाणी जागेची अडचण होती. आम्ही एक जी.आर. काढला. जागा घ्यावयाची असेल तर कॉम्प्रमाईज करुन रेडी रेकनरनुसार घ्यावी. त्या ठिकाणी 20 टक्के रक्कम जास्त देण्यास तयार आहोत. नगरपालिका आणि महानगरपालिकेमध्ये आपण दुप्पट रक्कम जरी दिली तरी सुध्दा चालेल पण जागा विकत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

घ्या अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. एकदा केंद्रीय मंत्र्यांकडे गेलो होतो. जो नवीन वन हक्क कायदा आलेला आहे त्यामध्ये एक सूट दिलेली आहे. 1980 चा जो फॉरेस्ट कॉन्झर्वेशन ॲक्ट होता त्यामध्ये बदल केलेला आहे. शहरामध्ये, तालुक्याच्या गावामध्ये किंवा मोठ्या गावामध्ये या वेगवेगळ्या 13 कामांसाठी जर जमीन पाहिजे असेल तर ते आम्हाला शाळेसाठी जमीन देण्यास तयार आहेत. ती अट शिथिल झालेली आहे. त्यामुळे पुण्यामध्ये सुध्दा वन खात्याची जागा देण्याचा अधिकार आहे. त्यासाठी भोपाळला आणि केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. त्या ठिकाणचा डीएफओ आम्हाला जागा देऊ शकतो. दोन-दोन कोटी रुपयांची एक एकर जागा आहे अशा जागा सुध्दा मोठ्या प्रमाणावर मिळतील त्यामुळे या सगळ्या शाळा तीन वर्षामध्ये शासकीय इमारतींमध्ये आल्या पाहिजेत असा प्लॅन आम्ही तयार करीत आहोत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

शासकीय इमारतीमध्ये जी वसतिगृहे आहेत, त्यांची संख्या 171 आहे आणि भाडयाच्या इमारतीमध्ये 287 आहेत. हा जो मुद्दा मांडला आहे तो बरोबर आहे. यामध्ये सुधारणा करीत आहोत. त्यामध्ये काही अडचण राहिली तर ती दूर केली जाईल. जशी अर्भकांची काळजी घेतली पाहिजे तशाप्रकारे ती योजना राबविलेली आहे. त्यासाठी दोन कोटींची तरतूद केलेली आहे. यावर्षी त्यासाठी जास्त पैसे द्यावयाचे आहेत. बांधकामाच्या संदर्भात ज्या अडचणी होत्या त्या गॅस व बाकीच्या सुधारणा करण्यासंबंधी आहेत, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, मुलांच्या आंघोळीचा प्रश्न आहे, मुले आंघोळीसाठी इकडे तिकडे जाऊ नयेत म्हणून सोलरवर पाणी चालू करायचे आहे, लाईट आणि विंडवर आधारित हायब्रीड पध्दतीने म्हणजे दोन पध्दती एकत्र करुन त्या मुलांना लाईट देता येईल काय, त्या मुलांना अभ्यास करण्याची संधी मिळेल काय यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला आहे. याशिवाय आदिवासी विभागाने अनेक निर्णय घेतलेले आहेत. परंतु मागण्या मर्यादित आहेत, त्या मागण्यांवर ज्या सदस्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत त्यांनाच उत्तर दिले पाहिजे. आदिवासी विकास विभागाच्या मागण्या मान्य कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि येथेच थांबतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. एक म्हणजे काल सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी अगोदरच्या मंत्र्यांच्या काळात औषधाच्या बाबतीत कसा भ्रष्टाचार होता ते सांगितले. तसे आदिवासी विभागाच्या मंत्र्यांनी काय काय केले आणि आता मी ते कसकसे बदलत आहे ते सांगितल्यामुळे मी अभिनंदन करतो. दुसरे असे की, सुवर्ण महोत्सवी वर्षात ते भावनाविवश होऊन बोलत होते, प्रामाणिकपणे बोलत होते, त्यामुळे मी ते ऐकत होतो. या राज्यामध्ये लग्न लावायला येतात पण त्यांच्या अंगावर कपडेही नसतात, हा नागडा उघडा ठेवलेला आमचा ग्रामीण भागातील माणूस 50 वर्षामध्ये तसाच आहे. त्याबाबत आपल्या राज्यात ही जी उदासिनता आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी प्रामाणिकपणे सांगितले आहे त्याबद्दल मी अभिनंदन करतो. ग्रामीण भागात उद्ध्वस्तता कशी आहे ते सांगितल्याबद्दल धन्यवाद देतो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, काल सभागृहामध्ये भ्रष्ट मंत्र्यांचा कारभार असा काही उल्लेख झालेला नाही, त्यामुळे रेकॉर्डवर चुकीचे राहू नये असे मला वाटते.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त व नियोजन, जलसंपदा व ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या जलसंपदार, ऊर्जा, वित्त व नियोजन विभागाच्या पुरवणी मागण्यांवर या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत, काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांना व चर्चेला उत्तर देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाची बाब क्रमांक 50 ते 57 वर मागणी करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी कुकूर प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. हा विषय जलसंपदा विभागाच्या अंतर्गत येत नाही तर तो जलसंधारण विभागामध्ये येतो अशी मला माननीय जलसंधारण राज्यमंत्र्यांनी माहिती दिली आहे. खरे तर मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. हा कुकूर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये आवश्यक तो निधी देण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. त्याचप्रमाणे म्हैसाळ उपसा जल सिंचन योजनेच्या विजेच्या बिलाच्या थकबाकीसंबंधीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या योजनेचे विजेचे कनेक्शन दिनांक 25.4.2009 रोजी तोडलेले आहे. या योजनेची 7 कोटी 54 लाख रुपयांची विजेच्या बिलाची थकबाकी आहे, त्यांनी जर या रकमेपैकी 33 टक्के रक्कम भरली तर त्यांचे विजेचे कनेक्शन जोडून देण्यास शासन तयार आहे. त्याप्रमाणे सूचना अधिकायांना दिल्या जातील.

सभापती महोदय, अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्युत मंडल, नाशिक यांचे कार्यालय बंद करण्यात आले असून हे कार्यालय अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडल, सातारा या कार्यालयास जोडण्यात आले आहे. त्यासाठी 1 हजार रुपयांची लाक्षणिक मागणी करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या अंतर्गत सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार थकबाकीची रक्कम देण्यासाठी 44.50 लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विजय वडेट्टीवार...

त्याच प्रमाणे अधीक्षक अभियंता ठाणे पाटबंधारे विभाग, ठाणे, काळ जलविद्युत प्रकल्पासाठी 40 कोटीची अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासाठी संपादित जमिनीचा वाढीव मोबदला अदा करण्यासाठी 48.47 कोटी इतक्या रकमेचा पूरक मागणीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

ऊर्जा विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये काही सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. (अडथळा)...सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकणातील प्रकल्पासाठी एकही रुपया मिळालेला नाही असे सांगितले. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. कोकण पॅकेज अंतर्गत जे दिलेले आहे ते सर्वांना माहीत आहे.

श्री. विनोद तावडे : पॅकेज जाहीर केले असे म्हणावे, पॅकेजमधील अजून काहीही दिलेले नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मला माननीय राज्यमंत्री महोदयांना एवढेच विचारावयाचे आहे की, जलसंपदा विभागाचे कोकणाचे 500 कोटी रुपये आपण विदर्भाकडे वळविलेले आहेत, हे खरे आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : ही गोष्ट खरी नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विजय वडेट्टीवार : कोकणासाठी जे पॅकेज माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेले आहे त्याअंतर्गत तीन वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने खर्च करावयाचा आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासन बांधील आहे, एवढे मी या ठिकाणी विश्वासाने सांगतो.

श्री. रामदास कदम :पहिला टप्पा 725 कोटीचा होता. 725 कोटी पैकी किती खर्च केले. त्यातील 500 कोटी विदर्भाला देण्यात आले. म्हणून 725 कोटी पैकी किती कोटी रुपये खर्च झालें याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी हे मुद्दे उपस्थित केले नाहीत. आता या प्रश्नाचे उत्तर द्यावे, त्या प्रश्नाचे उत्तर द्यावे असे वारंवार सांगत आहेत. हे कितपत योग्य आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : रेकॉर्डवर चुकीची माहिती येत असेल तर ती दुरुस्त करण्याचा मला अधिकार आहे.

श्री. भाई जगताप : सन्माननीय सदस्यांनी या बाबीकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष आकर्षित केलेले आहे की, पहिल्या टप्प्यामध्ये 725 पैकी किती खर्च झालेले आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार : ही सर्व माहिती मोठी आहे. प्रकल्पनिहाय माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोकण पॅकेजची यादी माझ्या हातामध्ये आहे. सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीचे राहू नये. ही शासनाने दिलेली आकडेवारी आहे, ही माझी आकडेवारी नाही. तीन वर्षात कोकणाला पॅकेजद्वारे किती रक्कम दिली जाणार आहे याची आकडेवारी दिली आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : मी पटलावर माहिती ठेवतो म्हटल्यानंतर पुन्हा पुन्हा तेच विषय उपस्थित करणे योग्य नाही.

श्री.रामदास कदम : हा कोकणावर अन्याय आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, जलसंधारण विभागाच्या मागण्या क्रमांक 50 ते 57, ऊर्जा विभागाच्या मागण्या क्रमांक 36 ते 39 व नियोजन विभागाच्या मागण्या क्रमांक 91 ते 97 यांना सभागृहाने संमती द्यावी व या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी याठिकाणी अदानी कंपनीच्या संदर्भात मुद्दा मांडला होता. अदानी कंपनीच्या माध्यमातून कोळसा खरेदीमध्ये शासनाने आपले तोंड काळे केले. या प्रकरणात 240 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला त्याबद्दल मंत्रीमहोदय एक शब्दही बोलले नाहीत. कोकण पॅकेजमध्ये 725 कोटी रुपये पहिल्या वर्षी देणार असे पॅकेजच्या यादीमध्ये म्हटले आहे. 725 कोटी रुपयांपैकी किती खर्च केला हे सांगावे. त्याबद्दल एक शब्द बोलला जात नाही. आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाबद्दल एकही शब्द बोलणार नसतील तर ही चर्चा कशाला हवी? अदानी कंपनीला काळ्या यादीमध्ये टाकणार आहात की नाही? 240 कोटी रुपयांचा शासनाचा महसूल बुडविला आहे. सभापती महोदय, माझ्याकडे अधीक्षक अभियंत्यांचे पत्र आहे. 725 कोटी रुपयांपैकी एकही पैसा कोकणामध्ये खर्च केलेला नाही. असे असताना सभागृहामध्ये फक्त चर्चा करावयाची का? मंत्रीमहोदय याबद्दल एक शब्द बोलत नाहीत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मंत्रीमहोदयांचा रिप्लाय पूर्ण होऊ द्यावा.

श्री.रामदास कदम : अदानी कंपनीच्या माध्यमातून 240 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करुन शासनाने आपले तोंड काळे केले.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.विजय वडेट्टीवार : अदानी कंपनीने इम्पोर्ट कोलचा पुरवठा केला त्यामध्ये गैरप्रकार झाला, त्याची माहिती घेण्यात येईल. आता माहिती उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.रामदास कदम : आम्ही धिक्कार करतो, निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्य मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, श्री..रामनाथ मोते, श्री. विनोद तावडे, श्री. सुभाष चव्हाण, श्री. रमेश शेंडगे यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात अनेक मौलिक सूचना केल्या आहेत. दोन तीन सन्माननीय सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र प्रकाशित करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यांनी अशीही मागणी केली की, या विषयाशी संबंधित जे दोन विभाग वेगवेगळे आहेत ते एकत्रित करावेत. या निमित्ताने मी स्पष्ट करुन इच्छिते की, हा विभाग ऑलरेडी एकत्र केलेला आहे. तसेच या ठिकाणी एक आयएएस दर्जाचा अधिकारी असावा अशीही त्यांची मागणी आहे. परंतु आयएएस दर्जाचा अधिकारी नसला तरी किमान उप सचिव दर्जाचा अधिकारी नेमण्याचा तरी निर्णय घेण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधनातर्फे एकूण 21 खंड असून त्यातील दोन खंडांचे प्रकाशन सुध्दा झालेले आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित एकूण 14 खंड प्रकाशित करावयाचे आहेत. तसेच डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित खंड 14 एप्रिललाच प्रकाशित व्हावा अशी सर्वांची इच्छा होती. त्यानुसार येत्या 14 एप्रिल रोजी जयंतीनिमित्ताने 9 खंड होतात. त्यातील 7 व 8 छपाईचे काम सुरु केले आहे. सर्वात महत्वाचा खंड हा 22 नंबरचा असून त्यांच्या जीवनावर तो आधारित असून त्यांचे फोटो त्यात आहेत आणि हा खंड सुध्दा 14 एप्रिल रोजी प्रकाशित व्हावा अशी आमची इच्छा आहे. त्यानुसार हा खंड सुध्दा 14 एप्रिललाच प्रकाशित करणार आहोत. हे करीत असताना वेगवेगळ्या प्रकारे त्यावर रिसर्च देखील करावे लागते. अजूनही 20 खंड प्रकाशित करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या व्यतिरिक्त महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावरील खंडही प्रकाशित करावेत त्यादृष्टीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवला व तसा निर्णय घेतला जाईल.

त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी शासकीय विधि महाविद्यालयाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने मी असे सांगू इच्छिते की यासंबंधीची चौकशी करुन सभागृहाला माहिती सादर करण्यात येईल. मी सभागृहाला विनंती करते की, सभागृहाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान (अल्पसंख्यांक विकास मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्री. विक्रम काळे, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, श्री. एस.क्यू.जमा यांनी अल्पसंख्यांक विभागाच्या मागण्यांबाबत आपले विचार मांडले व महत्वाच्या सूचना केल्या त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करतो.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शैक्षणिक कर्मचारी नियुक्त करते वेळी आरक्षणाची टक्केवारी लागू करु नये अशी सूचना केली. त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने 4 मे, 2009 रोजीच एक परिपत्रक निर्गमित झाले असून त्या अनुषंगाने तशा सूचना दिल्या आहेत की, याबाबत कुठल्याही प्रकारचे आरक्षण विचारात घेऊ नये. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी उर्दु बालवाडया व शिष्यवृत्तीबाबतचा प्रश्न उपस्थित केला.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला येथे सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना आश्वासन द्यावयाचे आहे की, येणा-या काळामध्ये राज्यामध्ये ऊर्दू बालवाडया घेण्याचा निर्णय करण्यात आलेला आहे आणि हा निर्णय लवकरात लवकर अमलात येईल.

या ठिकाणी शिष्यवृत्तीच्या वाटपाच्या संख्येच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला की, 10 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. परंतु आतापर्यंत या वर्षामध्ये 11000 नवीन शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. येणा-या काळात यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी पंतप्रधानांनी अल्पसंख्याकाच्या विकासाच्या संदर्भात 15 कलमी कार्यक्रम ठरविलेला आहे त्यामुळे या राज्यातील प्रत्येक विभागाच्या माध्यमातून 15 कलमी कार्यक्रमाच्या माध्यमातून कठोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने सर्व विभागांना परिपत्रक पाठविलेले आहे. तसेच सर्व विभागाच्या सचिवांना, जिल्हाधिका-यांना कळविण्यात आलेले आहे की, माननीय पंतप्रधांनांनी अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी जो 15 कलमी कार्यक्र जाहीर केलेला आहे त्याची कठोरपणे अंमलबजावणी केली जावी. या राज्यातील अल्पसंख्याक समाजातील जे लोक आहेत विशेषत: मुस्लीम समाज, शीख, ख्रिश्चन, पारशी, जैन आणि बौध्द समाजाच्या लोकांना न्याय मिळावा, त्यांचा विकास व्हावा यासाठी शासनातर्फे योजना राबविण्यास सुरुवात झाली. येणा-या काळात आयटीआय शिक्षण या राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या युवकांना मिळावे, औद्योगिक संस्थेत काम मिळावे यासाठी सध्या 42 तालुक्यामध्ये ज्या आयटीआय आहेत त्या ठिक्राणी अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेता यावे यासाठी पहिल्या आणि दुस-या टप्प्यात प्रवेश दिला जाईल, यासंदर्भात शासनाचा निर्णय देखील झालेला आहे.

हज यात्रेकरिता जाणा-यांसाठी नागपूर आणि औरंगाबाद येथे नवीन हज हाऊस सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्याठिकणी बांधकामास सुरुवात देखील झालेली आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी 25 हजार रुपये शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून शिष्यवृत्तीचे वाटप करण्यास देखील सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 145 वरील बाब क्रमांक 142, 143, 144, 145 च्या अंतर्गत अल्पसंख्याक विकास विभागाच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी या मागण्या मान्य कराव्यात.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झनक (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाची बाब क्रमांक 126 आणि 127 मध्ये 7 लाख 51 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली असून या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केल्या आहेत. त्याबाबत मी त्यांना प्रथम घन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी जेंडर बजेट, त्याचबरोबर महिला आयोगातील रिक्त पदे भरणे, कौटुंब कलह कायद्या अंतर्गत प्रोटेक्शन ऑफिसर्सची नियुक्ती करणे तसेच महिला आयोगा मार्फत विविध कार्यक्रम आणि कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना मोठया प्रमाणावर खर्च येत असल्यामुळे त्यासाठी निधीची तरतूद करणे इत्यादी मागण्या केलेल्या आहेत. या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जेंडर बजेट व्हावे असा शासनाचा प्रयत्न असून त्याबाबतीत सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत.महिलांचे सक्षमीकरण करीत असतांना त्या माहितीच्या आधारे लाईन ऑफ ॲक्शन शासन ठरविणार आहे.

सभापती महोदय, 2009-2010 सालासाठी महिला आयोगाकरिता 86 लाख रुपयांची तरतूद केली असून ही तरतूद अधिक वाढवून देण्याच्या बाबतीत देखील शासन प्रयत्न करणार आहे.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या चर्चेच्या निमित्ताने काही चांगल्या सूचना केल्या आहेत. नवीन आंगणवाडयाचे बांधकाम झाले पाहिजे, जुन्या अंगणवाडयाची दुरुस्ती झाली पाहिजे त्याचबरोबर नवीन अंगणवाडयाच्या जागेचा,शाळेमध्ये अंगणवाडया भरतात या सबंधी त्यांनी मुद्दे मांडले आहेत. त्या बाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या राज्यात 51 हजार नवीन अंगणवाडयाचे बांधकाम करावयाचे आहे. काही ठिकाणी भाडयाच्या जागेत अंगणवाडया चालविल्या जातात तसेच काही ठिकाणी झाडाखाली अंगणवाडया भरविल्या जातात. त्याकरता नाबार्डने या वर्षी 400 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. अंगणवाडयाचे बांधकाम करण्यासाठी हे पैसे मिळणार आहेत. त्याचबरोबर डीपीडीसीमधून तसेच स्थानिक विकास निधीतून यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद कशी होईल या दृष्टीने माझा प्रयत्न राहील.अंगणवाडयाच्या बांधकामासंबंधी शासनाने चार लाख रुपयांचा एक टाईप प्लॅन तयार केला असून .जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे तो टाईप प्लॅन पाठविला आहे.त्या प्रमाणे बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याकरिता संबधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झनक ...

सभापती महोदय, महिला आणि बाल विकास विभागाच्या मार्फत आदिवासी विकास विभागाच्या अनुदानातून सायकल वा शिलाई मशिनची खरेदी करण्यात येते त्याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी काही सूचना केलेल्या आहेत त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, जिल्हा परिषदे मार्फत ज्या 21 योजना राबविल्या जातात त्याची तपासणी करुन ज्या योजना महत्वाच्या आहेत त्याच चालू ठेवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि श्री. विनोद तावडे यांनी अतिशय चांगला प्रश्न अत्यंत पोटतिडकीने येथे मांडलेला आहे. 500 सामाजिक बालक आश्रमांना मान्यता देण्यासंबंधी त्यांनी काही सूचना केल्या आहेत. त्या सबंधी मी त्यांना सांगू इच्छितो की राज्य सरकारने 2008 साली 500 बालक आश्रमांना तत्वता मान्यता दिली होती. पुणे येथील महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्तांनी प्रत्येक संस्थांची तपासणी करुन ज्या संस्था चांगले काम करीत आहेत, ज्या संस्थांकडे चांगल्या इमारती आहेत त्यांनाच फक्त मान्यता द्यावयाची आहे. परतु काही संस्थ्ां न्यायालयात गेल्या असून न्यायालयाने असे सागितले की , प्रत्येक संस्थांची तपासणी करण्यात यावी व त्यानंतर अंतिम मान्यता देण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी सागितले की,कोकण वा काही इतर भागामध्ये बालक आश्रम देण्यात आलेले नाहीत. विदर्भ असो, कोकण असो वा मराठवाडा असो ज्या विभागात बालक आश्रम दिले गेले नाहीत त्या ठिकाणी बालक आश्रम देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, एका एका तालुक्यात पाच पाच बालक आश्रम दिले आहेत. शासनाने जे नियम तयार केलेले आहेत त्याच्या विरुध्द एका तालुक्यात अनेक ठिकाणी बालक आश्रम दिलेले आहेत. शासनाच्या नियमाची प्रत माझ्याकडे आहे.तेव्हा एका तालुक्यात एकच बालक आश्रमास मान्यता देण्यात यावी आणि ज्या ठिकाणी एकही बालक आश्रम सुरु नाही त्या ठिकाणी बालक आश्रम सुरु करण्याची मागणी करण्यात आलेली आहे व त्यासबंधीचा प्रस्ताव करण्यात आला असेल तर त्याला किती दिवसात मान्यता देण्यात येणार आहे ?

श्री.सुभाष झनक : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी अनियमितता झालेली आहे.काही तालुक्यामध्ये जास्त बालक आश्रम देण्यात आलेले आहेत तेव्हा आमच्या विभागाच्या अधिका-या व्यतिरिक्त इतर विभागाच्या अधिका-या मार्फत त्याची चौकशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात येईल आणि जे बालक आश्रम चालू नाहीत , ज्या ठिकाणी चांगल्या इमारती नाहीत , ज्यांनी निकष पूर्ण केलेले नाहीत ते बंद करण्यात येतील. अधिवेशन संपल्यानतर बालक आश्रम देण्याच्या बाबतीत राज्यासाठी एक बृहत आराखडा तयार करावयाचा आहे आणि ज्या तालुक्यामध्ये बालक आश्रम दिलेले नाहीत त्या तालुक्यामध्ये प्राधान्याने बालक आश्रमास मान्यता देण्यात येईल.

नतर श्री. सरफरे s

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मंत्रिमहोदय नियमावर बोट ठेवीत आहेत. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, तालुकानिहाय एक बालकाश्रम दिले पाहिजे असा शासन निर्णय आहे. ज्या तालुक्यामध्ये अशाप्रकारचे एकही बालकाश्रम देण्यात आलेले नाही त्या तालुक्यामधून आपणाकडे परिपूर्ण असे प्रस्ताव देण्यात आले आहेत. ज्या तालुक्यांमध्ये एकापेक्षा अधिक बालकाश्रम देण्यात आले आहेत ते आपणास रद्द करावयाचे नसतील तर करु नका. परंतु ज्या तालुक्यामध्ये एकही बालकाश्रम नाही त्या तालुक्यामधून परिपूर्ण आलेल्या प्रस्तावाबाबत आपण किती दिवसात निर्णय घेणार आहात ?

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 549 प्रस्ताव आले आहेत. ज्या संस्था माननीय न्यायालयामध्ये गेल्या होत्या, त्यानंतर माननीय न्यायालयाने प्रत्येक संस्थेची चौकशी करुन योग्य त्या संस्थेला मान्यता देण्यासंबंधी आदेश दिले. त्यामुळे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर ज्या तालुक्यांमध्ये बालकाश्रम नाहीत. त्या तालुक्यांना नवीन बालकाश्रम देण्यासंबंधी बृहत आराखडा तयार करुन त्याठिकाणी बालकाश्रम देण्याचा प्रयत्न करु.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळाले नाही. ज्या संस्था फक्त कागदावरच आहेत, प्रत्यक्षात त्याठिकाणी अस्तित्वात नाहीत अशा संस्थांना 2 कोटींचे अनुदान देण्यात आले आहे. त्या फक्त नेत्यांच्या नावावर संस्था आहेत. त्या संस्थांना देण्यात आलेले अनुदान आपण वसूल केले काय?

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी उपस्थित केलेल्या अनेक बाबीसंबंधी त्यांच्याबरोबर बसून व चर्चा करुन निर्णय घेतला जाईल....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझ्याजवळ त्यासंबंधीची कागदपत्रे आहेत, आयुक्तांचा अहवाल आहे. ती मी आपणास देण्यास तयार आहे. ज्या संस्थांना मान्यता देण्यात आलेली नाही अशा संस्थांना अनुदान दिले गेले आहे....

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे माननीय सदस्यांबरोबर एकत्र बसून व चर्चा करुन विदर्भ असो, किंवा कोकण असो ज्या ज्या विभागावर अन्याय झाला असेल त्या विभागाला न्याय देण्याचा जरुर प्रयत्न करु. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी शेळी-मेंढी पालन प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हा बँकाकडून शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे अशी सूचना केली.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी यापूर्वी देखील हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी या प्रकरणी चौकशी केली जाईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. त्या चौकशीचे पुढे काय झाले ते सांगितले आपण सांगत नाही. तेव्हा माझी अशी मागणी आहे की, आपण या संपूर्ण घोटाळयाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय? आपण याठिकाणी त्यासंबंधी बोलावयास तयार नाही. मी याठिकाणी आपणास जी.आर. दाखवीत आहे, नियम दाखवीत आहे. तुमचे नियम तुम्हाला माहीत असले पाहिजेत. एकेका संस्थेला एका तालुक्यामध्ये 5-5 बालकाश्रम देण्यात आले आहेत. ज्या तालुक्यामध्ये एकही बालकाश्रम नाही त्याठिकाणी मागणी करुनसुध्दा आपण देत नाही. त्या संस्थांकडून परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे आले असतांना आपण नियमावर बोट ठेवीत आहात. आणि दुसऱ्या बाजूला केवळ कागदावर संस्था असतांना आपण नियमबाह्य पध्दतीने पैसे वाटले आहेत. त्याच्या चौकशीचे काय झाले ते आपण मला सांगत नाही. म्हणून या संस्थांची आपण सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय? अशी माझी मागणी आहे. आमचा वेळ जात नाही म्हणून आम्ही सभागृहामध्ये बसतो काय?

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, सी.आय.डी. चौकशीची आवश्यकता नाही, शासन पातळीवर याबाबत चौकशी करुन ज्या ज्याठिकाणी ....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हा विषय उपस्थित करुन 3 महिने झाले, मी सतत हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत आश्वासन दिले आहे. असे असतांना आपण सी.आय.डी. चौकशीची आवश्यकता नाही असे कसे म्हणता? आपण 2 कोटींची मदत कां वाटता?

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, मी बाबनिहाय सर्व माहिती सभागृहाला सांगितली आहे...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी विषयाच्या बाहेर जाऊन बोललो नाही...

(गोंधळ)

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे व माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी केलेल्या सूचनांचा मी आदर करतो व महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्रमांक 126 व 127 च्या 7 लाख 51 हजार रुपयांच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, राजन तेली, रमेश शेंडगे, परशुराम उपरकर, केशवराव मानकर यांनी केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. यामध्ये माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी दुधाच्या दरासंदर्भात सूचना केली आहे. काही ठिकाणी 16 रुपये तर काही ठिकाणी 14 रुपये दराने दुधाची खरेदी होते असे त्यांनी सांगितले. परंतु आपण दुधाची खरेदी करीत असतांना शेतकऱ्यांना साडे बारा रुपये इतका दर देतो. त्यामुळे दुधाची खरेदी अतिशय कमी होत असल्यामुळे दूध दरवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर . . . .

त्या संदर्भात एक तदर्थ समिती स्थापन केलेली आहे. या समितीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे आणि त्यांच्याकडून या बाबतचा प्रस्ताव आल्यानंतर निश्चितपणे आम्ही दरवाढीच्या बाबतीत विचार करीत आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना कोणी सहकार्य करीत नाही असे मला वाटते. मी या विषयाच्या बाबतीत सकाळी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. मराठवाड्यातील तुमचे 2 कोटी रुपये अडवून ठेवले . . ..

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी बोलतो . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे नाही. फायनान्स विभागाचे जे हरामखोर अधिकारी आहेत, त्यांनी सगळी वाट लावलेली आहे. तुम्हाला दोन रुपयेही वाढवून देत नाहीत. तुमच्याकडे दूध जमा होत नाही आणि सगळे खाजगी लोकांकडे चाललेले आहे, खाजगीकरणाकडे सगळी तरतूद वळवत आहेत. मग आपण त्याबद्दल बोलावे. याबाबतीत विचार कसला सुरु आहे ? तुम्हाला कोणी मोजतच नाहीत.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपल्याला दुधाचे दर वाढवावेच लागतील. त्या शिवाय हा व्यवसाय चालणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, फायनान्स कडून माहिती पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपण फायनान्सकडे प्रस्ताव दिलेला आहे आणि तो ताबडतोब . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपली मागणीच नाही अशी परिस्थिती आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपण फायनान्स विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. यासंदर्भात आपण समिती देखील स्थापन केलेली आहे आणि हा प्रस्ताव मंजूर होईल. त्यानंतर आपण ताबडतोब यासंबंधात निणय घेणार आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असे म्हटले आहे की,"फायनान्स विभागाचे हरामखोर अधिकारी". मला असे सांगावयाचे आहे की, आपण विधान परिषदेमध्ये बसलो

. . . .3 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

आहोत, तेव्हा अशा प्रकारचे शब्द रेकॉर्डवर राहू नयेत. ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : मला मान्य आहे. पण आपण ऐकून घ्यावे . . . .

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "हरामखोर" असे जे शब्द वापरलेले आहेत, ते रेकॉर्डवर राहू नयेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

उपसभापती : हे काय चालले आहे ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "हरामखोर" असा शब्द उच्चारलेला आहे, तो रेकार्डवरुन काढून टाकण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग ठीक आहे. मी "बदमाश" म्हणतो.

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण झालेले आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, होय.

श्री.रामदास कदम :सभापती महोदय, मला अजून उद्योग, कामगार विभागाच्या संबंधात उपस्थित केलेलया मुद्यांबाबत उत्तर मिळालेले नाही. अजून तो विषय संपलेला नाही.

श्री.गुलाबराव देवकर :सभापती महोदय,पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्य व्यवसायाच्या संदर्भातील बाब क्र. 22, 23, 24, 25, 26 व 27 या पुरवणी मागण्यांना आपण मंजूरी द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुम्ही या सदनामध्ये परभणीच्या अधिकाऱ्यांनी दुधात भेसळ केली म्हणून त्यांना निलंबित केले. नंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी त्यांना प्रमोशन दिले. त्याला आजच्या आज . . . .

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यामध्ये संबंधितांना प्रमोशन दिलेले नाही. त्यांना एक वर्षासाठी सस्पेंड केले होते. यानंतर त्यांना कायद्यानुसार कामावर घ्यावे लागते.

श्री.दिवाकर रावते : का ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपण त्यांना री-इंस्टेट केले आणि एक वर्षानंतर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला याच गोष्टीची चीड आहे. तो कर्मचारी भेसळ करतो हे कायदेशीर सिध्द झाले म्हणून निलंबित केले. एक वर्षाच्या आत त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करावयस हवा होता. त्यांना तुरुंगामध्ये पाठवावयास हवे होते. पण तसे काही केले नाही आणि एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर कायद्याने परत घेतले.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याचे माननीय मंत्री महोदयांनी उद्या सभागृहाच्या पटलावर उत्तर ठेवावे.

सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रावरील चर्चा आता संपलेली आहे.

. . . .3 वाय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

उपसभापती आजच्या कामकाज पत्रिकेवरील अनु.क्र.सात वरील नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्याबाबत काय करावयाचे ?

अनेक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, सदरहू प्रस्ताव पुढील आठवड्यामध्ये घेण्यात यावा.

. . . .3 वाय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सन्माननीय सदस्यांच्या सुरक्षेबाबत</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कालपासून आमदारांच्या संरक्षणाच्या बाबतीतील जो मुद्दा आहे, त्याच्या माहितीबाबत काय झाले ? याबाबतीत उद्या उद्या असे चालले आहे. याठिकाणी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील येथे उपस्थित आहेत.

उपसभापती : याबाबतीत मी सांगतो. माननीय गृहमंत्री महोदय, हा विषय उपस्थित झाला तेव्हा आपण सभागृहामध्ये नव्हतात. पण या सदनामध्ये एक विषय असा उपस्थित झाला की, काही दिवसांपूर्वी मुंबईमध्ये जे काही आंदोलन झाले, त्यावेळी काही आमदारांचे पोलीस बंदोबस्त काढून घेण्यात आले. तसेच काल सदनात हाही एक विषय होता आणि काही सन्माननीय सदस्यांनी सन्माननीय मंत्री श्री.अब्दुल सत्तारसाहेबांच्या बाबतीत उल्लेख केला की,मग त्यांचे संरक्षण का काढण्यात आले नाही. मी आता याठिकाणी हा प्रश्न चर्चेसाठी घेत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

परंतु यातील महत्वाचा भाग एकच आहे की, ज्या आमदारांना संरक्षणाची आवश्यकता आहे. ज्यांनी संरक्षण मागितलेले आहे अशा सर्व आमदाराना आपण संरक्षण देणार काय? मला असे वाटते की, सभागृहामध्ये सगळया आमदारांची काळजी मला वहावी लागते आणि मी माझ्या कर्तव्याशी कटिबध्द आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, त्यांना जर संरक्षण आवश्यक असेल तर आपण आपल्या नियमानुसार आणि अटी नुसार त्यांना ते संरक्षण द्यावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कुठल्याही आमदारांना, कुठल्याही व्यक्तीला जेव्हा धोका असतो तेव्हा त्यांना संरक्षण देण्यची भूमिका आपण आपल्या राज्यामध्ये घेत असतो. त्यासाठी एक समिती आहे. ती अधिकाऱ्यांची समिती आहे त्यात आय. बी.चाही प्रतिनिधी आहे. या समितीकडून वेळोवेळी आढावे घेतले जातात. ज्यांना संरक्षण कन्टीन्यू करण्याची आवश्यकता आहे त्यांचे संरक्षण कन्टीन्यू केले जाते. एखाद्याचा धोका टळला असेल तर त्याचे संरक्षण कमीही केले जाते. लोकप्रतिनिधींच्या बाबतीत मग ते खासदार असतील, आमदार असतील आपण शक्यतो त्यांचे संरक्षण काढत नाही. त्यांना देण्यात आलेले संरक्षण कन्टीन्यू करतो आणि ते या पदावर आहेत तोपर्यंत ते नेहमीच कायम ठेवतो. मध्यंतरीच्या आंदोलनाच्यावेळी संरक्षक बरोबर घेऊन, सभापती महोदय, दिसायलाही चित्र थोडेसे वाईट होते की, दोन्ही बाजूला दोन संरक्षक आहेत पुढे बेकायदेशीर कृत्य चालू आहे. पोलिसांच्या संरक्षणात बेकायदेशीर कृत्य चालू असलेल्या काही ठिकाणच्या क्लीप बघायला मिळाल्या. त्यानंतर शासनाने हे संरक्षण डिसकन्टीन्यू करण्याची थोडीशी भूमिका घेतली होती. आता मध्यंतरी खालच्या सदनाचे एक आमदार, त्यांना नोटीस दिलेली नसल्यामुळे किंवा त्यांना येथे येऊन उत्तर देण्याचा अधिकार नसल्यामुळे मी त्यांचे नाव घेत नाही. पण ज्यांना अतिरेकी म्हणून पोलिसांनी पकडले आहे, जे मुंबईमध्ये घातपात करणारे आहेत त्यांच्या घरी सुध्दा संरक्षण घेऊन ते जात आहेत. सभापती महोदय, मला याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, आमदारांना जरुर संरक्षण दिले पाहिजे पण त्याचा गैरवापर केला जाणार नाही, या गोष्टीची दक्षता त्यांनी घेतली पाहिजे. मध्यंतरीच्या आंदोलनाच्या वेळी ज्यांचे सरंक्षण काढलेले आहे. सभापती महोदय, मी यासंदर्भात माहिती घेतलेली आहे, त्यांचे संरक्षण पूर्ववत ठेवण्याची आवश्यकता आहे. रिपोर्टही तसे आलेले आहेत. म्हणून ज्यांची संरक्षणे ठेवण्याची आवश्यकता आहे त्यांची संरक्षणे पूर्ववत ठेवली जातील.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उपसभापती : आता विधेयकावर चर्चा घ्यावयाची काय?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव कधी घ्यावयाचा यासंदर्भात उद्याच्या कामकाज सल्लागार समितीत ठरवू. पण या प्रस्तावाशी संबंधित एक मुद्दा मला याठिकाणी मांडावयचा आहे. मिरजच्या दंगलीच्या संदर्भात हिंदू कार्यकर्त्यांचे ब्रेन मॅपिंग करण्यात येत आहे, ते आदेश मागे घेण्यात यावेत यासंदर्भात ते न्यायालयात गेले आहेत. खरे तर आता तो विषय संपलेला असल्यामुळे तो पुन्हा उकरुन काढण्यात येऊ नये, ब्रेन मॅपिंगचे आदेश मागे घेण्यात यावेत, अशी विनंती आहे.

श्री. आर.आर. पाटील : ही बाब कोर्टामध्ये गेलेली आहे. या स्टेजला शासनाला कोणती भूमिका घेता येईल हे मी तपासून बघतो असे शासनामार्फत सांगितले आहे. दोन दिवसाच्या आत याबाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

उपसभापती : आता शासकीय विधेयक चर्चेसाठी घ्यावयाचे काय?तसेच नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा कधी घ्यावयाची?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा कधी घ्यावयाची हे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ठरवू या.

उपसभापती :आता अर्धा-तास चर्चा घ्यावयाची काय?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अर्धा-तास चर्चा नंतर घेण्यात यावी.

उपसभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 25 मार्च रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 09 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 25 मार्च 2010 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अप्रधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही